# श्री स्वामी शिवानंद

(चरित्र व तत्त्वज्ञान)

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय चो.वा.
दा. क्र. ९203

लेखक :

भगवान राघवेंद्र नाईक,

बी. ए. (ऑ.) बी. टी.

IRBK-0109203

[ किंमत २ रुपये

महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर.

# श्री स्वामी शिवानंद

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर.

प्रकाशक :—

**गो. वा. कुलकर्णी,**

महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर

प्रथमावृत्ति

मुद्रक :—

**गो. वा. कुलकर्णी,**

सेवा मुद्रणालय, १६७ बी,

कोल्हापूर

# MESSAGE....

Salutations to the Supreme Being, the Indweller of all, the Reality behind all appearances, the Absolute that pervades all names and forms.

Lord Dattatreya learnt lessons from birds and beasts. To the man of wisdom the rumbling thunder, the rustling of dry leaves, the chirping of birds and the chatter of children, have, all of them, a spiritual message. God dwells in all. God speaks to us through all. His is not a message : but a call.

From within you the Lord calls. Listen to Him. The saints and sages of all times and climes listened to him. They attained Him. Even so you, too, can attain Him. Listen to Him. Meditate on Him. See Him in all. Love Him in all. Serve Him in all. Become one with Him.

That is the message that this inspiring book from the pen of Sri. B. R. Naik has for you. You can repay the debt of gratitude you owe to Sri. Naik only by becoming a saint yourself. May God bless Sri. Naik. May God bless you!

( *Swami Sivananda* )

## स्वामिजींचा संदेश —

सर्वांभूतीं असलेल्या त्या सच्चिदानंद स्वरूपाला, सभोंवार दिसणाऱ्या नामरूप वस्तूमात्रांतील जें केवळ नामरूपरहित अस्तित्व तत्त्व त्याला माझा नमस्कार असो.

दत्तात्रेयांनीं पशुपक्ष्यांपासूनहि पाठ घेतले. विजेचा गडगडाट, पानांची सळसळ, पक्ष्यांची किलबिल, बालकांचे चिमखडे बोल अशासारख्या सर्व गोष्टींतून शाहाण्या माणसाला आध्यात्मिक संदेश मिळत असतो. परमेश्वर सर्वांभूतीं आहे. तो सर्वांच्या मुखानें बोलतो. हा त्याचा केवळ संदेश असत नाहीं. हें त्याचें आवाहन असतें.

तो अंतर्यामी तुम्हास आवाहन करीत आहे. त्याची ती हांक ऐका. सर्व ठिकाणच्या आजपर्यंतच्या साधुसंतांनीं हेंच केलें आहे. त्यांनीं त्याची प्राप्ति करून घेतली. तुम्ही सुद्धां त्याची प्राप्ति करून घेऊं शकतां. त्याचें आवाहन ऐका. त्याचें चिंतन करा. सर्वांभूतीं त्याचें स्वरूप पहा. सर्व भूतमात्राविषयीं प्रेम म्हणजे त्याच्याविषयीं प्रेम, सर्व भूतमात्राची सेवा म्हणजे त्याची सेवा; हें लक्षांत घेऊन त्याची भक्ति करा. त्याच्याशीं एकरूप व्हा.

श्री. भ. रा. नाईक यांच्या या पुस्तकाचें तुम्हांसाठीं हेंच प्रतिपादन आहे.

परमेश्वराचे आशीर्वाद तुम्हाला व श्री. नाईक यांना लाभोत.

— शिवानंद

॥ श्रीराम ॥

# चार शब्द

स्वामीजींचीं इंग्रजी भाषेंत सरासरी शंभर चरित्रें प्रसिद्ध झालीं आहेत. हिंदीमध्यें पण एक चरित्र प्रसिद्ध झालें आहे. मराठीमध्यें शिवानंदजी-सारख्या जगप्रसिद्ध संतांचें चरित्र नव्हतें. त्याची उणीव श्री भगवान राघवेंद्र नाईक यांनीं भरून काढली आहे. ह्यापूर्वीं नाईकांनीं शिवानंदजींचें Sure ways of success in life ह्या पुस्तकाचें रूपांतर मराठी भाषेंत प्रसिद्ध केलें. त्याची प्रथमावृत्ति संपत आली आहे. लेखक तरुण, होतकरु व स्वामीजींचे शिष्य आहेत. ते प्रत्यक्ष स्वामीजीजवळ कांहीं दिवस राहिले आहेत. त्यांची भाषा जोरदार व आकर्षक आहे. त्यांच्या भाषेंत माधुरी आहे. ती वाचकांना तत्काळ रिझविते.

आधींच स्वामीजींचें चरित्र हृदयंगम व त्यास गोड गोड मनोरंजक भाषेची जोड मिळाल्यामुळें दुधांत साखर पडल्यासारखें झालें आहे. लेखकानें पुस्तक लिहिण्याची सुरुवात 'यशस्वी जीवन' ह्या पुस्तकापासून केली. यशस्वी जीवन ह्या पुस्तकानें पुष्कळांचें जीवन यशस्वी केलें; व लेखकास यश दिलें; त्याप्रमाणें हें चरित्रदेखील पुष्कळांस चारित्र्यवान् बनवील. लेखक एका शाळेचे मुख्याध्यापक आहेत. त्यांची वृत्ति प्रेमळ आहे. हा प्रेमळपणा त्यांचे भाषेंत व लिखाणांत पण उतरला आहे. महाराष्ट्र जनतेनें यशस्वी जीवन ह्या पुस्तकास उदार आश्रय देऊन महाराष्ट्राचे यशस्वी जीवनांत भर घातली आहे. त्याचप्रमाणें स्वामी शिवानंदजी यांचें चरित्र पण महाराष्ट्रीय तरुण पिढीस चारित्र्यवान् करील अशी मला आशा आहे.

—हरि ॐ आनंद (आंबेकर)

# PREFACE

Righteousness and Spiritual Idealism form the very root essence (moola tatva) of Bharatavarsha's hoary Culture. These great principles of life are the most precious gems in our cultural Heritage. The noble, unbroken line of saints, sages and mahapurushas have preserved these peerless teachings through hundreds of years and handed them down from generation to generation. They have thus enabled us also to obtain access to this lofty heritage of Yoga, Vedanta, Sanatan Dharma, Sadachara and Paropakara. Pujya Shree Swami Sivanandaji Maharaj of Rishikesh is one such great sage in our santa-parampara or Guru-parampara who is striving to revive and spread our sublime Vedantic and Dharmic Ideals in this present atomic Age, when such teachings are of the greatest necessity and indispensable for human welfare and peace upon earth. Sri Swami Sivanandaji is a towering spiritual personality known all over the modern world and whose main aim is the dissemination of spiritual knowledge and awakening of mankind throughout the world. The life of such persons illumines the path of Human Progress and evolution of mankind. Their words and actions show the way to ennoble ourselves and attain perfection. Their life and teachings are

a great Light amidst darkness. This is the unique value of knowing about them and their teachings, for verily we become inspired and experience a new awakening and a new strength within. Hence the importance of such a book as this present volume to us of this restless age filled so much with wrong ideals and with extreme likes and dislikes between men and nations. The supreme blessedness of this work however is the fact that this personality whose biography contains, is still alive with us today and you can have the supreme good fortune of gaining the living influence and inspiration of his personal darshan and upadesh.

Many books have been hitherto written on Swamiji's life but no adequate biography in Marathi has appeared up till now. We have to congratulate Sri B. R. Naik for this nice work. The biographer deserves the thanks of all Marathi reading public whom he has put under a joyous debt of gratitude by this signal service.

We wish this book widest possible circulation in the very best interest of the maximum benefit and welfare of all peoples of Maharashtra.

25-7-59. — *Swami Chidananda.*

धर्माचरण व सदाचार हा आमच्या भारतीय संस्कृतीचा पाया आहे. हीं आमच्या संस्कृतीमधलीं दोन रत्नें आहेत. आमचे येथील संतांच्या अखंड परंपरेनें हीं रत्नें जपून ठेवून आमचे हातीं हा अमोल ठेवा दिला आहे. त्यांनीं आपले अमर वाङ्मयांतून ही ठेव आमचे करितां कायम ठेविली आहे. यांत योग, वेदांत, सनातन धर्म, सदाचार, परोपकार इत्यादि विषयांवर विशेष भर दिला आहे. ही सनातन परंपरा चालू ठेवणाऱ्या संतांपैकीं हृषीकेशचे पूज्य श्री स्वामी शिवानंदजी हे एक आहेत. ह्यांनीं आमचे सनातन विश्वधर्माचा प्रचार सर्व जगभर केला आहे. ह्या ॲटम बॉंबचे युगांत ह्याची अत्यंत आवश्यकता आहे, हें जाणून ह्याचा प्रसार त्यांनीं ह्या विश्वाचे कोनाकोपरांतून देखील केला आहे. जगांत शांतता राहावी, सर्व जगानें गुण्यागोविंदानें राहावें, ह्याबद्दलची अत्यंत तळमळ त्यांचे मनास लागून गेल्यामुळें त्यांनीं आधुनिक प्रचार-तंत्राचा अवलंब करून शांतीचें लोण अखिल भूमंडळांत पोचविलें आहे. ह्यामुळें स्वामी शिवानंदजी जगद्वंद्य झाले आहेत. त्यांचा मूळ उद्देश हाच कीं, मानवी विचारांत क्रांति घडवून आणून, सर्व जगांत शांतता राहिली पाहिजे.

अशा थोर पुरुषांचें चरित्र मानवी उन्नति व उत्क्रांतीचा पथ फारच खुलवून दाखविते. त्यांचे बोल व त्यांची कृति, आमचे विचार उदात्त बनवून, आम्हांस मोक्षाचा मार्ग दाखविते. ह्या अशा अंधःकारमय युगांत त्यांचीं चरित्रें व उपदेश आमचा प्रगतिमार्ग उज्वलित करतात. अशा महात्म्याच्या चरित्र व उपदेशानें, आपणांस स्फूर्ति मिळून आपणांमध्यें नवजागृति व उत्साह उत्पन्न होतो. अशा ह्या अस्थिरता व अधर्मता

परमावधीस पोंचलेल्या युगांत तर ह्याची विशेष जरुरी भासते. ह्यांतील अत्यंत आनंदाची गोष्ट म्हणजे ज्यांचें हें चरित्र आज आपणांपुढें येत आहे ती व्यक्ति हयात आहे. त्यांचे दर्शनाचा व प्रत्यक्ष उपदेशाचा लाभ कोणीहि घेऊं शकतो.

स्वामीजींचीं आजपर्यंत पुष्कळ चरित्रें लिहिलीं गेलीं, पण मराठींत मात्र स्वामीजींचें चरित्र नव्हतें. ती उणीव सुयोग्य चरित्र लेखक श्रीयुत भगवान नाईक ह्यांनीं भरून काढून मराठी वाचकांवर अमोल उपकार करून ठेवले आहेत. अशा ह्या चरित्रास महाराष्ट्र जनता योग्य आश्रय देऊन, चरित्रकाराच्या ग्रंथाचें चीज करील अशी मला पूर्ण आशा आहे.

हृषीकेश
२५-७-५९

—स्वामी चिदानंद

—-*—

# लेखकाचें निवेदन :

'यशस्वी-जीवन' हा स्वामी शिवानंदांच्या God Realization या गाजलेल्या ग्रंथांचा अनुवाद दोन वर्षांपूर्वी प्रसिद्ध झाल्यापासून अनेक वाचकांनीं स्वामिजींचें एक चरित्र मराठींत प्रसिद्ध व्हावें अशी इच्छा व्यक्त केली. त्यांचे विचार मराठींत प्रसिद्ध व्हावेत व शक्य तर त्यासाठीं स्वतंत्र मासिक काढावें अशीहि सूचना कांहीं वाचकांनीं केली. याच सूचनेला अनुसरून प्रस्तुत पुस्तकाचे प्रकाशक श्री. दादा कुलकर्णी यांनीं 'उपासना-पत्रिका' या छोट्या नियतकालिकाच्या प्रकाशनाची जबाबदारी स्वतःकडे घेतली. गेलीं दोन वर्षे या पत्रिकेंतून स्वामिजींच्या कांहीं लिखाणाचा थोडाथोडा अनुवाद देण्यांत येत आहे. साहजिकच 'उपासना-पत्रिके'च्या वाचकांनींहि स्वामिजींचें चरित्र प्रसिद्ध व्हावें अशी इच्छा व्यक्त केली होती.

प्रस्तुत पुस्तक म्हणजे या वाचकांच्या सदिच्छेचें मूर्त स्वरूप होय. संतांचें चरित्र लिहिण्यांतील अडचणी सुज्ञ वाचकांना सांगण्याचें कारण नाहीं. साक्षात्कारी पुरुषांचा अधिकार नि मोठेपणा साक्षात्कारीच जाणतील. प्रस्तुतच्या छोट्या चरित्रांत स्वामिजींच्या विषयीं मीं जें कांहीं वाचलें, पाहिलें, जें वेगळेंपण अनुभवलें त्या गोष्टी मी माझ्या अल्पमती-प्रमाणें संकलित करून चरित्र-स्वरूपांत मांडल्या आहेत. यामुळें स्वामिजींचे कांहीं मूळ ग्रंथ वाचावयाची इच्छा कांहींना जरी झाली तरी हें लेखन सफल झालें असें होईल.

या चरित्राला चार शब्द लिहून देणारे स्वामी हरि ॐ आनंद (पूर्वाश्रमीचे श्री. हरि गणेश आंबेकर, बी. एस् सी.) एवढे एकच महाराष्ट्रीय गृहस्थ आज त्यांच्या आश्रमांत आहेत. आज त्यांच्या वयाला सत्तर वर्षें उलटून गेलीं आहेत. लोकमान्यांच्या सहवासांत त्यांनीं मोठें प्रभावी व्यक्तिमत्त्व प्राप्त करून घेतलें आहे. त्यांचें जीवन म्हणजे एक कर्मयोग आहे. स्वामिजींचे विचार मराठींत आणण्याच्या दृष्टीनें लागणारे सर्वतोपरीचें त्यांचें साहाय्य प्रस्तुत लेखकाला लाभलें आहे. मजवरील प्रेमानें त्यांनीं जे हे चार शब्द लिहिले आहेत त्यांतील वात्सल्याचा भाग वगळून घ्यावा. त्यांचे औपचारिक आभार मानणें मला अनुचित आहे.

स्वामी चिदानंद हे स्वामिजींच्या अधिकारी शिष्यांपैकीं आहेत. त्यांनीं दिलेली प्रस्तावना ही या पुस्तकाचें भूषण मानता येईल. त्यांना थोडेंबहुत मराठी समजतें. स्वामी हरि ॐ आनंद यांनींच त्यांच्या प्रस्तावनेचा अनुवाद दिला आहे. पुढील महिन्यांत ते अमेरिकेच्या दौऱ्यावर जात आहेत. त्यांचे आभार मानावेत तेवढे थोडे.

प्रस्तुत चरित्राचे प्रकाशक ती. दादा कुलकर्णी यांच्या प्रोत्साहनानें मी लेखनकार्यास आरंभ करूं शकलों. त्यांचें हें स्नेहपूर्ण प्रोत्साहन मला दीर्घकाल लाभो अशी माझी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

'यशस्वी जीवन' प्रमाणेंच वाचक याहि चरित्राचें स्वागत करतील अशी आशा व्यक्त करून हें निवेदन पुरें करतों.

'श्री रमाकुटी'<br>
माधवनगर<br>
आश्विन शु॥ दशमी शके १८८१

— भ. रा. नाईक

# स्वामी शिवानंद
## ( चरित्र व तत्त्वज्ञान )

अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| स्वामीजींचा संदेश ... ... | ३ |
| चार शब्द ... ... | ५ |
| स्वामी चिदानंदांची प्रस्तावना ... ... | ६ |
| लेखकाचें निवेदन ... ... | १० |
| जीवन ... ... | १ |
| व्यक्तिमत्त्व ... ... | ३७ |
| तत्त्वज्ञान ... ... | ५३ |
| शिकवण ... ... | ७७ |
| कार्य ... ... | ९५ |
| शंकासमाधान ... ... | ९९ |
| परिशिष्ट ... ... | १०७ |



श्री. भगवान नाईक, श्री स्वामी शिवानंद व हरि ॐ आनंद

" कै. सौ. आईच्या स्मृतीस."

# शुद्धिपत्रक

| अ. नं. | पान | ओळ | चुकीचा मजकूर | बरोबर मजकूर |
|---|---|---|---|---|
| | **Preface** | | | |
| १ : | ६ | : शेवटची : | Their life | : Their lives. |
| २ : | ५० | : १० : | ( crages ) | : ( crazes ) |
| २ : | ६३ | : ८ : | ( Yoga of Synthesfis ) | : ( Yoga of Synthesis ) |
| ४ : | ६३ | : १२ : | ( Yoge of Synthesfis ) | : ( Yoga of Synthesis ) |

# जीवन

> प्राप्य पुण्यकृतां लोकानुषित्वा शाश्वतीः समाः ।
> शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते ॥
> अथवा योगिनामेव कुले भवति धीमताम् ।
> एतद्धि दुर्लभतरं लोके जन्म यदीदृशम् ॥ भगवद्गीता.

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

महान् आत्म्याचा जन्म पुण्यवंशांत होतो असें भगवान् श्रीकृष्णांनीं सांगितलें आहे. पुण्यवंशांत जन्मलेल्या महान् पुरुषाची ही गोष्ट आहे. संतश्रेष्ठ व पंडितश्रेष्ठ अप्पया दीक्षित यांचें नांव संस्कृतच्या अभ्यासूंना चांगलेंच परिचित असेल. त्यांचें 'चातुर्मत सार संग्रह' हें वेदान्तावरील प्रसिद्ध पुस्तक होय. अलिकडे संस्कृतच्या कांहीं प्राध्यापकांनीं अप्पया दीक्षितांच्या कांहीं ग्रंथांविषयीं पी. एच्. डी. पदवीसाठीं संशोधन चालू केल्याचें कळतें. संस्कृत वाङ्मयाच्या वेगवेगळ्या शाखांतून अप्पया दीक्षितांनीं चांगलें अधिकारानें केलेलें लिखाण आज सुदैवानें उपलब्ध आहे. हा मोटा मनुष्य एकदां आपल्या पत्नीच्या गांवीं गेला. 'वेदान्तकेसरी' म्हणून त्यांचें गांवांत वाजत गाजत अगदीं भाऊगर्दीनें स्वागत झालें. इतक्यांत तेथें एक वृद्ध स्त्री हातांतील कांठी टेकत टेकत थेट अप्पया दीक्षितापर्यंत आली नि अगदीं बारकाईनें तिनें त्यांचा चेहरा निहाळला. "तूं माझ्या आक्काचा नवरा ना? काय तरी लोक गाजावाजा करतात!" असें म्हणून तिनें आपलीं पावलें घराकडे वळविलीं. नंतर अप्पया दीक्षित एवढेंच म्हणाले, "या गांवांत आक्काचेंच नांव सगळ्यांना माहीत आहे. तिचा नवरा म्हणूनच मला येथें लोक ओळखणार!" अप्पयांचा आध्या-

त्मिक अधिकारहि मोठा होता. लोक त्यांना साक्षात् शिवाचे अवतार मानीत. तिरुपतींच्या मंदिरांत एकदां शिवभक्त म्हणून अप्पयांना प्रवेश नाकारला. आणि सांगावयाचें आश्चर्य तें हें कीं, दुसरे दिवशीं सकाळीं पुजाऱ्यांना त्या विष्णुमूर्तीचें शिवरूपांत परिवर्तन झाल्याचें आढळलें. मग मात्र त्यांनीं अप्पयांचे पाय धरले नि आपल्या इष्टदेवतेचें रूप होतें तसें करण्यास सांगितलें. अर्थात् तें तसें केलें गेलें हें सांगणें नकोच. असे हे अप्पया दीक्षित मोठे सिद्धपुरुष होऊन गेले. इ. स. १६ व्या शतकाच्या मध्यास ते होऊन गेले. त्यांच्याच वंशांत या चरित्रनायकाचा—स्वामी शिवानंदांचा—जन्म झाला.

स्वामिजींच्या जन्मगांवाचें नांव पट्टमादाई. ताम्रपर्णी नदीनें वेढलेलें हें गांव म्हणजे एक निसर्गरम्य ठिकाण आहे. भाताचीं शेतें नि आम्बराई यामुळें वनश्री मोठी रम्य दिसते. याच ठिकाणीं त्यांचे वडील तहसील-दाराच्या हुद्यावर काम करीत. मोठे शिवभक्त नि सद्गुणी म्हणून त्यांची सुकीर्ति होती. या गांवचें निसर्गरम्यतेखेरीज दुसरें एक वैशिष्ट्य म्हणजे त्या ठिकाणची संगीताची परंपरा. येथील मुलांना जन्मतःच जणुं संगीताची पारख करण्याचें व त्यांत रमण्याचें बाळकडू मिळालेलें दिसतें.

श्री. पी. एस्. वेंगु अय्यर व श्री. सौ. पार्वती अम्मा यांच्या पोटीं स्वामिजींचा जन्म दि. ८ सप्टेंबर १८८७ रोजीं गुरुवारीं सूर्योदयाच्या वेळीं, भरणी नक्षत्र चालू असतांना झाला. त्यांचें कुप्पुस्वामी असें नांव ठेवण्यांत आलें. सुदृढ शरीरप्रकृति नि घरांतील चांगलें वळण यामुळें ते लहानपणींच तेथील सर्वांचे आवडते झाले. मद्रासचे गव्हर्नर एकदां त्या गांवीं शिकारीसाठीं आले. त्या वेळीं स्वागताचें भाषण करण्यासाठीं व स्वागतपद्य म्हणण्यासाठींहि त्या लहान वयांत गांवकऱ्यांनीं किशोर कुप्पूची निवड केली. शाळेंतहि त्यांचा वरचा नंबर असे. १९०३ मध्यें मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्यांनीं त्रिचनापल्लीच्या S. P. G. college मध्यें आपलें नांव दाखल केलें.

पुढें त्यांनीं वैद्यकीय शिक्षणक्रमाची निवड केली. एकदां या शिक्षण-क्रमाची निवड केल्यावर त्यांतील जास्तींत जास्त ज्ञान मिळविण्याचा

त्यांनीं खूप प्रयत्न केला. हॉस्पीटलांतून जाणें, तेथील डॉक्टरांना तऱ्हतऱ्हेनें मदत करणें, वेगवेगळ्या औषध-योजनांचें अनुभव अभ्यासणें इत्यादि गोष्टींचा त्यांनीं विद्यार्थी असल्यापासूनच छंद घेतला. घरांतील लोक त्यांना वैद्यकीय अभ्यासक्रम सोडून दुसरा एखादा त्यापेक्षां अधिक मानाचा, वेतनाचा असा अभ्यासक्रम घेण्याविषयीं परोपरीनें सांगत होते. तें सहाजिकच आहे. कारण कुप्पुस्वामीजवळ शारीरिक सुदृढता होती, बुद्धिमत्ता होती व भरीला वेगवेगळ्या परीक्षांतून अव्वल दर्जाचें यश कमावून मिळविलेलीं प्रमाणपत्रेंहि होतीं. परंतु त्यांनीं एकदां पूर्ण विचार करून पत्करलेला हा अभ्यासक्रम सोडला नाहीं. ही गोष्ट मोठी विचार करण्यासारखी आणि आम्हा व्यावसायिकांना मार्गदर्शन करणारी व तशीच उमेद देणारी आहे.

याच सुमारास त्यांनीं केलेली आणखी एक गोष्ट उल्लेखनीय आहे; आणि ती म्हणजे वैद्यकीय विषयावर त्यांनीं इंग्रजींत चालू केलेलें Ambrosia नांवाचें मासिक. हें मासिक त्यांनीं पुढें वैद्यकीय व्यवसायासाठीं मलायाला जाईपर्यंत म्हणजे चार वर्षें अगदीं यशस्वीपणें चालविलें. या मासिकांत येणारे लेख वैद्यकीय विषयावरीलच असत, परंतु या लेखांतील विचारांची बैठक आध्यात्मिकच असे. तारुण्यांतील त्यांची आत्मचिंतनाची ओढ त्यांच्या या मासिकांतील विविध लेखांवरून स्पष्ट दिसते.

जीवनांत स्थैर्य आणण्याच्या दृष्टीनें त्यांनीं एका हॉस्पीटलामध्यें नोकरी पत्करिली. परंतु जबाबदारीचीं कामें, जबाबदारीची जागा आपण निवडलेल्या क्षेत्रांत आपणास मिळावी असें त्यांना साहजिकच वाटत होतें. त्यामुळें लवकरच त्यानीं हॉस्पीटलांतील नोकरी सोडली व मलायांतील वसाहतींत कूच केलें. डॉक्टर आपल्या या धाडसाचें मोठें मजेशीर वर्णन करतात. जवळ पैसा अपुरा, देश परक्यांचा नि कुणाची ओळख ना पाळख! अशा परिस्थीतींत स्वतःजवळच्या जबरदस्त महत्त्वाकांक्षेमुळेंच केवळ ते मार्ग काढूं शकले.

बोटींत कशा प्रकारचें अन्न मिळेल याची कल्पना नाहीं. मांसाहाराच्या तर नुसत्या कल्पनेचीच त्यांना दहशत वाटत होती. आईनें तयार करून

दिलेलें कांहीं गोड थोड अपुरें पडलें. डॉक्टर जवळजवळ भुकेनें खंगलेल्या स्थितींतच मलायांत पोहोचले. मलायांत जाणें हें त्यांच्या दृष्टीनें फारच मोठें धाडस होतें. तिकडें कांहीं जमलें नाहीं तर परत यावयाचें म्हटलें तरी त्यांना तें अशक्य होतें. केवळ जबरदस्त इच्छाशक्ति नि निर्धार या ज्या दोन गोष्टी त्यांच्याजवळ तरुणपणापासून होत्या, त्यांचाच त्यांना पुढें अध्यात्माच्या साधनमार्गांत उपयोग झाला.

पाय मागें खेचणाऱ्या निराशाजनक गोष्टींचा अनुभव सुरुवातीलाच आला. परंतु पुढें कांहीं दिवसांनीं एका डॉक्टरांची चांगली ओळख झाली. त्यांच्या ओळखीनें तेथीलच एका हॉस्पीटलांत त्यांना नोकरीहि मिळाली. जबाबदारीच्या जागेची हांव बहुतांशीं तरुण नोकरवर्गांत असतेच. त्या जागेसाठीं लागणारे कष्ट सुरुवातीला घेण्यासहि कांहीं तयार असतात परंतु जबाबदारीच्या जागेसाठीं कष्ट घेऊन, त्या कष्टांतच अत्यानंद मानणारे डॉक्टरांच्यासारखे लोक थोडेच असतात. त्यांच्या व्यावसायिक व पारमार्थिक यशाचें बीजच या स्वभावांत सांपडतें. जबाबदारीच्या जागेवरील कष्ट करण्याची संधी हाच मोठ्यांतला मोठा मान ज्यांना वाटतो त्यांच्याजवळ तें कार्य करण्याची उमेद असतेच. एकदां का एखादी गोष्ट करावयाची ठरविली कीं, त्यासाठीं सर्व शक्ति एकवटायची नि इतर कोणत्याहि व्यग्रता उत्पन्न करणाऱ्या इतर गोष्टींपासून दूर राहावयाचें हा यशाचा मूलमंत्र आहे, असें कित्येक मोठ्या लोकांनीं सांगितलें आहे. पण हें फार थोड्यांना जमतें नि त्यासाठीं साधनाहि तशीच करावी लागते. डॉक्टर या दृष्टीनें फार सुदैवी ठरले. चांगल्या संस्कारांचा परिणाम म्हणा, डॉक्टर हातांतील कामाशीं नेहमींच एकरूप होत. एखादी भावना मनांत आणली कीं, बाकीचे भाव हे त्यांच्या दृष्टीनें अभावच. एरवीं कितीहि जरी केलें तरी विक्षेप हा येतोच मनाला ताब्यांत ठेवतांना व हातीं घेतलेल्या कार्यांत एकाग्रचित्तत्व साधण्यास किती त्रास पडतो! या तरुण डॉक्टराचें मन कदापि चळलें नाहीं.

विषयापासून उद्भवलेलीं दुखें आपणांला दिसत का नाहींत? दिसतातच. परंतु विषयासाठीं इंद्रियांची वखवख नि मनाची व्यग्रता का सुटली

आहे? भगवान् बुद्धानें मानवी जीवनांतील दुःख एकवार निहाळलें. त्याला तेवढेंच दर्शन पुरेसें ठरलें. त्यानंतर त्यानें घेतलेला शाश्वत सुखाचा ध्यास कधीं भंगला नाहीं. हा प्रयोग, तो प्रयोग, हा मार्ग, तो मार्ग असे अनेकविध मार्ग चोखाळले पण ध्यास एकच. तळलेलें बी कधीं अंकुरित झालें आहे काय? पूर्वसंस्कार, इच्छाशक्ति, निर्धार यांच्या जोडीला आणखीहि एक गोष्ट डॉक्टरांना विकासाच्या दृष्टीनें उपयोगी पडलेली असावी. आणि ती म्हणजे ज्या हिंदी मजुरांच्या परिसरांत ते राहिले होते त्या मजुरांच्या दुःखद नि केविलवाण्या परिस्थितीचें दर्शन.

मलायांतील रबर इस्टेटस्मध्यें मजुरी भरपूर मिळेल, कुटुंबियांना बऱ्यापैकीं दिवस येतील या विचारानें किती तरी हिंदी मजूर तिकडे गेले होते. जनावरांनीं करण्याचें काम त्यांना करावें लागे. कुटुंबियांपासून दूर असलेल्या या लोकांनीं दिवसभराचा शिणवटा दूर करावयाचा म्हटला तरी तशी सात्त्विक करमणूक कुठली मिळायला! या तरुण मजुरांनीं निसर्गदत्त विकार दाबावयाचे म्हटले तरी त्यांना मद्याचा आसरा शोधावयाची पाळी यावयाची. अशा लोकांच्यासाठीं डे क्लब्ज, नाईट क्लब्ज चालविलेले होते. दिवसभर वा रात्रभर गुरासारखी राबणूक नि उरलेल्या वेळीं अशा या ठिकाणांचा आसरा!

अशा परिस्थितींत पोलादी शरीरप्रकृतीचेंहि मातेरें होण्यास वेळ कितीसा लागणार? अशा तऱ्हेच्या आसऱ्यांच्या ठिकाणांतून विकारांच्या वखवखीची वाढच झाल्याचें डॉक्टर निहाळत होते. गात्रेंन् गात्रें निःशक्त झालेल्या तरुण वयांतील मजुरांची शुश्रूषा डॉक्टरांनीं अगदीं मातेच्या ममतेनें केली. रोग्याला प्रसन्नता प्राप्त करून देण्यांत तर त्यांचा हातखंडा होता. विकारांच्या या भेसूर स्वरूपाच्या दर्शनाचा परिणाम डॉक्टरांच्यावर झाला असें निश्चित जरी म्हणतां आलें नाहीं तरी एवढें मात्र समजून चालतां येईल कीं, त्यामुळें विषयसुखाबाबतची वस्तुस्थितीला धरून असणारी दोषदृष्टि अधिक दृढमूल झाली असावी. कारण ज्या भावना त्यांनीं मनांत वागविल्या, ज्या गोष्टीचा त्यांनीं छंद घेतला त्यामुळें त्यांची मानसिक उन्नति जणुं विद्युत् वेगानेंच होत होती. वस्तुस्थितीची नीट

समज यावयास त्यांना फारसे प्रयास यामुळेंच पडले नाहींत. चांगल्या घराण्यांत जन्माला आलेल्या अनेक योगभ्रष्टांची कथा ही अशीच असते. जवळची गोष्ट इतरांबरोबर वांटून घ्यावयाची, इतरांना जेवढें मिळेल तेवढ्याचाच स्वीकार करावयाचा, ही त्यांना जन्मत: लाभलेली सत्त्वगुणप्रधान गोष्ट त्यांना फार साहाय्यक ठरली. याच्या भरीला त्यांच्याजवळचा विनोदी स्वभाव नि खिलाडुवृत्ति; यामुळें त्यांचें व्यक्तिमत्त्व अगदीं मधाच्या मोहोळासारखे वाटे.

त्यांना कोणत्या गोष्टींचा विशेष शोक नव्हता, अशांतील प्रकार बिलकूल नव्हता. चांगला पोषाख करावा, वेगवेगळ्या तऱ्हेच्या सोन्याच्या अंगठ्या आणाव्यात, अशाच स्वरूपाच्या उंची वस्तूंची खरेदी करावी, असा प्रकार त्यांच्या बाबत अनेक वेळां घडे. एकदां तर त्यांनीं अनेक प्रकारच्या उंची हॅट्स् विकत आणल्या. दुकानदाराशीं हुज्जत घालणें वा मालाची निवड करणें या गोष्टी जणुं त्यांना अपरिचितच होत्या. परंतु या वस्तूविषयीं त्यांना कधीं आसक्ति वाटली नाहीं. मनाला आल्हाद देणारी वस्तु म्हणून विकत घ्यावयाची नि कुणी मागितली तर ती वस्तु देण्याचा आनंदहि तितक्याच तत्परतेनें मिळवायचा असा त्यांचा प्रकार होता. पुस्तक-खरेदी बाबत जरी ते चोखंदळ असले तरी त्या वेळीं उपलब्ध असलेल्या सर्व वैद्यकीय इंग्रजी पुस्तकांपैकीं पुष्कळशीं पुस्तकें त्यांनीं विकत घेऊन अभ्यासलीं होतीं. ट्रॉपिकल डिसीजच्या उपचाराबाबत तर त्यांनीं अद्यावत् ज्ञान प्राप्त करून घेतलें होतें.

कष्ट करणाऱ्या माणसालाच कामहि अधिक करावें लागतें नि फुरसदहि मिळते. डॉक्टरांच्या कामसू नि उदार स्वभावाचा फायदा घ्यावयाला त्यांच्या सहकाऱ्यांनीं कोणत्याहि तऱ्हेनें कमी केलें नाहीं. आपलें एखादें काम वेळोवेळीं, वारंवार डॉक्टरांच्यावर सोपविण्यांत त्यांना कांहीं वाटत नसे. परंतु डॉक्टरांनीं कधीं त्याबाबत तक्रार केली नाहीं; वरिष्ठाकडे त्याबाबत कांहीं कळविलें नाहीं. यांतून त्यांना कांहीं व्यावहारिक गोष्टी साधावयाच्या म्हणावें तर तसाहि कांहीं प्रकार नव्हता. जो व्यवसाय आपण आवडीनें पत्करलेला आहे त्या व्यवसायाचें जास्तींत जास्त ज्ञान व

अनुभव आपण घ्यावा व त्या व्यवसायांत आपलें एक महत्त्वाचें स्थान प्राप्त व्हावें अशी एखादी कांक्षा त्यांच्या मनांत असेलहि कदाचित्; परंतु त्या व्यवसायांतील पडेल तेवढें कष्ट घेण्याचा मनस्वी आनंद ते घेत होते एवढें मात्र निश्चित. वरिष्ठाच्या पुढें पुढें करून वा अन्य मार्गानें एखादी नोकरींतील वरची श्रेणी प्राप्त करून घ्यावयाचें तर त्यांच्या स्वप्नींहि नव्हतें. पगार भरपूर मिळे, बढती, बोनस हे प्रकार होतेच. शिवाय प्रायव्हेट प्रॅक्टीसहि भरपूर. डॉक्टरांच्या जवळ खूप पैसा येई व तसाच तो जाई. पैसे घेण्यापेक्षांहि नडीच्या माणसांना देण्यांत त्यांना विलक्षण आनंद होई. ही देण्याची रक्कम तर कधीं कधीं इतकी असे कीं, तेवढ्यासाठीं ते जवळच्या कांहीं मौल्यवान् गोष्टीहि देऊन टाकीत. ही गोष्ट ठाऊक असलेल्या एका बँक मॅनेजरनें तर अनेक वेळां त्यांचे चेक सुट्टीच्या दिवशींहि वठवून दिले. आज कित्येक वेळां त्यांच्या उपदेशपत्रांत 'Give, Give generously, that is the secret of abundance.' अशा तऱ्हेचें एखादें बोधवाक्य असतें. अशा तऱ्हेचा उपदेश देण्यास स्वामिजी सर्वस्वी अधिकारी आहेत.

असमर्थ रोग्याला औषध मोफत द्यावयाचें व त्याचबरोबर त्याच्या पथ्याच्या दृष्टीनें जरूर ती सोय करावयाची ही गोष्ट तर त्यांना केवळ स्वतःवरच पडलेली जबाबदारी वाटे. दुःख हें आसक्तीमुळें अत्यंत भयावह वाटतें; धीर खचूं देणारें ठरतें. एरवीं दुःखाचा व व्याधींचा वस्तुनिष्ठ विवेक माणसाला प्रयत्नाची कांस सोडावयास लावत नाहीं. मनाची उमेदहि नष्ट होत नाहीं. आंधळ्या आसक्तीपेक्षां विवेकानें केलेली ही वस्तुनिष्ठ विचारसरणीच आत्मौपम्य बुद्धीला जवळची असते. गंभीर स्वरूपाच्या रोग्याजवळ कित्येकदां रात्रभर ते बसून राहात. पण औदासीन्य, आळस, नाउमेद इत्यादि गोष्टी त्यांना स्पर्श करूं शकल्या नाहींत.

आपल्या जवळच्या हर्ष, शोक, विषाद, ईर्ष्या इत्यादि परस्पर विरोधी भावनांची शक्ति परस्परांना पूरक ठरेल या पद्धतीनें हातांतील एकाच चांगल्या कार्याशीं जोडता येणें ही किती भाग्याची गोष्ट आहे! एवढी

गोष्ट जरी साध्य झाली तरी जीवनाचें सार्थक झालें असें मानणारे कित्येक महाभाग आहेत.

डॉक्टरांना या गोष्टीसाठीं फार प्रयास पडलेले दिसून येत नाहींत. प्राप्त कार्यांत त्यांचा वेळ मोठ्या मजेंत जाई. मनाची ओढाताण नाहीं. विषयापासून दूर राहण्यासाठीं प्रयत्नांची पराकाष्ठा नाहीं. रोग्यांची शुश्रूषा नि संकीर्तन यांतच त्यांच्या जीवनाचें नंदनवन बहरत होतें. सहजतेनें लाभलेल्या या निर्द्वंद्व मनःस्थितीचा कुणालाहि हेवा वाटावा. त्यांचें आजवरचें कार्य, उपदेशपत्रें, जीवन इत्यादि गोष्टी पाहिल्यावर हें पटतें कीं, केवळ विहित गोष्टींचेंच चिंतन केल्यानें निषिद्ध सहजप्रवृत्तींचें उदात्तीकरण विशेष सायास न करतांच घडून आलें. शक्तीचा जणूं अंश न् अंश प्राप्त कार्यांत गुंतलेला असावयाचा. कुणाहि अभ्यागताला असें वाटावयाचें कीं, जीवनांतील आनंदाचा पुरेपूर आस्वाद हा घेतो आहे. डॉक्टरांचा हा इस्पीतळांतील सेवाधर्म म्हणजे एक प्रकारची सविकल्प समाधिच होती. सेवेच्या एका वृत्तिविशेषावरच त्यांची साधना प्रगत होत होती.

जन्मतःच संगीताचें बाळकडू असल्यानें फुरसतीच्या वेळीं डॉक्टर गात, परंतु संकीर्तनाचा विशेष षोक. इतका कीं, इष्टमित्रांच्या घरींहि जाऊन संकीर्तनें करीत. संकीर्तन म्हटल्यावर त्यांच्या बरोबर साथीदार असावयाचेच. हे साथीदार ठराविक असत असा बिलकूल प्रकार नव्हता. साथ करतां आली म्हणजे झालें. त्याचा सामाजिक दर्जा मग कोणता का असेना ! इष्टमित्रांच्या घरीं एखादा समारंभ वगैरे असेल त्या वेळीं डॉक्टर उपस्थित राहात; परंतु बरोबरचे साथीदार घेऊन तिथें असा एखादा कार्यक्रम केल्याखेरीज राहात नसत.

रामदासांनीं म्हटल्याप्रमाणें तें अगदीं मोकळेपणानें ( निर्लज्ज ) कीर्तन करीत. परंतु सगळ्याच यजमानांना अशी रुचि असते असें नाहीं. मोकळ्या मनानें श्रवण करणारे श्रोतेहि हवेत डॉक्टरांच्या या वागणुकीमुळें त्यांना विवाहसमारंभाचें वा तत्सम एखाद्या मंगलकार्याचें आमंत्रण देतांना कांहीं लोक कचरत; परंतु डॉक्टर मुद्दाम त्यांना आठवण करुन आमंत्रण

लावून घेत. मग तेथें गेल्यानंतर मंडपांत एखादें संकीर्तन हें व्हावयाचेंच. वागणुकीची ही तऱ्हा त्यांच्या स्नेह्यांना विचित्र वाटणें यांत वावगें तें काय ? डॉक्टरांनीं आपल्या कार्यामुळें, ज्ञानामुळें, अनुभवामुळें आपल्या व्यवसायांत फार मोठी प्रतिष्ठा मिळविली होती हें एक व दुसरें म्हणजे नडीच्या माणसाला हुकुमी आधार असे तो डॉक्टरांचाच, त्यामुळें त्यांच्या वागणुकींतील हें वैचित्र्य निंदास्पद कदापि झालें नाहीं. अर्थात् त्यांची ही भावाभिव्यक्ति अंतःकरणापासून होती हा भाग वेगळाच.

जें कांहीं करावयाचें आहे तें उघडपणें करावयाचें, मोकळेपणानें करावयाचें, अगदीं अंतःकरण ओतून करावयाचें हा त्यांचा स्वभाव होता. अशा स्वरूपाच्या गोष्टीसाठीं फार मोठें धैर्य लागतें, निर्धार लागतो. तो त्यांच्याजवळ होता. आत्मज्ञानाच्या मार्गाकडे वळावयाचें म्हटलें तरी चांगल्या गुणांची जोपासना करावी लागते. तेवढ्यासाठीं खडतर साधना करून चित्तशुद्धि करावी लागते. अशा चांगल्या गुणांचें अस्तित्व डॉक्टरांच्याजवळ प्रथमपासूनच होतें. वंशागत संस्कार होते ते. शुद्धबीजापोटीं फळें रसाळ गोमटीं, याप्रमाणें त्यांचें व्यक्तिमत्त्व गोमटें होतें. साक्षात्कारी साधूचें चरित्र वाचतांना त्याच्या जीवनकालांत, साधनापूर्व कालांत आपल्याला जवळचें, आपल्यासारखेंच कांहीं त्याच्या जीवनांत आहे का हें पाहण्याची साधारण वाचकांना फार उत्कंठा असते. तें रास्तच आहे. सामान्यांतून वरच्या पायरीला गेलेल्या लोकांचीं जीवनचरित्रें बहुजनांना प्रेरक असतातच. अगोदरच ज्यांची प्रारंभिक तयारी झाली आहे अशांचें जीवनहि तितकेंच मार्गदर्शक नि प्रेरक असतें. सफलतेच्या दृष्टीनें त्या प्रारंभिक तयारीचें महत्त्व, प्रारंभिक तयारीनंतरची योग्य मार्गानें करावयाची वाटचाल या दृष्टीनें अशा जीवनचरित्रांचें महत्त्व कोणी नाकबूल करणार नाहीं.

एकंदरींत अशा स्वरूपाचें गतिशील व्यक्तिमत्त्व परिवर्तित होणें क्रमप्राप्त असेंच होतें. ऐहिकाचा मार्ग टाकून परमार्थाकडे वळलेल्या महाराष्ट्रीय संतांची आठवण या ठिकाणीं होते. कांहीं संताच्या बाबतींत त्यांनी परमार्थाकडे घेतलेलें वळण हा एक कुठल्या तरी दुःखद बाह्य

घटनेचा परिणाम असतो. कांहींच्या बाबतींत अशा वळणांचा वा बाह्य घटनांचा फारसा संबंध असत नाहीं. अशी भिन्नता संतांच्या जीवन-चरित्रांतून पाहावयाला मिळणारच. कारण परमेश्वराची योजनाच अशी असते कीं, त्यामुळें प्रत्येकाला त्याच्या विकासाला अनुकूल होईल अशी परिस्थिति प्राप्त होत असते. नुकतेंच ज्या वेळीं स्वामिजींचें आत्मचरित्र प्रसिद्ध झालें त्या वेळीं कांहीं वाचकांनीं त्यांच्या साधनाकालांतील आणखी कांहीं गोष्टी समजून घेण्याची उत्सुकता दर्शविली. खुद्द आत्म-चरित्रांतच अशा स्वरूपाच्या उत्सुकांना स्वामिजींनीं उत्तर दिलें आहे. ते म्हणतात, 'प्रत्येकाला वेगवेगळ्या परिस्थितीला तोंड द्यावें लागतें. प्रत्येकजण भिन्न भिन्न परिस्थितींतून जात असतो. त्याला माझे सर्वच अनुभव उपयोगी पडण्यासारखे नाहींत. मग कारणाविना सर्वच बारीक-सारिक घटनांचा उल्लेख करण्यांत कांहींच अर्थ नाहीं.'

व्यवसाय किती जरी नेटकेपणानें केला तरी त्यांत फिकेपणा हा येणारच. किती केलें तरी देहाच्या साहाय्यानें मिळविलेली ती गोष्ट! देहाला क्षय हा ठरलेलाच. विवेकानें संसार नेटका करीत असतांना पुढचें पाऊल टाकण्याचा विचार त्यानें फार काळ लांबणीवर टाकणें इष्ट असत नाहीं. सात्त्विक सुखाचाहि अपुरेपणा डॉक्टरांच्या अनुभवाला येत होता. अशा अनुभवांच्या चिंतनाबरोबरच आध्यात्मिक ग्रंथांचाहि अभ्यास चालू होता. मनांत वैराग्य निर्माण झाल्यावर क्षणाचीहि उसंत घेऊं नका असें म्हणतात. श्रुति अभ्यासावयाची असेल तर त्यासाठीं संन्यास हवा. डॉक्टरांनीं आपला विचार पक्का केला नि एके दिवशीं निष्णात डॉक्टरीची प्रतिष्ठा, पैसा, सुकीर्ति, स्वास्थ्याचें नि सुखाचें जीवन कायमचें सोडलें. १९२३ साल होतें तें. डॉक्टरांनीं नुकतीच पस्तिशी ओलांडली होती.

मिथिला नगरीचें दहनसत्र चालू असतां वेदान्त चर्चेत निमग्न झालेल्या जनकराजाच्या या विलक्षण अनासक्त कृतीपासून तो थेट प्राप्त व्यवसाय सोडून भूदान यज्ञाच्या कार्यांत अंतःकरण ओतून कार्य करीत असलेल्या आजच्या डॉक्टर्स, इंजिनियर्स, शिक्षक इत्यादींच्या बाबतींत निर्माण होणारी एक सनातन शंका आहे. प्राप्त कर्तव्य कांक्षा-राहित्यानें करण्या-

क्रमांक ९५५९
नों. दि.

पलिकडे परमार्थ असा वेगळा नाहीं ना? परमेश्वरप्राप्ति त्यांतून सामावलेली आहे ना? मग वरच्या सारख्या गोष्टींतून [illegible] धडपड कशासाठीं? प्राप्तव्यवसायाचा संन्यास कशासाठीं? या लोकांचें हें चतुर शहाणपण व्यावहारिक शहाणपण सांभाळणाऱ्या सामान्यांच्या आकलनांत कसें येणार, असे कांहींजण म्हणतात. मनोवृत्तींत योग्य तो बदल झाला म्हणजे झालें. बाह्य वेषांत वा कार्यांत बदल करण्याचें काय प्रयोजन? मला या ठिकाणीं एका मानसशास्त्रज्ञाच्या शोधाची आठवण होते. तो म्हणतो कोणतीहि भावना मनांत निर्माण होण्यापूर्वी देहाकडून त्या भावनेला अनुकूल असे हावभाव प्रथम होतात. दुःखाच्या बाबतींत रडणें वा डोळ्यांतून पाणी येणें इत्यादि क्रिया आगोदर होतात व मग दुःखाची भावना निर्माण होते असें तो म्हणतो. हा मुद्दा बहुतेकांना पटण्यासारखा नाहीं ही गोष्ट वेगळी! परंतु अशा स्वरूपाच्या भावनानुकूल अंगविक्षेपामुळें त्या त्या भावनेची तीव्रता वाढत असल्याचें मात्र आपल्या अनुभवाला स्थूलमानानें येतें. तसेंच प्राप्त व्यवसाय सोडून दुसऱ्या एखाद्या अनासक्त सेवेच्या कार्याचें शिक्कामोर्तब स्वतःवर करून घेण्यांत अशाच स्वरूपानें जरूर त्या भावनेचें दृढमूलीकरण सुलभ जात असावें. असो. राजस भावनांच्या पायीं क्षणोक्षणीं अस्थिरतेचा अनुभव घेण्यापेक्षां आत्मप्राप्तीसारख्या शाश्वत सौख्याच्या प्राप्तीसाठीं अंतराची घालमेल होणें, तो अनाहत नाद उमटणें व त्याप्रमाणें कृति घडणें या भाग्याचें मूल्यमापन आम्हासारख्यांना अशक्य एवढें खरें.

एके रात्रीं आपला हजारो रुपये नि त्याहिपेक्षां अधिक लोकांचें प्रेम संपादन करून देणारा व्यवसाय डॉक्टरांनीं सोडला. जन्मभूमीस जावें, जवळच्या मित्रांना ही अंतरीची व्यथा ऐकवावी व त्यांच्या सदिच्छेची शिदोरी बरोबर घेऊन जरूर ती उमेद प्राप्त करून घ्यावी असें त्यांच्या मनांत एकवार येऊन गेलें. मलाया सोडून डॉक्टर गांवीं आले. जवळ थोडेंबहुत सामान होतें. कुणातरी मित्राच्या घरीं हें उरलें सुरलें सामान टाकावें या इराद्यानें ते आपल्या एका बालमित्राच्या घरीं आले, पण तो घरांत नव्हता. पुरुषमाणूस घरीं नसतांना बायकामाणसांना निरोप

सांगणेंहि तितकेसें तिकडच्या आचाराला धरून नव्हतें. डॉक्टर तसेच बाहेर पडले. कुणीतरी परिचित गृहस्थ भेटला तर काय छान होईल! त्याच्याजवळ तरी मित्रासाठीं निरोप ठेवतां येईल अशा विचारांतच डॉक्टर होते. पण कर्मधर्मसंयोग असा कीं, तो मित्रच त्यांना वाटेंत गांठ पडला. या साध्या घटनेचाहि डॉक्टरांच्या मनानें वेगळा अर्थ घेतला. आपल्या संकल्पित कार्याच्या शुभारंभाचें सुचिन्हच जणु!

आपल्या बालमित्राच्या निश्चयाची दृढता माहीत असलेल्या त्या मित्रानें डॉक्टरांचा तो विलक्षण बेत ऐकून कांहींहि उच्चारलें नाहीं. सांगावयाचें तें सांगून झाल्यावर डॉक्टरांचेंहि मन तिथें एक क्षणभरहि थांबावयाला तयार नव्हतें. विवेकानें निर्माण झालेली अंतरांतील अशांति त्यांना स्वस्थ बसूं देत नव्हती. विवेकानें निर्माण झालेली ही अशांति त्यांना विवेकानेंच दूर करावयाची होती. विवेकाला पटलेल्या गोष्टींचें आचरण करण्यांत तसूभरहि माघार घेण्याची त्यांची तयारी नव्हती.

केवळ व्यवहाराच्या दृष्टीनें कांहीं औपचारिक निरोप द्यावयाचा म्हणून त्यांनीं आपल्या मित्राला सांगितलें, 'माझें हें सामान तुझ्याजवळ राहूं दे. बॅगेंत कांहीं पैसेहि आहेत. मला त्याची सध्यां जरूर नाहीं.' याच गांवांतील एक मनुष्य १९३९ मध्यें स्वामिजींना हृषीकेशमध्यें येऊन भेटला. त्यांनें बोलतां बोलतां सांगितलें, 'श्री. ...... यांनीं तुमचें सामान, पैसे तसेच ठेवले आहेत आणि अजूनहि तो तुमच्या परतीची वाट पाहात आहे.'

डॉक्टर या ठिकाणाहून जे निघाले ते काशीला आले. काशीविश्वेश्वराचें दर्शन घेऊन नाशिकला आले. तेथून पुण्याला आले. देहू, आळंदी इत्यादि ठिकाणीं जाऊन आल्यावर पुण्याहून पंढरपुरापर्यंत ते पायीं आले. वाटेंत दोन दिवस केडगांवच्या नारायणमहाराजांच्याकडे त्यांनीं मुक्काम केला. त्यानंतर मात्र जवळ जवळ चार महिने त्यांनीं चंद्रभागेच्या काठीं काढले. या भ्रमंतींत त्यांना अनेक तऱ्हेचीं माणसें भेटलीं. त्यांच्याशीं कसें जमवून घ्यावयाचें हेंहि ते शिकले. योगी नि महात्मे यांचेंहि दर्शन झालें. त्यांच्यापासून तर त्यांना अनेक गोष्टी शिकतां आल्या. केवळ आत्मप्राप्तीसाठीं

पत्करलेल्या या मुशाफिरींतील सुखदुःख आम्हा संसारी जनांना कसें आढळणार ?

या मुशाफिरीविषयीं आज बोलतांना डॉक्टर म्हणतात, ' जीवनांतील उमेदीचीं वर्षें केवळ या मुशाफिरीत घालवून वृद्धापकालांत पस्तावलेले अनेक यति, संन्यासी मी पाहिले. मी यात्रा केल्या ते केवळ आत्मिक बळ प्राप्त करण्यासाठीं. या मार्गांतील कांहीं अधिकाऱ्यांच्या दर्शनासाठीं. गुरुप्राप्तीसाठीं.' गुरुप्राप्ति झाल्यानंतर फिरून केवळ मुशाफिरी त्यांनीं बिलकूल केली नाहीं.

संत, महात्मे, भक्त यात्रा करतात. आध्यात्मिक साधनेचाच तो एक भाग असतो. कांहीं आर्त मुमुक्षु त्यांना भेटतात. कांहीं संसारी जनांच्या शंकांचें निरसन ते करतात. ध्यानाला सोयीचें, तीव्रतर साधनेला स्फुरण देणारें असें एखादें पवित्र स्थान ते शोधतात. संसारी जनांना अशा या महात्म्यांच्या भेटी म्हणजे त्यांच्या विकासाच्या मार्गावरील तो एक टप्पाच ठरतो. अशा या महात्म्यांच्यामुळें आम्हां संसारी लोकांना यात्रेपासून कांहीं थोडी दैवी संपत्तीची जोड करतां येते. साधें जीवन, सोशिकपणा अशा स्वरुपाच्या गोष्टींची जोड विकासाच्या दृष्टीनें कुणालाहि आवश्यकच असते. कांहीं संन्यासी केवळ माउंट कैलास ते कन्याकुमारी, द्वारका ते जगन्नाथपुरी, बनारस ते रामेश्वर असे फिरत राहतील तर आत्मप्राप्तीच्या दृष्टीनें जरूर ती वाटचाल त्यांच्याकडून होणें कठीण असतें असें आज स्वामीजी स्वानुभवानें म्हणतात तें मननीय आहे. सर्व बंधनें टाकून दिल्यानंतर मिळालेल्या मोकळिकीची नीट विल्हेवाट लावतां आली पाहिजे. ती आपल्या विकासाला पूरक ठरली पाहिजे. प्राप्तकार्य करून फुरसदीच्या क्षणांची नीट योजना केल्यानें आयुष्याचें सार्थक केलेले महाभाग कांहीं थोडेथोडके नाहींत. फुरसदीच्या क्षणांचें एवढें माहात्म्य ! मग संपूर्ण मोकळीक ज्यांनीं घेतली त्यांना तर क्षणाचा नि क्षणाचा हिशेब ठेवतां आला पाहिजे. थोड्याफार मोकळिकीच्या क्षणांनीं सामान्य संसारी मनुष्य श्रेष्ठ वा कनिष्ठ स्थान प्राप्त करून घेत असतो. संन्याशांच्यावर या दृष्टीनें ही फार मोठी जबाबदारी असते. एक गोष्ट टाकलेली असते

दुसरी मिळविण्यासाठीं क्षण नि क्षण वेंचणें ही अटच असते.

आत्मज्ञानाच्या वाटचालीवर अडथळे फार असतात. अशा मार्गासाठीं मार्गदर्शकाची फार आवश्यकता असते. सामान्य व्यवहारांत देखील मार्गदर्शक लागतो. मग ही तर काय अत्युच्च गोष्टीसाठीं साधना! आजकाल खरा गुरु सांपडणें कठिण म्हणून परमेश्वरच माझा गुरु अशा कल्पनेनें भारावलेले कांहीं साधक असतात. परंतु अडचणींची निवृत्ति कठिण होऊं लागली कीं, ते गोंधळतात. थोर ऋषिवर्यांनीं सांगितलेल्या शास्त्राला सोडून जरासुद्धां वागावयाचें नाहीं हा तर डॉक्टरांचा निर्धार होता. तुमच्या व्यक्तिगत अडचणींचा निरास करण्यासाठीं सुरुवातीला अशा तऱ्हेचें व्यक्तिगत लक्ष घालणारा सद्‌गुरु आवश्यक असतो. साक्षात्कार हा इंद्रियातीत अनुभव आहे. अशा तऱ्हेचा अमृतानुभव ज्यांनीं घेतला त्यांच्याच शब्दावर पूर्ण भरवंसा ठेवून वाटचाल करणें जरूरीचें असतें. शिष्यावर सद्‌गुरूची कृपा व्हावी लागते. याचा अर्थ असाहि नव्हे कीं, सर्व भार गुरूंनींच उचलावयाचा. गुरु शिष्यासाठीं साधना करूं शकणार नाहीं. साधना ही ज्याची त्यानेंच केली पाहिजे. गुरू मार्गदर्शन करील, शंकानिरसन करील. अडचणींतून मार्ग दाखवील, परंतु प्रत्येक पाऊल शिष्याला स्वतःलाच टाकावें लागेल. गुरूवर व शास्त्रावर अढळ श्रद्धा, शुकासारखें वैराग्य, मुमुक्षुत्व, धगधगता निर्धार, कमालीची सोशिकता, जळूसारखी चिकाटी, घड्याळासारखा नियमितपणा नि बालवृत्ति इत्यादि गोष्टींची प्राप्ति करीत करीत डॉक्टरांची वाटचाल चालू होती. गुरुबाबत कांहीं विचारलें तर स्वामिजी आजहि म्हणतात कीं, त्या परमेश्वराचें नांव घ्या. त्याचें संकीर्तन करा. योग्य वेळीं तुम्हाला योग्य असा गुरु मिळेल.

यात्रा करीत करीत डॉक्टर हृषीकेशला आले. त्यांना तें स्थान फार रम्य वाटलें. पहांटे ब्राह्ममुहूर्तावर उठावें. रामनाम गात गंगेच्या पात्रांत स्नान करावें. पुन्हां चिंतनांत गढून जावें. दुपारच्या वेळीं जवळच्या गांवांतून जरूर तेवढी भिक्षा मागून आणावी नि पुन्हां एकांतसेवन करावें असें कांहीं दिवस चाललें होतें. तेथील कडक

हिवाळ्यांत त्यांना खोली मिळणेंहि कठिण होतें. ओळख ना पाळख. एका जीर्ण, पडक्या नि म्हणूनच मोकळ्या पडलेल्या एका खोलींत त्यांनीं मुक्काम ठोकला. त्यांच्या एका चरित्रकारानें म्हटलें आहे, ' किर्र रानांतील ती भयाण खोली ! डॉक्टरांच्यासारखा मनुष्य तेथें आल्यावर खोलीच्या अनेक भगदाडांतून निवास केलेल्या पालींना, विंचवांना नि सर्पांना देखील आश्चर्य वाटलें असेल ! '

डॉक्टरांना सर्वशरणता प्राप्त झाली होती, पण अद्याप गुरु मिळालेला नव्हता. आपण, आपलें नशीब, आपली इच्छा त्या परमात्म्याच्या-चरणीं गुंतवून ठेवूं शकलों ही त्याचीच कृपा असें डॉक्टरांना क्षणोक्षणीं वाटे. त्याच्या या कृपेच्या वारंवार जाणीवेनें ते नव्या उमेदीनें प्राप्त कार्यांत मग्न होत. परमेश्वरानें असें म्हटलें आहे ना ? ' योगक्षेमं वहाम्यहम् । ' संतांनींहि या गोष्टीचा पाठपुरावा केला आहे. ' भक्त एक पाऊल गेला तर देव शंभर पावलें त्याला सामोरें जातो !

तो मंगल दिवस एकदां उजाडला. डॉक्टर ब्राह्म मुहूर्तावर नेहमींप्रमाणें जागे झाले. जितक्या लवकर अधिकारी गुरूकडून संन्यासदीक्षा मिळेल तितकें चांगलें, याच विचारावर त्यांचें मन आंदुळत होतें. गंगेच्या पात्रांत गेल्यावर नेहमीप्रमाणें त्यांनीं प्रणवाचा उच्चार केला. ती निःस्तब्ध शांतता क्षणभरच कंपायमान झाली. दुसऱ्याच क्षणीं डॉक्टरांनीं गंगेच्या पात्रांत बुडी मारली. आकाशांत अजून कांहीं तारका लुकलुकत होत्या. जणुं त्या सर्वसाक्षी परमात्म्याची ही लीला पाहण्याची संधी त्यांना सोडवत नव्हती. खडावांचा आवाज कांठापर्यंत गेला. गंगेची एक लहरी उसळून पुढें आली. त्या परम पवित्र पादस्पर्शानें पुनीत होण्यासाठीं अगदीं उतावीळ होऊन ! त्या तेजस्वी परमहंस संन्याशाची दृष्टि पात्रांत स्नान करीत असलेल्या डॉक्टरांच्यावर खिळून राहिली. डॉक्टरांच्या चेहऱ्या-वरील आगळें ब्रह्मतेज त्यानें नीट निहाळलें. शृंगेरी मठाच्या परंपरेंतील परमहंस स्वामी विश्वानंदासारख्या अधिकाऱ्यांना डॉक्टरांची भूमिका कळून येण्यास उशीर लागला नाहीं.

अशा माणसाला दीक्षा देतां आली तर... ! एवढ्या कार्यासाठीं तर

त्या जगन्नियंत्यानें या जगांत आतांपावेतों मला ठेवलें नाहीं ना? असाहि एक विचार त्यांच्या मनांत चमकून गेला. ही इच्छा एवढी अनावर झाली कीं, स्नान आटपून धूतवस्त्रें ल्यालेल्या डॉक्टरांना ती सांगितल्याशिवाय त्यांना राहवलें नाहीं. त्यांचे हे उद्‌गार ऐकून डॉक्टरांचे डोळे अक्षरशः भरून आले. केवळ लौकिक दृष्टीनें राहिलेलें नाम नाहिसें झालें. डॉक्टर कुप्पुस्वामी यांचे शिवानंद सरस्वती झाले. गुरु नि शिष्य दोघे कृतार्थ झाले. युगायुगानें घडणारा हा दिव्य सोहळा! स्वामी विश्वानंदांचें कार्य संपलें. आपल्या शिष्याला त्यांनीं जरूर तें मार्गदर्शन केलें. आध्यात्मिक प्रेरणा दिली. त्यानंतर मात्र त्यांनीं जें प्रयाण केलें तें पुन्हां कधीं न परतण्यासाठीं!

या नवीन आश्रमाचीं आचरणाचीं तत्त्वें तर डॉक्टरांनीं यापूर्वींच अंमलांत आणलीं होतीं. डॉक्टरांनीं भगवी वस्त्रें चढविलीं. संन्यास घेतला. यांत कुणी कुणाला भूषविलें? संन्यास! संन्यास! याचें स्वरूप ठरविण्याचें आजपर्यंत थोड्या का लोकांनीं प्रयत्न केलेत? त्याचीं बाह्य लक्षणें ठरून गेलीं आहेत. आज अशा बाह्य लक्षणांनीं युक्त असे संन्यासी खूपच आहेत. सत्संगाचें वावडें, अध्ययनाविषयीं नाउमेद, दुःखितांविषयीं सहृदयतेचा अभाव, आळस नि भरीला आश्रितवृत्ति. कांहींच्या संन्यास-धर्माचें असें ओंगळ स्वरूप पाहावयाला मिळत नाहीं असें नाहीं. पण गुरुप्रसाद म्हणून पदरांत टाकलेलें राज्य परत करणारा व वेळप्रसंगीं ‘आम्ही काय कुणाचें खातो रे। तो राम आम्हांला देतो रे। असें शिवबाला ऐकविणारा, शिवरायाचें आठवावें रूप। शिवरायाचा आठवावा प्रताप। म्हणून त्याचाच गौरव करून संभाजी राजाला वटणीवर आणण्याचा प्रयत्न करणारा तो चाफळखोऱ्याचा यति; घरांत चणचण असतां सुवर्णानें भरलेलीं ताटें प्रेमपूर्वक परत करणारा, आकाशाएवढ्या अंतःकरणाचा तो देहूचा वाणी; हीं संन्यस्त मनोवृत्तीचीं केवढीं उत्तुंग उदाहरणें आहेत! पुत्रवियोगाच्या दुःखावर फुंकर घालतांना ‘झाली संध्या, संदेह माझा गेला’ असे बोल आपल्या पत्नीला ऐकविणारा पैठणचा तो नाथ, संतांच्या स्वागतासाठीं स्वतःच्या प्रतिष्ठेचे धिंडवडे काढणारा तो

विणकर, हरिनाम कीर्तनीं दंग असतां पोटच्या पोरालाहि पायाखालीं तुडविणारा तो कर्जबाजारी कुंभार नि चिद्विलास दर्शविणारीं आपेगांवचीं तीं चार मोती-पवळें! डॉक्टरांचें संन्यासपूर्व व संन्यासोत्तर जीवन निहाळतांना या साऱ्यांची आठवण आल्याखेरीज राहात नाहीं.

हृषीकेशच्या संन्याशांचें जीवन डॉक्टर आजपर्यंत लांबून पाहात होते. स्वामी शिवानंद सरस्वती आतां त्यांच्यांत मिसळून गेले. रोजच्या कार्यक्रमांत फरक नव्हता. अधूनमधून संन्याशांच्या परिवारांत कधीं आख्यानें तर कधीं प्रवचनें करीत. याच काळांत कांहीं संन्याशांची दुर्दशा त्यांनीं अगदीं जवळून पाहिली. कुणाला मलेरिया आहे तर कुणाला अशाच कोणत्या तरी दूषित तापानें पछाडलें आहे. तेथें काय! ना औषध, ना फलाहार! शिवानंद सरस्वतींचें डॉक्टरीचें ज्ञान स्वस्थ कसें बसूं देईल? दुःखितांना सर्व तऱ्हेनें आराम देणें हा तर जणूं त्यांनीं तरुणपणापासूनच वसा घेतला होता. त्यांच्या एका इन्शुरन्स पॉलिसीचे पैसे कंपनीकडे तसेच पडून होते. त्यांनीं ते मागविले नि त्या रकमेंतून जरूर तीं औषधें विकत आणलीं. अशा पीडित संन्याशांवर जरूर ते उपचार करण्यास त्यांनीं सुरुवात केली. त्या लोकांना हा नवीन संन्यासी प्रतिपरमेश्वर वाटला. हा संन्यासी परत डॉक्टरच्या भूमिकेवर तर नाहीं ना आला? स्वामीजी याविषयीं बोलतांना म्हणतात, 'चित्तशुद्धीच्या दृष्टीनें मला हा सेवाधर्म उपयोगी पडला.'

संन्याशांतील कित्येक थोर लोक शारीरिक व्यथेनें पीडित झाले होते. बद्रिनाथ, केदारनाथचे हजारो यात्रेकरू योग्य औषधोपचाराविना अस्वस्थ होत. जवळपासच्या खेडुतांची तीच गोष्ट होती. स्वामिजींनीं लक्ष्मण झुल्यापाशीं 'सत्यसेवाश्रम' नांवाचा दवाखाना उघडला नि येणाऱ्या रोग्यांची मोठ्या मायेनें सेवा केली. 'योग्य तो भाव मनांत ठेवून केलेली या प्रकारची सेवा आध्यात्मिक उन्नतीला अत्यंत अनुकूल असते' असे स्वामिजी आज स्वानुभवानें सांगत असतात.

स्वतःचें शरीर अत्यंत निकोप ठेवण्याच्या दृष्टीनें ते आसनें, मुद्रा, बंध, प्राणायाम करीत असत नि मोकळ्या हवेंत फिरून येत असत. हलका

आहार, नियमित ध्यान, जप, मौन नि जवळच्या रामाश्रम ग्रंथालयांतून आणलेल्या ग्रंथांचें सखोल अध्ययन असा एकंदरींत त्यांचा दिनक्रम होता. संस्कृत, इंग्रजी हे शब्दकोश त्यांच्याजवळ नेहमीं असत. योग्य त्या वेळीं भरपूर विश्रांति नि मनावरील ताण कमी करणाऱ्या गोष्टींतील गुंतवणूक यामुळें त्यांना मोठें सामर्थ्य नि उमेद या गोष्टी मिळाल्या. अधूनमधून महात्म्यांचा अगदीं जवळचा सहवास घडे, परंतु स्वामिजींनीं कधीं त्यांच्याशीं चर्चा वा विवाद केला नाहीं. अंतर्मुखता नि आत्मपरीक्षण हेच त्यांचे मोठे साथीदार होते.

अन्नक्षेत्रावरील अधिकाऱ्यांना या संन्याशाचें महत्त्व लक्षांत येण्यास फार उशीर लागला नाहीं. भिक्षेच्या बाबतींत त्यांचा फार वेळ जाणार नाहीं इकडे त्यांनीं थोडें लक्ष घातलें. अधूनमधून त्यांना तूप व दहीं या गोष्टीहि देण्यांत येऊं लागल्या. स्वामिजींना ज्याची जरूर वाटे तें मिळालें. व्याधिग्रस्त अशा अनेकांना उपचाराच्या काळांत साध्या ताकाची गरज भासे. स्वतःला म्हणून का होईना जें कांहीं मिळालें तें त्यांना अशा तऱ्हेनें सेवाकार्यांत उपयोगी पडे. लोक जरी त्यांना स्वतःला म्हणून या गोष्टी देत तरी स्वामिजी या सगळ्यामागील ईश्वरी योजना लक्षांत घेत नि मनोमन प्रसन्न होत. जें कांहीं मिळेल तें सर्वांनीं वांटून घेणें अशी ईश्वरेच्छा असते. ही समत्वदृष्टि स्वामिजींच्या रोमारोमांत भिनली आहे. अशाच एका राष्ट्रांतील कांहीं विचारवंत स्वामिजींना नुकतेच भेटण्यासाठीं आले होते. बोलता बोलता स्वामिजींनीं हंसत हंसत सांगितलें, 'I am the greatest communist.' सुज्ञ वाचकांना भारतीय संन्याशांच्या अशा या समत्वदृष्टीबद्दल कांहीं सांगितलें पाहिजे असें नाहीं.

दुपारचा बराचसा वेळ लिखाणांत जाई. आपल्या साधनेंत रोज येत असलेले नवनवीन अनुभव व त्यानुसार सुचलेले विचार लिहिल्याशिवाय त्यांना राहवत नसे. तेथें लिहिण्याच्या सामग्रीची वाण असे. संग्रह असा कुठल्या गोष्टींचा असणार ? जवळ चार पैसे आलेच तर औषधीसारखी एखादी उपयुक्त वस्तु विकत घ्यावयाची व लगेच त्याची योग्य त्या ठिकाणीं विल्हेवाट लावायची. मिळेल तो पाठकोरा कागद लिहिण्याच्या

कामीं ते वापरीत. त्यांचें हें लिहिण्याचें काम पाहून जवळचे संन्यासी असे कागद गोळा करून त्यांना आणून देत. मजकुरांनीं भरलेले हे कागदाचे तुकडे एकत्रित करून त्यांचें एक चिकटबुक ते करून ठेवीत. या काळांत त्यांनीं करून ठेवलेलीं अशीं नोटबुकें अजूनहि Sivanand-Regalia मध्यें पाहाण्यास सांपडतात. स्वामीजींनीं आपल्या साधनेंतील हे सारे अनुभव साधकांना मार्गदर्शन म्हणून प्रसिद्ध केले आहेत. अशा स्वरूपाचे वेळोवेळीं येणारे अनुभव ताबडतोब ते प्रसिद्ध करीत. हेतु हा कीं, सत्याच्या शोधकांना त्याचा कांहीं उपयोग होईल. काहीं कांहीं मोठे लोक सुद्धां आपलें अनुभवसिद्ध ज्ञान कांहीं ठराविक लोकांनाच देतात. त्यांची भूमिका तसें करण्यांत कांहीं चुकोची असते असें कांहीं म्हणतां येणार नाहीं. परंतु स्वामिजींच्या बाबतींत असा प्रकार आजपावेतों घडला नाहीं नि घडणें शक्य दिसत नाहीं. जें कांहीं प्रत्ययाला आलें नि ज्या प्रकारांनीं आलें तें त्यांनीं जगांतील वेगवेगळ्या प्रमुख भाषेंतून अगदीं मोकळेपणानें प्रगट केलें आहे.

हृषीकेश हें तीर्थक्षेत्रच असल्यानें मोठे श्रीमान् स्त्री-पुरुष तेथें अनेकवार येत. कधीं महिना नि महिना मुक्कामहि करीत. अशा वेळीं संन्याशांना अधूनमधून मिष्टान्न भोजन मिळे. अशा यात्रेकरूंमध्यें अध्यात्माबाबत पोरकट कुतूहल असणारे कांहीं असत. स्वामीजींना अनेक आमंत्रणें अशांच्याकडून येत. ते न आल्यास त्यांच्या कुटीमध्यें त्यांचा मनुष्य फळफळावळ, मिठाई पोहोचती करी. मोहाचे असे प्रसंग आले कीं, स्वामीजी अंतर्मुख होत. आपण निर्माण करीत असलेलें सखोलसें आंतरिक जीवन काळजीपूर्वक निहाळीत नि मनामध्यें अणुभरहि आसक्ति नसल्याचें प्रत्ययाला आलें कीं, त्यांचें अंतःकरण ईशकृपेच्या जाणीवेनें गद्गदून येई. मग त्या अवीट आनंदांत किती काळ जाई याचें त्यांना भानहि नसे. एका ज्वरपीडित संन्याशाला जवळच्या औषधानें उपचार केल्यानंतर बऱ्याच वेळानें त्यांना आणखी एका अधिक परिणामकारक अशा एका औषधीचें स्मरण झालें. शिवाय ती औषधी त्यांच्याजवळ थोडी शिल्लक असल्याचेंहि त्यांना दिसून आलें. स्वामीजींना क्षणभरच स्वतःच्या वेंधळेपणाची चीड आली.

लगेंच दुसऱ्याच क्षणीं ते ती औषधी घेऊन अक्षरशः धांवत गेले. मैल, दीड मैल, दोन मैल...डोक्यांत एकच विचार ! चपाती पळविलेल्या कुत्र्याच्या मागें तुपाची वाटी घेऊन धांवणारा तो पंढरीचा लाडका लाल ! जणुं नामदेवाच्या अवताराची नव्यानें नोंद करून घेण्याचें त्या इतिहास-पुरुषानें ठरविलें. चार मैल झाले, पांचवा संपला, शेवटीं त्यांना तो संन्यासी दिसला. त्याला पाहिल्याबरोबर शिवानंदसरस्वतींचें अंतःकरण आनंदानें ओसंडून आलें. 'भगवन्, या औषधींचें सेवन तुम्हांला उपकारक ठरेल.' ऐकणाऱ्याचे डोळे भरून आले. बोलणाऱ्याचें अंतःकरण आनंदानें आकाशाएवढें झालें. जणुं परमात्म्याला प्रमुदित करणारें चिद्शक्तीचें मनोहर लास्यच !

हृषीकेशला वारंवार येणाऱ्या स्त्री-पुरुष यात्रेकरूंपैकीं सिंगाईच्या राणीसाहेब हें एक बडें प्रस्थ होतें. लक्ष्मणझुल्याजवळच्या बंगल्यामध्यें त्यांचा कांहीं दिवस मुक्कामहि असे. शिवानंदसरस्वतींच्या विषयीं त्यांच्या मनांत भक्ति होती. त्यांची वृत्ति धार्मिक तर होतीच. भरीला अशा स्वरूपाच्या ग्रंथांच्या अध्ययनाबद्दल आस्था होती. परंतु स्वामिजी अशा स्वरूपाच्या लोकांपासूनहि अलिप्त राहात. कधींकधीं अशा श्रीमान् यात्रेकरूंचा मुक्काम असे त्या वेळीं ते स्वतःला कोंडून घेत. निराहार दिवस काढणें ही त्यांच्या अंगवळणीं पडलेली गोष्ट होती.

नेहमीचें गंगेच्या पात्रांतील त्यांचें पुरश्चरण कधीं चुकलें नाहीं. या आपल्या पुरश्चरणाविषयीं स्वामिजींनीं आपल्या पुस्तकांतून कुठें उल्लेख केला नाहीं. जवळच्या परमार्थनिकेतनांतील कांहीं वृद्ध संन्यासी आजहि स्वामिजींच्या या कठोर तपसाधनेबाबत बोलून दाखवितात. गंगेच्या पात्रांतील पुरश्चरण हें आवश्यकच आहे वा अशासारखें शरीराला उपाधि देणारें कांहीं करणें जरूर आहे असें स्वामिजींना वाटत नाहीं. एवढेंच नव्हे तर शारीरिक सुदृढता कायम ठेवण्याची सोय ज्या साधनेंत नाहीं अशी कोणतीहि साधना स्वामिजी आपल्या शिष्यांना वा इतरांना चुकूनसुद्धां सांगत नाहींत. गंगेच्या पात्रांतील कडक पुरश्चरणाबाबत स्वामीजींनीं जें मौन धरलें आहे त्याचें हें एक कारण असावें.

कांक्षारहित सेवाकार्य, सर्वांबाबत प्रेमभाव, सर्वशरणता नि आत्मचिंतन हें एक प्रकारचें वेगळें पुरश्चरण नेहमींच्या पुरश्चरणाच्या जोडीला होतेंच. अशा माणसाला आत्मप्राप्तीचा अनुभव येण्यास उशीर तो काय लागणार? स्वामिजींचा यानंतरचा भावाविष्कार मोठा मननीय आहे.

त्यांचा हा भावाविष्कार बव्हंशीं इंग्रजीमध्येंच आहे. 'मी अमृतानुभव चाखतो आहे' या काव्यांत ते म्हणतात, 'माझें मन बाह्य विषयांपासून अलिप्त आहे. परमेश्वराच्या प्रेममय एकरूपतेनें मी धुंद झालों आहें. मी नित्य शांत नि नित्य आनंदी आहे. शुद्ध जाणीव, आनंद, सत्य हीं माझींच नांवें आहेत." आणखी एके ठिकाणीं ते म्हणतात, 'माझी मूलप्रकृति मला कळून आली आहे. मी पूर्णतेच्या शिखरावर आहे. मला कर्तव्य असें कांहींच नाहीं. वेदांना, स्मृतींना आतां माझ्यासाठीं सांगावयाला कांहीं उरलें नाहीं. माया माझ्यापुढें मर्यादशील झाली आहे. मला हें सारें कांहीं गुरुकृपेनें मिळालें आहे. मला त्यांनीं आपल्यासारखें अधिकारी केलें आहे. त्या माझ्या गुरुंना शतशः धन्यवाद!' 'परापूजा' काव्यांत त्यांनीं घेतलेला पूर्णतेचा पुनःप्रत्यय असाच उल्लेखनीय आहे.

हें जग वृंदावन आहे.
हें हृदय सुद्धां वृंदावन आहे.
मी तुला सर्वत्र पाहातो.
हे प्रभु, मी तुझे चरण या पवित्र पाण्यानें कसें प्रक्षालन करूं?
प्रत्यक्ष गंगाच तुझ्या चरणापासून निघाली आहे.
मी तुला आसन कसें देऊं?
सर्वत्र तूं भरून आहेस.
मी तुला प्रज्वलित दीपानें ओवाळूं तरी कसें?
साक्षात् रविशशीसारखे तुझे नेत्र आहेत.
ही पुष्पांजलि तुला वाहूं कशी?
पुष्पांतील सुगंधच तूं आहेस.
अन्नरसस्वरूप अशा तुला मी प्रसाद कसा अर्पण करूं?
तुला आळवूं तरी कसें?

शब्दस्वरूप, रागरागिणी–स्वरूप, सप्तस्वर–स्वरूप, अनाहत –नाद-स्वरूप असा तूं आहेस.

या पूर्वींच्या एका काव्यांत त्यांनीं आत्मप्राप्तीपूर्वींचे अनुभव व्यक्त केले आहेत. विवेक, वैराग्याची वाढ, मुक्तीची अधिकाधिक ओढ, शांति, समाधान, उत्साह, निर्भयता, सुंदर शारीरिक स्वास्थ्य, प्रदीप्त जठराग्नि, फार काळ ध्यान करण्याची वारंवार होणारी इच्छा, मनाची सावधानता, साऱ्या प्राणिमात्राबाबत प्रेमभाव, वायफळ वादाविषयीं विलक्षण तिरस्कार, अपमान नि दुःख सहन करण्याची मनाची तयारी, इत्यादि गोष्टी प्रगति-सूचक आहेत असें त्यांनीं त्या काव्यांतून सांगितलें आहे.

स्वामिजींचा हा भावाविष्कार जसा रम्य आहे तसेंच त्यांचें लिखाणहि वाचकांच्या अंतःकरणाला जाऊन भिडणारें आहे. ज्ञानाचा प्रसार करण्याच्या दृष्टीनें स्वामिजी खरोखर अधिकारी आहेत. ते कुशल कीर्तनकार आहेत, प्रभावी वक्ते आहेत, यशस्वी पत्रकार आहेत नि भावनाशील कवि आहेत. संभाषण–चातुर्य हाहि एक त्यांचा विशेष उल्लेखनीय आहे.

यानंतरचा कांहीं काळ स्वामिजींनीं गंगेकांठील स्वर्गाश्रमांत घालविला. स्वामिजींचा या ठिकाणचा दिनक्रमहि लक्षांत घेण्यासारखा आहे. साधनेंतील शिथिलता त्यांनीं कोणत्याहि कारणानें येऊं दिली नाहीं. आत्मप्राप्तीनंतर साधनेंतील दुर्लक्ष ही एक फार मोठी दुर्दैवाची गोष्ट आहे. नुकतेंच समाधिस्थ झालेले निंबाळचे साक्षात्कारी संत गुरुदेव रानडे यांनींहि ही गोष्ट उल्लेखिलेली आहे. ज्ञानानंतरची साधनाहि अत्यंत महत्त्वाची आहे. स्वर्गाश्रमांत आल्यावरहि साधनेला अधिकाधिक वेळ मिळावा म्हणून दांत घासणें, कपडे धुणें, स्नान इत्यादि बाबी स्वामिजी फार लवकर नि थोड्या काळांत आटपीत. अध्ययन, लिखाण, साधकांना पत्रें पाठविणें, व्यायाम, भिक्षा इत्यादि गोष्टींचें त्यांनीं जें वेळापत्रक केलें होतें त्याप्रमाणें ते कटाक्षानें वर्तत. भेटीला आलेल्या लोकांना प्रथम आचरणांत आणावयाच्या कांहीं गोष्टी साधना म्हणून सांगत नि शक्य तों पांच मिनिटांतच ही भेट आंवरती घेत. पुढें पुढें लोक अधिकाधिक संख्येनें त्यांच्याकडे येऊं लागले. त्यांना मग भेटीची ठराविक वेळ

जाहीर करणारा एक फलकच खोलीवर लावावा लागला. स्वर्गाश्रमांत त्यांनीं नित्य भजन व रामायणकथा चालूं केली. साप्ताहिक प्रवचनें चालूं केलीं. स्वर्गाश्रम-साधुसंघांतून कित्येकांना अशा स्वरूपाच्या कार्यांच्या संचलनाचे नि संघटनेचे पाठ त्यांनीं दिले.

यानंतर कांहीं काळ स्वर्गाश्रम सोडून परिव्राजकाचें जिणें त्यांनीं कंठलें. या काळांत अनेक ठिकाणीं योगासनांचीं प्रात्यक्षिकें केलीं, कीर्तनें, प्रवचनें झालीं. मानससरोवर, कैलास ते थेट कन्याकुमारीपर्यंत ते जाऊन आले. दैवी गुणांची जोपासना नि मोठ्या व्यापक प्रमाणांत लोकसेवा या गोष्टी मला यांतून साधतां आल्या असें ते याबाबत बोलतांना म्हणतात. या काळांत रमणमहर्षींच्या पुढेंहि त्यांचें एक कीर्तन झालें. हीं त्यांचीं कीर्तनें फार लोकप्रिय झालीं. कांहीं कांही ठिकाणांहून आध्यात्मिक परिषदांचे उद्‌घाटक, अध्यक्ष म्हणून अध्यात्म-ज्ञानाच्या प्रसाराचें कार्य करण्यास त्यांनीं मोठ्या उमेदीनें साहाय्य केलें. या काळांत त्यांना फार काम करावें लागे. कित्येक वेळां सुरुवातीचें संघटनेचेंहि काम त्यांच्यावर पडे. परंतु अध्यात्म-ज्ञानाच्या प्रसाराची मिळेल ती संधि त्यांनीं घेतली. अशा वेळीं हातून व्यवस्थित काम होण्याच्या दृष्टीनें ते आहारांत जरूर तो बदल करीत. हृषीकेशला डाळ-रोटीवर त्यांचें भागे. बरोबरच्या काम करणाऱ्या लोकांच्या आहाराकडेहि लक्ष देत. अशाच एका आध्यात्मिक परिषदेच्या संघटकाला त्यांनीं कळविलें, "आमच्या खोलींतून बिस्किटें व फळें भरपूर ठेवा. तें आमचें सगुण ब्रह्म आहे. कार्यकर्त्यांकडून भरीव कार्य करून घ्यावयाचें म्हणजे त्यांचें खाणेंपिणेंहि तसेंच सात्त्विक नि बलवर्धक हवें." याचबरोबर स्वामिजींनीं कांहीं ठिकाणीं औषधोपचार शिबिरेंहि भरविलीं. कामाचा ताण वाढला कीं, सात्त्विक आहाराबरोबरच जप, ध्यान, प्राणायाम, कीर्तन यांपैकीं कांहीं गोष्टी करून स्वामिजी पुन्हां ताजेतवाने होत. त्यांच्या या दौऱ्यांचा ज्ञान-प्रसाराच्या दृष्टीनें फार उपयोग झाला. त्यांचीं कीर्तनें लोकांच्या दीर्घकाळ लक्षांत रहात. या काळांतील स्वामिजींचीं कीर्तनें ऐकलेलीं कांहीं माणसें आजहि क्वचित् केव्हां आश्रमांत येतात व स्वामिजीनीं कीर्तनांत म्हटलेल्या

कांहीं पदांच्या ओळी अगदीं नव्यानें ऐकल्याप्रमाणें आठवून सांगतात. स्वामिजींच्या कीर्तनाचे अनेक प्रकार होते. पुढें पुढें तर त्यांनीं गटांचीं कीर्तनें ( Group Kirtans ) सुरू केलीं. त्यांत कित्येक वेळां सरकारी अधिकारी, प्राध्यापक, डॉक्टर्स, विद्यार्थी-विद्यार्थिनी असत. सुरुवातीला जरूर तो सभाधीटपणा नसल्यानें ते कचरत, परंतु हा आनंद लुटायला ते लवकरच शिकत. यांतील कांहीं लोक तर एवढे प्रवीण होत कीं, स्वतंत्रपणें कीर्तन करून हजारोंचें रंजन, उद्बोधन करीत.

जी गोष्ट स्वप्नांतहि आपणांस करतां येणें शक्य नाहीं असें वाटतें अशा अशक्य गोष्टी हातून घडल्याचें दिसून आल्यावर या लोकांना काय वाटलें असेल याची आपणांस कल्पना करतां येईल. अशी अशक्य गोष्ट करविणाऱ्याविषयीं त्यांत आदर तर निर्माण होतोच शिवाय भरीला जीवन-दृष्टीतहि योग्य तो बदल होतो. एकाद्याच्या सुप्त गुणांचें प्रगटीकरण नि विकास ते अगदीं पद्धतशीर घडवून आणतात. त्यांनीं जसे कीर्तनकार, वक्ते, प्रवचनकार निर्माण केले तसेच पुढें लेखक नि पत्रकारहि निर्माण केले. ज्ञानप्रसाराचें कोणतेंहि साधन हाताळावयाचें त्यांनीं सोडलें नाहीं.

अशा तऱ्हेच्या माणसाची प्रसिद्धि भिन्न भिन्न तऱ्हेनें होणें क्रमप्राप्तच होतें. आध्यात्मिक मार्गांतील गुरुबाजीची भयावहता पूर्णपणें माहित असलेल्या स्वामिजींनीं या साऱ्या गोष्टीकडे पूर्णपणें दुर्लक्ष केलें. आज देखील स्वामिजी येणाऱ्याला सांगतात, मानसिक नमस्कार केलास कीं पुरे. एका आपल्या शिष्याला त्यांनी कळविलें, ' मी एक सामान्य साधु आहे. तुला फारशी मदत मला करतां येणार नाहीं; परतु जन्मभर मी तुझा एक प्रामाणिक मित्र म्हणून राहीन. माझ्याजवळ सेवेला एकाद्याला ठेवून घेणें मला आवडत नाहीं. जें कांहीं सांगावयाचें तें दोन तीन महिन्यांत सांगून मी त्यांना उत्तरकाशीसारख्या एकांतस्थानीं ध्यानासाठी जाण्यास सुचवितो.' पद्धतशीर आध्यात्मिक विकासासाठीं बिनबोभाट साधना, जप, ध्यान इत्यादि गोष्टी ते वारंवार श्रोत्यांना सांगत. १९३३ मध्यें मद्रासच्या एका वृत्तपत्रानें त्याचा अवतार म्हणून उल्लेख केला. त्या वेळीं त्यांनीं लिहिलें, "कृपया, लेखनांतील हा 'अवताराचा' धंदा पुरे करा. तुम्हांला

जें कांहीं माझ्याविषयीं लिहावयाचें असेल तें वस्तुस्थितीला धरून साध्या व स्पष्ट शब्दांत द्या. सत्य केव्हांहि प्रगट होतेंच. सेवेंत मला विलक्षण आनंद होतो. सेवेनेंच माझी आतांपर्यंत उन्नति झाली. माझी चित्तशुद्धि सेवेनेंच झाली. हा देह केवळ सेवेसाठींच आहे..."

यानंतर मात्र स्वामिजींच्याकडे येणाऱ्या लोकांची संख्या वाढली ही गोष्ट विशेष म्हणतां येणार नाहीं. या ना त्या प्रकारानें सेवा करण्याचें एक प्रकारचें अलौकिक वेडच असलेल्या स्वामिजींनीं या लोकांना मार्गदर्शन करण्याबाबत कंटाळा बिलकूल केला नाहीं. १९३० चा सुमार होता तो. जवळपासचे मोठे मोठे साधुसुद्धां मोठें केविलवाणें जिणें कंठीत. कांहीं संन्यासी तर शरीराचे साधनेच्या नांवाखालीं विलक्षण मातेरें करून घेत. कांहीं तर समाधि साधण्यासाठीं मादक द्रव्यांचें सेवन करीत. यांतील कांहीं लोकांना योग्य तें मार्गदर्शन करण्यासाठीं त्यांनीं जवळच्या कुटीरांतून त्यांना जागा मिळवून दिली. क्षेत्रावर जाऊन या लोकांच्या जेवणाचीहि सोय केली. त्यांचें शारीरिक स्वास्थ्य, ध्यानांतील अडचणी, वैराग्याची वाढ याबाबत ते जातीनें लक्ष घालीत. नवजीवन मिळालेल्या या लोकांना आपल्या हातून स्वामिजींची कांहीं सेवा व्हावी असें वाटणें स्वाभाविकच होतें. ज्या ज्या वेळीं आपली ही उत्कट इच्छा ते बोलून दाखवीत त्या त्या वेळीं स्वामिजी त्यांना आसपासच्या कुटीरांतून जाऊन यावयास सांगत. जवळपासच्या कुटीरांत राहणाऱ्या वृद्ध संन्याशांची, आजाऱ्यांची सेवा करण्यास, विचारपूस करण्यास स्वामिजी सांगत असत. त्यांत कांहीं उच्च शिक्षण घेतलेले तरुण असत. त्यांना स्वामिजी आपल्या लेखांच्या नकला करण्यास सांगत नि वेगवेगळ्या नियतकालिकांना ते लेख पाठवून देत. आजवरच्या ऋषिवर्यांची शिकवण सोप्या शब्दांत कांहीं स्वानुभवासहित त्यांत समाविष्ट असल्यानें अशा तऱ्हेनें लेखांच्या नकला काढण्याचें काम हे लोक मोठ्या उत्साहानें करीत. प्रक्षुब्ध इंद्रियांना कसें आंवरावें, मनाची चलबिचलता कशी दूर करावी इत्यादिबाबतहि कांहीं व्यवहार्य व कसोटीस उतरलेल्या सूचना त्यांत असत. वर्षांनुवर्षें जुन्या पोथ्या वाचीत बसण्यापेक्षां त्या जुन्या ग्रंथांना सोडून नसलेली स्वामिजींची ही शिकवण या सोप्या लेखांतून त्यांच्या

पचनीं पडे नि त्यांची प्रगतीहि त्या दृष्टीनें जलद होई. या लोकांनीं पत्करलेलें हें काम त्यांना मनापासून आवडलें वा नाहीं इकडे ते बारकाईनें लक्ष घालीत व जरूर तर कामाची अदलाबदलहि करीत. ज्या लोकांना या जगांत कोणताहि पाश राहिला नाहीं असेहि कांहीं वृद्ध लोक त्या ठिकाणीं येत. स्वामिजी त्यांचेंहि मनापासून स्वागत करीत. गंगास्नान, जप व श्रवण या गोष्टी करण्यास ते त्यांना सांगत. अशा लोकांच्या चेहऱ्यावर शांति, समाधान दिसून आल्यावर स्वामिजी अत्यानंदानें भारावून जात.

जीवो नाऽहम् । शिवोऽहम् । आनंदोऽहम् ।
किम् वाचनीयम् ? किम् पाठनीयम् ?

अशा स्वरूपाचें संकीर्तन करणाऱ्या स्वामिजींना पीडितांच्याजवळ आनंदाचें दर्शन घडल्यावर भावाविष्ट व्हावयाला होणें हें स्वाभाविकच होतें. जसे जसे लोक अधिकाधिक संख्येनें येऊं लागले तसेतसे स्वर्गाश्रमाच्या व्यवस्थापकांना या सगळ्या लोकांची सोय करणें मोठें कठीण होऊं लागलें. स्वर्गाश्रमांतील जागा स्वामिजींना अत्यंत सोयीची होती, परंतु केवळ दिवसेंदिवस अधिकाधिक संख्येनें त्यांच्याकडे येणाऱ्या सुशिक्षित साधकांची सोय पाहाण्याच्या दृष्टीनें स्वामिजींनीं स्वर्गाश्रम सोडावयाचा ठरविलें.

स्वर्गाश्रम सोडावयाचा ठरविलें खरें परंतु जावयाचें कोठें हा प्रश्नच होता. निरनिराळे बेत करणें, योजना आंखणें अशी कोणतीच गोष्ट स्वामिजींच्या स्वभावांत मुळांतच नव्हती. कोणी एकानें एखादी गोष्ट प्रेमानें देऊं केली कीं, घेतली आणि त्या गोष्टीची दुसऱ्याला गरज आहे असें दिसल्याबरोबर देऊं केली असा सरळ व साधा व्यवहार त्यांचा होता. स्वर्गाश्रमांत अभ्यागतांची अडचण होऊं लागली. स्वर्गाश्रम सोडावयाचा मनानें घेतलें; सोडलाहि. परमेश्वरी इच्छेप्रमाणें घडावयाचें तें घडेल. Thy will be done! ही तर स्वामिजींची आवडती प्रार्थना. कांहीं दिवस मग त्यांनीं रामाश्रम ग्रंथालयांत काढले. हें रामाश्रम ग्रंथालय स्वर्गाश्रमाच्या समोरच, परंतु गंगेच्या अलिकडील तीरावर आहे. स्वामिजींच्याकडे येणारे लोक या काळांत जवळच्याच धर्मशाळेंत राहात. जवळच्या अन्नक्षेत्राहून

भिक्षा मागून आणावयाची. कधीं कधीं स्वामिजींची भिक्षा इतर कांहीं वयानें मोठे असलेले साधु त्यांना आणून देत. असेंच कांहीं महिने गेले. दरम्यान जवळची एक जीर्ण कुटी स्वामिजींनीं दुरुस्त करून घेतली. जवळच्या जंगलांतील एखाद्या जीर्ण कुटींत त्यांना राहतां आलें असतें. परंतु अंगीकृत कार्याला त्यामुळें अडथळा आला असता. एक दुकानदार धर्मशाळेंतील कांहीं खोल्यांचा गोठ्याप्रमाणें उपयोग करीत होता. त्या गोठ्याचेंच एकामागून एक याप्रमाणें राहण्याच्या खोल्यांत रूपांतर केलें आणि येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निवासाची सोय करण्यांत आली.

कांहीं भक्तगण स्वामिजींना फळफळावळ व कांहीं थोडे पैसे वैयक्तिक खर्चासाठीं देत. स्वामिजी ते स्वीकारीत नि त्या रकमेचा उपयोग छपाईच्या कामीं केला जाई. 'साधकांना महत्त्वाच्या वीस सूचना' 'शांतीचा नि साक्षात्काराचा मूलमंत्र' अशा तऱ्हेचीं लहान पत्रकें छापलीं जावयाचीं व तीं मोफत वांटावयाचीं. कित्येक वेळां हे पैसे औषधें विकत आणण्यासाठीं, लेख पाठविण्यासाठीं लागणाऱ्या जरूर त्या टपाल हंशीलासाठीं व आर्त पृच्छकांना जरूर तीं पत्रें पाठविण्यासाठीं उपयोगांत आणले जात. आर्तांची संख्या वाढूं लागली तसें कामहि वाढूं लागलें. पुढें त्यांनीं एक डुप्लिकेटर नि टाईपरायटरहि मिळविला. स्वामिजींनीं सांगितलेल्या सेवेच्या नि साधनेच्या कामांत त्यांचे शिष्य स्वतःचा भूतकाल विसरून एकनिष्ठेनें वर्तत. या शिष्यांसाठीं पांच लोकांचा शिधा देण्याची व्यवस्था अन्नक्षेत्रांवर झाली. उरलेल्या लोकांसाठीं व भेटीला आलेल्या लोकांच्या साठीं भक्तगणांनीं दिलेली देणगी उपयोगांत आणली जाई. अशाच कांहीं देणग्यांतून त्यांनीं शेंकडों इंग्रजी पुस्तकें प्रसिद्ध केलीं. आजपावेतों स्वामिजींच्या लहानमोठ्या इंग्रजी ग्रंथांची संख्या दोनशेंच्या वर आहे. या सध्याच्या प्रचंड विस्ताराचें मूळ हें असें आहे.

वेगवेगळ्या वृत्तीचीं, पेशाचीं माणसें स्वामिजींच्याकडे अगदीं प्रामाणिक भावनेनें येत. स्वामिजींनीं त्यांच्या त्यांच्या कार्यक्षमतेला अनुरूप असें सेवेचें क्षेत्र त्यांना सांगितलें. कांहींच्या साठीं सेवेचें क्षेत्र त्यांना तेथेंच निर्माण करतां आलें. या कष्टाळू कार्यकर्त्या साधकांना, येणाऱ्याजाणाऱ्यांना

व असहाय असणाऱ्यांना एक छोटेसें पाकगर उभा करून सोय करून देण्यांत आली. कारण अन्नक्षेत्रावर सगळ्यांनाच भिक्षा मिळे असें नव्हतें. अशा तऱ्हेनें साधकांना मार्गदर्शनाचें पद्धतशीर काम सुरू असतांच १९३६ सालीं त्यांनीं डिव्हाईन लाईफ् सोसायटीची त्याच ठिकाणीं स्थापना केली. अध्यात्मज्ञानाचा प्रसार एवढ्याच एका प्रमुख उद्देशानें या संस्थेची स्थापना झाली. साधकांना प्रेरणा देणें, दूरवर असणाऱ्या साधकांना पत्रद्वारें मार्गदर्शन करणें, योग, भक्ति, वेदान्त, आरोग्य इत्यादि विषयांवर विविध लिखाण करून प्रमुख मासिक पुस्तकांतून तें प्रसिद्ध करणें, अशा-तऱ्हेनें डिव्हाईन् लाईफ् सोसायटीचें हें अध्यात्मज्ञान-प्रसाराचें कार्य मोठ्या गतीनें चालू झालें. आज या सोसायटीच्या शाखा जगभर पसरल्या असून त्यांची संख्या तीनशें आहे. खुद्द स्वामिजींच्या आश्रमांतच इंग्रजी व हिंदी अशीं दोन्ही मिळून महिन्यांतून सहा नियतकालिकें प्रसिद्ध होतात.

अनेक राष्ट्रांतील अनेक धर्मांचे लोक या ठिकाणीं येऊं लागले. कुटीरांची व अतिथिगृहांची त्या प्रमाणांत वाढ झाली. आपल्या हातून शिकून प्रवीण झालेल्या उच्चशिक्षित तरुण साधकांच्यावर स्वामिजींनीं हळूहळू जबाबदारी टाकली. योग, तत्त्वज्ञान, आरोग्य या विषयावर नियमित व्याख्यानें, पाठ सुरू झाले नि यांतूनच 'योगवेदान्त फॉरेस्ट ॲकडेमी'ची निर्मिति झाली. या कार्याला अधिकारी असणारा अध्यापक वर्ग स्वामिजींनीं तयार केला होताच. तत्त्वज्ञानाचें सेवानिवृत्त प्राध्यापक आजहि मोठ्या निष्ठेनें हें अध्यापनाचें काम करतात. या ठिकाणचें मुद्रणालय सर्व गोष्टींनीं सुसज्ज असें आहे. स्वामिजींनीं तयार केलेले साधक या ठिकाणीं घड्याळाप्रमाणें नियमित काम करीत असतात. येणाऱ्या साधकांच्या कार्याला अनुकूल असें क्षेत्र शक्य तर निर्माण करण्यांत स्वामिजी सदैव उत्सुक असल्यानें या ठिकाणीं एका मोठ्या हॉस्पीटलचीहि स्थापना झाली. कित्येक लोकांना या ठिकाणीं मोफत औषधोपचार केला जातो. हें हॉस्पीटल सर्व बाबतींत सुसज्ज आहे. डॉक्टरीची पदवी घेतलेले तरुण साधक येथील काम अगदीं निष्काम भावानें करतात. चित्तशुद्धीचा असा हा सुलभ मार्ग स्वामिजींनीं त्यांना दाखवून दिला

आहे. या ठिकाणीं झालेली विश्वनाथ मंदिराची उभारणी एका वेगळ्या दृष्टीनें महत्त्वपूर्ण आहे. या ठिकाणीं भक्तांच्या नांवानें अधूनमधून करण्यांत येणारी विशेष पूजा त्यांना मानसिक शांति देणारी ठरली आहे. या ठिकाणीं आपल्या नांवानें करण्यांत आलेल्या अभिषेकानें, पूजेनें, प्रार्थनेनें संकटाला तोंड देण्याचें एक तऱ्हेचें आत्मिक बळ प्राप्त झाल्याचें व संकटांतून निभावून गेल्याचें अनेक दूरवरचे लोक स्वामिजींना कळवितात. अशा तऱ्हेच्या पत्रांचा एक मोठा ग्रंथराजच होईल. हीं पत्रें संख्येनें एवढीं विपुल आहेत. भिन्न भिन्न विचारप्रणालींचे लोक विश्वनाथ मंदिराच्या ठिकाणीं एकत्रित येतात. आज तें एक मोठें आध्यात्मिक शक्ति प्रसृत करणारें एक मोठें केंद्र झालें आहे. एका परदेशी लेखकानें तर त्याला मोठें 'पॉवर हाऊस' म्हणून संबोधलें आहे. प्रापंचिक अडचणींत सांपडलेले लोक स्वामिजींना आपल्या अडचणी कळवितात. तुमच्या अडचणींचा निरास करण्यासाठीं मी विश्वनाथाची प्रार्थना केली आहे. तो तुमचें शुभ करो ! एवढेंच स्वामिजी कळवितात पण तेवढ्यानें जो औदासीन्याचा निरास होतो तो अनुभविकांनाच कळणार. याच-बरोबर प्रत्यक्ष आचरणांत आणतां येईल अशा कांहीं बोधवचनांचा उल्लेख त्या पत्रांत केल्याशिवाय ते राहात नाहींत. साधना या दृष्टीनें जें कांहीं थोडेबहुत माणसाला करतां येण्यासारखें असेल तें त्याच्याकडून करून घेतल्याखेरीज ते राहात नाहींत. कांहीं विद्यार्थी देखील आपल्या शाळेची वा कॉलेजची परीक्षा जवळ आल्यावर स्वामिजींना लिहीत, 'माझी परीक्षा जवळ आली आहे, मला तुमचा आशीर्वाद हवा आहे.' स्वामिजी लगेच उत्तर पाठवीत,

Blessed self,

Thy kind letter of ...... instant. Prepare well for the examination. Leave rest everything to Him. Lord is with you.

May He bestow on you His choicest blessings.

With prem and Om,

Thy own self,
**Sivanand.**

[हे आनंद स्वरूप,

तुझें दि ... ... ...चें कृपापत्र मिळालें. परीक्षेची चांगली तयारी कर. बाकीचे सर्व कांहीं त्या परमेश्वराच्या इच्छेवर सोपीव. तो तुझ्या सन्निध आहे.

त्याची पूर्ण कृपा तुझ्यावर होवो !

तुझ्याविषयीं सदैव प्रेम असणारा

त्वदेव स्वरूपम्

**शिवानंद** ]

समर्थ रामदासस्वामींचा खालील श्लोक सर्वांच्या परिचयाचा आहेच.

सदा सर्वदा देव सन्नीध आहे ।
कृपाळूपणें अल्प धारिष्ट पाहे ॥

मनुष्याचें सुप्त सामर्थ्य जागृत करणारे थोडे का प्रकार मानसशास्त्रज्ञांनीं आजवर शोधलेत ? मनाच्या नेणीवेंतील घाण बाहेर काढून स्त्रीमुखाची प्राप्ति हा सगळ्यांत परिणामकारक उपाय त्यांच्यांतील एकानें शोधून काढला. त्याचे परिणाम काय झाले याचें विवेचन येथें कशाला ? नेणीवेच्याहि पलिकडे असणारी माणसाची आत्मस्वरूपाकडील ओढ लक्षांत घेण्याची अट आज त्यांच्यापैकीं कांहींना आकळूं लागली आहे. सकाम भावनेनें करीत असलेल्या या प्रार्थनांना स्वामिजींनीं दिलेलें प्रोत्साहन कांहीना रुचण्यासारखे नसेलहि परंतु अशा सकाम प्रार्थनांच्या सुरुवातीचें अखेरचें साध्य लक्षांत घेतलें असतां यांत वावगें वा शास्त्राला सोडून वा काळाला विपरीत असें कांहीं आहे असें वाटण्याचें कारण दिसत नाहीं.

डिव्हाईन लाईफ् सोसायटीचें कार्य आजच्या काळाला अनुरूप असें आहे. या संस्थेच्या स्थापनेबद्दल बोलतांना ते म्हणतात, " विद्यार्थी अश्रद्ध झाले, धूम्रपान, रेस इत्यादींचे नादिष्ट झाले. मुली स्त्रीत्वाचीं लक्षणें जणूं विसरूं लागल्या. अधिकारीवर्ग सत्ता नि पैसा यांच्या प्राप्तींत गुंग झाला. लोकांचें आरोग्य बिघडलें. शास्त्रांची शिकवण बाजूला पडली. अशा मोठ्या कर्कश काळांत त्या भगवंताचा महिमा गाण्यासाठीं, योगज्ञानाचा

प्रसार करण्यासाठीं, समन्वयाचा योग उपदेशिण्यासाठीं प्रत्येक घरांत शांति नि सुख निर्माण करण्यासाठीं हिमालयाच्या पावन परिसरांत, गंगेच्या कांठीं या संस्थेची स्थापना करण्यांत आली."

स्वामिजींच्या आश्रमांतील कार्यक्रम सर्व साधकांना कार्यक्षम ठेवणारा आहे. प्रत्येक साधकाच्या शक्तीचा व्यय योग्य मार्गांनीं होतो का नाहीं याकडे स्वामिजी विशेष लक्ष घालीत. पहांटे ब्राह्म मुहूर्तावर उठावयाचें व पहिला कार्यक्रम प्रार्थनेचा असावयाचा. ही प्रार्थना प्रत्येकजण आप-आपल्या कुटींतच करीत. परंतु थंडीच्या दिवसांत, जुन्या संवयीमुळें कांहीं तरुण साधक वेळेवर उठत नसल्याचें त्यांना आढळून आलें. हा पहांटेचा काळ तर साधनेच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा आहे. स्वामिजींनीं याबाबत अनेक वेळां नि अनेक ठिकाणीं सांगितलें आहे. विशेष अडचणी न येतां या काळांत ध्यान साधणें सुलभ जातें. आजूबाजूचें वातावरण सात्त्विक भावानें या वेळीं भरलेलें असतें असें ते म्हणतात. स्वामिजींना साधकांनीं अशा वेळीं निजून राहिलेलें कसें रुचणार? त्यांनीं मग सामुदायिक प्रार्थना सुरू केली. कांहीं साधक ब्राह्ममुहूर्तावर उठून बसतहि; परंतु फिरून झोपेचा जबरदस्त अंमल त्यांच्यावर चढे. सामुदायिक प्रार्थनेमुळें या गोष्टींना प्रतिबंध करतां आला. साधकांना पहांटे उठविण्याची स्वामिजींची तऱ्हा मोठी अभिनव असे. आपल्या कुटीराच्या बाहेर येऊन ते मोठ्यांदा प्रणवाचा उच्चार करीत. 'ॐ श्याम, श्याम, राधे श्याम' अशा स्वरूपाच्या त्यांच्या उच्च रवांतील मंत्रपठनानें साधक जागे होत. यांतहि कांहीं तमोगुण अधिक प्रमाणांत असलेले साधक नव्हते असें नाहीं. त्यांच्यावर एवढ्यांनीं अनुकूल परिणाम होत नसे. स्वामिजी त्यांना रात्रीचें जेवण लवकर देण्याची व्यवस्था करीत. याचा परिणाम मात्र योग्य तो घडे नि ते साधक दुसरे दिवशीं ब्राह्म मुहूर्तावर जागे होत. तेथून फर्लांगभर अंतरावर असलेल्या ब्रह्मानंद आश्रमांत कांहीं साधक राहात. स्वामिजी अचानक एखाद्या वेळेस तिकडे जाऊन येत. या साधकांचा कार्यक्रम वेळापत्रकाप्रमाणें चालू आहे वा नाहीं इकडे ते लक्ष देत.

कांहीं दिवसासाठीं येणाऱ्या संसारी साधकांशीं सांसारिक गप्पा त्यांनीं कधीं मारल्या नाहींत. उलटपक्षीं घराकडील सर्व व्यवहार कांहीं काळ विसरावयास ते त्यांना शिकवत. अशा लोकांकडूनहि स्वामिजींनीं कीर्तनें, भजनें घडवून आणलीं आहेत. अशा लोकांना कांहीं वेळां ते एकादें पुस्तक अभ्यासावयास सांगत व दुसरे दिवशीं त्यावर प्रश्न विचारीत. अशा वेळीं होणाऱ्या चर्चेत त्यांच्या अडचणी ते नीट समजून घेत नि कांहींबाबत त्यांना मार्गदर्शक सूचना करीत. अशा या वैयक्तिक देखरेखीमुळें साधकांना फार समाधान वाटे. कधींकधीं तर निरनिराळ्या राष्ट्रांतील लोक एकाच-वेळीं तेथें जमत. सुट्यांच्या काळांत येणाऱ्या देशी-विदेशी साधक-पाहुण्यांची संख्या जसजशी वाढूं लागली तसतशी सामुदायिक साधनेची कल्पना पुढें आली. साधनेंतील महत्त्वाचा भाग त्या सुमारास साऱ्या साधकांनीं एकत्रित येऊन करावयाचा असें त्या कल्पनेचें प्राथमिक स्वरूप होतें. या साधना सप्ताहांनाहि आतां अध्यात्म परिषदेचें स्वरूप येऊं लागलें आहे. गेलीं वीस वर्षें नियमानें चालू असणारे हे षण्मासिक साधना-सप्ताह स्वामिजींच्या आश्रमाचें एक वैशिष्ट्य होऊन बसलें आहे. ब्राह्म मुहूर्तावरील प्रार्थना, ध्यान, जप, स्तोत्रांचें व शांतिमंत्रांचें पठन, प्रातःकालांतील आसनें, प्राणायाम, सूर्यनमस्कार इत्यादि यौगिक व्यायाम, दुपारनंतर ४ ते ६ योगसमन्वय, आध्यात्मिक मूल्यें व आजचें जग, साधनेचा प्रत्यक्ष आचरणांत आणावयाचा भाग व त्यांतील अडचणी, माणसाचें मूलस्वरूप व त्याची सर्वंकष उन्नति, वेदान्त व मानवी अडचणींचा निरास, स्वतःची सुधारणा, एकाग्रता व ध्यान इत्यादि विषयांवर चर्चा नि रात्रीं ८ ते १० सत्संग असें एकंदरींत या साधना सप्ताहांचें आजचें स्वरूप आहे.

अध्यात्मज्ञानाचें क्षेत्र हें इतर सर्व विद्येच्या क्षेत्राहून श्रेष्ठ आहे; परंतु या ठिकाणच्या कांहीं गोष्टी अशा आहेत कीं, त्यामुळें तळमळीच्या साधकालाहि योग्य वेळीं योग्य तें मार्गदर्शन मिळतेंच असें नाहीं. अजून म्हणावे तेवढे तयार न झालेले कांहीं साधक उत्साहाच्या भरांत दुसऱ्याला मार्गदर्शन करण्याच्या भरीस पडतात नि त्यामुळें साहजिकच कांहीं वेळां तें मार्गदर्शन म्हणावें तेवढें हितकारी नसल्याचें प्रत्ययाला येणें अटळ

असतें. स्वामिजींच्या आश्रमांतील या त्रैमासिक साधना सप्ताहांतून नवी दृष्टि घेऊन जाणारे साधक संख्येनें खूप आहेत. त्यांची संख्या दिवसानुदिवस वाढत आहे. जशीं माणसें तयार होत जातात तशीं कार्यक्षेत्रें निर्माण होतात. त्यामुळें शिवानंदाश्रमाचें एवढें वाढतें क्षेत्र व त्यांतील विविध सांस्कृतिक केंद्रें केवळ शैक्षणिक नव्हे तर आध्यात्मिक दृष्ट्याहि मानवाच्या विकासाला अनुकूल ठरलीं आहेत. हीं माणसें नीट तयार झाल्याखेरीज कुठल्याहि तऱ्हेचें कार्यक्षेत्र निर्माण करण्याच्या भरीस पडण्याचा सल्ला स्वामिजी बिलकूल देत नाहींत. स्वामिजींना आर्थिक अडचणीचें कांहीं वाटत नाहीं. आश्रमाला हजारों रुपयांचें कर्ज होतें व फिटलेंहि. तेजस्वी माणसें तयार होणें ही महत्त्वाची गोष्ट आहे. स्वामिजींच्याकडे कांहीं दिवस राहिलेल्या एका संन्याशानें आश्रम काढण्याबाबत स्वामिजींकडून साहाय्य मागितलें. स्वामिजींनीं त्याला जें उत्तर पाठविलें तें लक्षांत घेण्यासारखें आहे.

" ... ... ... ... तुमची तयारी, कांक्षा या गोष्टी कौतुक करण्यासारख्या आहेत. परंतु गुरु होण्याची हांव धरूं नका. नम्र सेवकाची भूमिका सातत्यानें ठेवणें जरूर आहे. साधनेंत बिलकूल खंड पडूं देऊं नका. राजे, महाराजे, जमीनदार असे कोणी माझे शिष्य नाहींत. कांहीं माझ्याजवळ राहिलेले साधक मला गुरु समजतात. मी त्यांना प्रामाणिकपणें जेवढें साहाय्य करतां येईल तेवढें करतों एवढेंच ?

निष्काम भावनेनें लोकसेवा करीत राहशील नि तुझें तेजस्वी वैराग्य त्यांना दिसून आलें तर त्यांच्याकडून तुझ्या कार्यास मदत मिळण्यास विलंब लागणार नाहीं. पैशासाठीं उगीच जीव पाखडूं नकोस. आजकाल साधक आध्यात्मिक उन्नतीकडे लक्ष द्यावयाच्या ऐवजीं इतर बाह्य भपक्याचा हव्यास करूं लागले आहेत. भारतांत आश्रम व मठ खूप आहेत. निष्काम भावनेनें कार्य करणारे कमी आहेत. आश्रम काढण्यापूर्वीं या भूमिकेंत दृढमूलीकरण झालें पाहिजे. अशा कार्यकर्त्यांच्या सहवासांत शांति, सामर्थ्य आनंद यांचा अनुभव इतरांना यावयाला हवा. तरच त्या कार्यकर्त्यास

संस्था निर्माण करून ती यशस्वी तऱ्हेनें चालवितां येईल. ... ”

आपल्या आश्रमांत विविध कार्यक्षेत्रें निर्माण करण्याच्या मागील स्वामिजींची भूमिका अशी निर्दोष आहे. आत्मज्ञानाच्या प्राप्तीकरितां चित्तशुद्धि हवी नि चित्तशुद्धीकरितां निष्काम सेवा हवी. ही निष्काम सेवा प्रत्येकाची ज्याच्या त्याच्या कुवतीप्रमाणें, स्वभावविशेषाप्रमाणें व अधिकाराप्रमाणें असणार. अशा भिन्नभिन्न लोकांना सेवेचें एकच कार्यक्षेत्र देऊन त्यांची प्रगति जलद होणें कठीण आहे. म्हणूनच स्वामिजींच्या आश्रमांत भिन्नभिन्न सेवेचीं कार्यक्षेत्रें आहेत परंतु; या कार्यक्षेत्रांतून सेवा करणाऱ्या साधकांचें साध्य एकच आहे.

भारतांतील सर्व प्रांतांतील लोक व विदेशी लोक शिवानंदाश्रमांत येत असल्यानें येथें सर्वत्र इंग्रजी व कांहीं प्रमाणांत हिंदी याच भाषा बोलल्या जातात. इंग्रजी भाषा परकीय असल्यानें त्याबाबत स्वामिजींना विचारल्यावर त्यांनीं उत्तर दिलें, “ ... ... ... सहिष्णु वृत्ति ठेव. इंग्रजी भाषाहि ओंकारांतून निर्माण झाली आहे. ‘योग वेदान्त’ हें मासिक सोडल्यास आश्रमाचीं सर्व नियतकालिकें व स्वामिजींचीं पुस्तकें इंग्रजींतूनच प्रसिद्ध झालीं आहेत. परराष्ट्रांच्या फ्रेंच, स्पॅनीश, डॅनीश, जर्मन या भाषांतून व भारतांतील प्रांतिक भाषांतून त्यांच्या अनेक पुस्तकांचीं भाषांतरें नंतर झालीं. व्यक्तीला विश्वमय बनण्यास प्रवृत्त करणाऱ्या स्वामिजींच्या इंग्रजी प्रार्थना मनोहर आहेत. १९५० मध्यें अनेक दूरदूरच्या मान्यवर लोकांच्या विनंतीवरून त्यांनीं अखिल भारत-सिलोन असा धांवता दौरा काढला. त्या वेळीं अनेक शाळा, कॉलेजें, विद्यापीठें व अशाच सांस्कृतिक व आध्यात्मिक संस्थांतून झालेलीं त्यांचीं भाषणें सध्याच्या काळांत माणसाला योग्य ती जीवनदृष्टि देणारीं आहेत. संघर्षांत सुख नाहीं. सुख एकतेंत सामावलेलें आहे. धार्मिक भेद ही तर अत्यंत दुःखद गोष्ट आहे. धर्मानें लोकांचीं अंतःकरणें एक होतात. धर्मानें अद्वैत संभवतें. कोणत्याहि धर्माचा खरा अनुयायी दुसऱ्या धर्माचा द्वेष करणार नाहीं. उलटपक्षीं तो भिन्न धर्मानुयायांत सदिच्छा, समजूत, शांति नि समेट घडवून आणण्याचा प्रयत्न करील. मानवी मनाचा अधार्मिक भागच

संघर्ष निर्माण करतो असें ते म्हणतात. हा अधार्मिक भाग म्हणजे स्वार्थ, हांव, अहंकार नि पाशवी विकारांचें थैमान. यांतूनच भीति निर्माण होते नि भीतींतूनच युद्धें संभवतात. जगांतील कोणत्याच धर्मानीं हीं असुरीं तत्त्वें उचललेलीं नाहींत. आज आपण अणुयुगांत राहात आहोंत. अशा वेळीं सत्वर हृदयपरिवर्तन आवश्यक आहे. प्रेमाच्या बंधनानें साऱ्या हृदयांना बद्ध केलें पाहिजे. पशुवत् आचरण नष्ट केलेंच पाहिजे. ही गोष्ट धर्माचरणानेंच शक्य आहे. धार्मिक संघर्षाचें आणखी एक कारण म्हणजे विद्वान् पंडितांचें पांडित्यप्रदर्शन. खरा अनुयायी कधीं वितंडवादांत पडणार नाहीं. त्याची पूर्णतेकडे वाटचाल सुरू असते. नवनवीन तत्त्व-प्रणाली निर्माण करण्यांत, त्यांचा उद्घोष करण्यांत, नि भेदांत भर घालण्यांत कांहींची विद्वत्ता गुंग असते. या साऱ्यापेक्षां धर्माचरणाची अधिक गरज आहे. आणि म्हणूनच स्वामिजींनीं अगदीं योग्य वेळीं १९५३ मध्यें शिवानंदाश्रमांत सर्वधर्म परिषद भरविली. यांतून ज्याला त्याला आपआपल्या धर्माचें खरें माहात्म्य लक्षांत येईल नि त्यांतील आचारांची शिकवण कळेल व वळेल या विश्वासानें हें युगप्रवर्तक कार्य घडवून आणण्यांत त्यांनीं पुढाकार घेतला. या परिषदेची यशस्विता ही जागतिक शांतीची नांदी होईल हें स्वामिजी ओळखून होते. या वेळीं जगांतील भिन्नभिन्न धर्मांचे लोक या ठिकाणीं उपस्थित होते. या वेळीं भिन्नभिन्न धर्मांतील पंडितांचीं मोठीं व्यासंगपूर्ण उद्बोधक भाषणें झालीं. या भिन्न भिन्न धर्मांच्या तत्त्वप्रणालीबाबत स्वामिजींचीं भाषणें अशींच उद्बोधक आहेत. या वेळीं झालेल्या भाषणांचा पांचशेंहून अधिक पृष्ठांचा, डबल क्राउन साईज असा ग्रंथ नंतर प्रसिद्ध करण्यांत आला व त्याचें महत्त्व ओळखून परदेशांतील कांहीं विद्यापीठांनीं तो क्रमिक पुस्तकांत समाविष्ट करून घेतला. स्वामिजींचें हें कार्य मोठें म्हणावें लागेल. उद्यांचा इतिहास याचें योग्य तें मूल्यमापन करील. आजच्या घडीला ते खऱ्या अर्थानें जगद्गुरु पैकींच एक आहेत.

स्वामिजी आज ७३ वर्षांचे आहेत. आजहि ते दिवसभर कार्यरत असलेले दिसतात. हा व्याप पूर्वीपेक्षां कमी झाला आहे. ते कधीं उदासीन

दिसत नाहींत. पूर्वीप्रमाणें येणाऱ्या जाणाऱ्या साधकांशीं चर्चा करणें, मधून मधून सूक्ष्म विनोद करणें, तेथें राहिलेल्या साधकांवर योग्य तें काम सोपविणें, पत्रव्यवहार करणें या गोष्टी यथाक्रम चालू आहेत. सतत भावमग्न राहणें त्यांना साधून गेलें आहे. चोवीस तासांतून साधनेचे पांच सहा भाग ते करीत असतात. जप, ध्यान, आसनें, प्राणायाम, पूजा, अध्ययन, लिखाण व कांहीं आजाऱ्यांची सेवा हें त्यांच्या साधनेचें आजचें स्वरूप आहे.

मोठ्या योजना नाहींत, प्रकल्प नाहींत, परंतु दरवर्षी आश्रमाची वाढ होत चालली आहे. साधकांची संख्या वाढत चालली आहे. योग्य मार्गानें सेवा करीत राहिल्यास परमेश्वर कांहीं कमी करीत नाहीं. जग तुमच्या पाठीशीं उभे राहील असा त्यांचा दृढ भाव आहे. त्यांच्या कांहीं चहा-त्यांनीं आश्रमाला मोठी मदत मिळविण्याच्या दृष्टीनें १९४०मध्यें पंजाबच्या दौऱ्याची योजना आंखली. ठिकठिकाणीं प्रचंड प्रमाणांत तयारीहि सुरू केली. परंतु स्वामिजींना हें कळल्यावर त्यांनीं या मान्यवर संघटकांना तारेनें कळविलें, "डिव्हाईन लाईफ् सोसायटी वा आश्रम यापैकीं कुठल्याच संस्थेची मला चिंता नाहीं. परमेश्वरी कृपा असेल नि आपण साधना व योग्य मार्गानें सेवा करीत चाललों तर जरुरीपुरती मदत मिळाल्याविना राहाणार नाहीं. गंगेच्या कांठीं या टीचभर कुटींत राहून मला जें करतां येईल तें करूं द्या. आश्रमासाठीं पैशाच्या मदतीची इच्छा मनांतून समूळ उखडून काढा."

स्वामिजींचें असें हें अनासक्त कार्य आहे. करून अकर्त्याची भूमिका त्यांनीं प्राप्त करून घेतली आहे. आजच्या घडीला त्यांच्या कार्याची साऱ्या जगाला गरज आहे असेंच त्यांच्या आश्रमांत जाऊन आलेल्या मोठमोठ्या देशी-विदेशी लोकांनीं बोलून दाखविलें आहे. अशा वेळीं परमेश्वरानें त्यांना त्यांच्या या विश्वकल्याणाच्या कामासाठीं दीर्घायुरारोग्य द्यावें अशीच इच्छा कुणीहि करील.

* * *

# व्यक्तिमत्त्व

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

जर्मन विद्यापीठाची तत्त्वज्ञानांतील पी. एच. डी. ची पदवी घेतलेल्या व स्वामिजींच्या आश्रमांत कांहीं दिवस राहिलेल्या एका जर्मन साधकाची ही एक मुलाखत आहे. ही मुलाखत झुरिच वृत्तपत्र वार्ताहारानें घेतली. वार्ताहराचा पहिला प्रश्न अगदीं साधा होता. "स्वामी शिवानंद, त्यांचें तत्त्वज्ञान, त्यांची शिकवण यांच्या संबंधीं तुम्हाला काय वाटतें ?"

"प्रेरणा देण्याचें स्वामिजींचें सामर्थ्य फार मोठें आहे. न्यूनगंड, औदासीन्य इत्यादि गोष्टी स्वामिजींच्या सहवासांत जाणवत नाहींत. या गोष्टींना जणुं त्यांच्याजवळ बिलकूल थारा नाहीं. त्यांचा स्वभाव गोड आहे. वैयक्तिक व नियतकालिकांतून केलें जाणारें मार्गदर्शन मोलाचें आहे. हें मार्गदर्शन मिळविणारे लोक संख्येनें खूप आहेत. स्वामिजींची अशी ही समाजसुधारणा विरोधरहित म्हणावी लागेल. वागण्यांतील भारदस्तपणा, आज्ञेतील सौजन्य या त्यांच्या गोष्टीहि प्रत्येकानें नीट लक्षांत घेऊन आपल्या स्वभावांत मुरवाव्यात. त्यांची ही वागण्याची तऱ्हा म्हणजे माणसाच्या हृदयापर्यंत पोहोंचण्याची कला आहे."

कुठल्याहि स्वरूपाचा सरकारी शिरपेंच नसलेला हा मनुष्य निर्भय आहे. बहुजनांना खेंचून मोठ्या आत्मविश्वासानें त्यांना देवकार्याकडे वळण्याची प्रेरणा देण्याचें सामर्थ्य त्यांच्याजवळ आहे. जीवनदृष्टींत मूलभूत बदल

घडवून आणणारा त्यांचा संदेश राष्ट्राराष्ट्रांतून जाऊन पोहोंचला आहे. सत्य हाच परमेश्वर. तो सर्वव्यापी आहे. कोणत्याहि धर्मांतील वा योगांतील आचरणानें मनुष्याला सत्याचा साक्षात्कार होतो. धर्माधर्मांतील ही विविधता नाहींशी व्हावी असें त्यांना वाटत नाहीं. किंवा विश्वधर्माच्या झेंड्याखालीं सारी मानवजात एक व्हावी असाहि त्यांचा अट्टाहास नाहीं. भिन्नभिन्न मनोवृत्तीसाठीं अशा भिन्नभिन्न जीवनपद्धतीची जरुरी आहे असेंच त्यांना वाटतें. प्रत्येकजण विकासाच्या कोणत्या ना कोणत्या अवस्थेंत असतो. त्या दृष्टीनें विविधता हवीच आहे. प्रत्येक धर्माचें अंतिम स्वरूप एकच आहे. एकच सत्य साऱ्या धर्मांच्या बुडाशीं आहे हेंहि त्यांनीं मोठ्या कुशलतेनें सांगितलें आहे, मन, बुद्धि, प्राण, इंद्रियें या साऱ्यांचें उगम-स्थान तें एक सत्यच आहे. मानवी मनोरचनेंतील अगाध विविधता स्वामिजी चांगली ओळखून आहेत नि म्हणूनच मिळतें घेणें, परस्पर समजूत, परमतसहिष्णुता या गुणांची महती त्यांच्या दृष्टीनें विशेष आहे. अध्यात्माकडे अगदीं अंशमात्र कल असलेल्या व अनधिकारी व्यक्तींना-सुद्धां स्वामिजींच्या जवळ प्रवेश आहे. कडक तपाचरण नि साचेबंद साधना यांच्याशिवाय या लोकांचें संपूर्ण स्वभावपरिवर्तन स्वामिजी घडवून आणतात हा आजवरचा अनुभव आहे.

साधकांच्या वैयक्तिक अडचणी लक्षांत घेऊन मोठ्या प्रेमानें ते त्यांचा विकास घडवून आणतात. जणुं स्वामिजी केवळ आपल्याच साठीं अवतरले आहेत अशा स्वरूपाची जाणीव साधकांना होते. तशी जाणीव निर्माण करण्याचा स्वामिजी प्रयत्नहि करतात. साधकांबरोबर सर्व प्रकारचें मनो-दौर्बल्य ते अनुभवूं शकतात. चहा, पान, सिगरेट इत्यादींचीं संवय असलेल्या देशी विदेशी साधकांना त्यांच्या अभावीं कसें होत असेल याची पूर्ण कल्पना ते लक्षांत घेतात. सुरुवातीलाच कडक बंधनें त्यांच्यावर लादलीं जात नाहींत. आश्रमांतील खुद्द त्यांच्या कुटीरांत साधकांना चहा वा कॉफी मिळते. चहा कॉफीचा विरोध करणाऱ्या स्वामिजींच्या बाबतीत हें कसें घडतें? जीभेवर विलक्षण नियंत्रण ठेवणारे स्वामिजी दुसऱ्याला एवढी मोकळीक कां देतात? साधकाला स्वतःच्या मनाच्या

दौर्बल्याचें दर्शन घडवून देणारी स्वामिजींची पद्धत जरा वेगळी आहे. कडक तपाचरण केलेले साधु-संन्यासी सामान्य साधकाच्या मनोदौर्बल्याबाबत, त्याच्या स्खलनशीलतेबाबत किती उदार असतात याची कल्पना बहुतेक वाचकांना असेल! अशा साधकांची व संसारी लोकांची एक तऱ्हेची कींव करण्याची भूमिका त्यांच्यांत न कळत निर्माण झालेली असते. मग अशा साधकाशीं एकरूप होणें किती कठिण आहे! स्वामिजींनीं पद्धतशीर प्रयत्नानें ही गोष्ट मिळविली आहे असें अनेक वेळां दिसून येतें. त्याचा चांगुलपणा, त्याचे सद्गुण व्यक्त होतील असे अनेक प्रसंग स्वामिजी आणून देतात. अशा तऱ्हेनें प्रत्येकाला त्याच्या त्याच्या स्वतंत्र मार्गानें जाऊं देतात त्याच्या हातून प्रमाद न होईल याबाबत ते जागरूक असतात. त्यांची प्रेमळ दृष्टि अशी सदैव सावधान असते. आपला आयुष्यभरचा अनुभव, जें ज्ञान मिळविण्यासाठीं ग्रंथाध्ययनांत अनेक वर्षे घालवावीं लागतात तें ज्ञान, नि अशी कांहीं माहिती कीं, जी साधकांच्या शक्यतों लवकर हातीं लागत नाहीं हें सर्व अगदीं लहान नि सोप्या वाक्यांतून वरचेवर सांगितलें जातें. कधीं गाण्यांतून, कधीं ग्रंथांतून नि तें सुद्धां अशा प्रकारें कीं, तुम्ही विसरणें कठिण!

जलप्रवासाचे कष्ट न घेतां युरोप-अमेरिकेच्या हजारों स्त्री-पुरुषांना पत्रद्वारें, ग्रंथद्वारें आपलें अदृश्य सर्वव्यापी अस्तित्व ते जणुं जाणवून देऊन मार्गदर्शन करतात. आपल्या ग्रंथांतून ते बोलतात. जणुं तुमच्या समोर बसून तुम्हाला ते सांगताहेत असें त्यांचीं पुस्तकें वाचतांना वाटतें. कांहीं क्षणांचा त्यांचा प्रत्यक्ष सहवास तुम्हाला एकतऱ्हेच्या विश्वासाचा, शहाणपणाचा प्रत्यय आणून देतो. आत्म्याच्या अमाप वैभवाची आठवण तुम्हाला करून दिली जाते. तुमच्यांतील सुप्त गुण तुमच्या ध्यानीं आणून दिले जातात. सगळ्यांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे तें शहाणपण, ती शक्ति, तो अनुपम आनंदाचा उत्सर्ग—जो जीवाकडून भोगला जाण्याची वाट पाहात आहे—त्याच्या अस्तित्वाची जाणीव तुम्हाला करून दिली जाते. पशुत्वापासून मानवतेकडे व मानवतेपासून देवत्वाकडे अशी ही त्यांच्या आश्रमांतील साधकांची वाटचाल शैक्षणिक दृष्ट्याहि लक्षांत घेण्यासारखी आहे.

शिवानंदांच्या विषयीं कांहीं विचारलें असतां जें बोललें जातें त्याच्यांतील सामान्य सूर हा असा आहे.

विचार हा भावस्पर्शी हवा. बुद्धीला उजाळा देणारा हवा. जीवनरस देणारा हवा. व्यक्तिमत्त्वाला वेगळें तेज देणारा हवा. या व्यतिरिक्त असलेले विचार भारभूत असतात. सखोल अनुभवांतून निर्माण होणाऱ्या भावनांनीं माणसाच्या बाह्य जीवनांतहि सामर्थ्य ओतलें पाहिजे. अशा तऱ्हेचे विचार केवळ पांडित्यप्रचुर ग्रंथाध्ययनामुळें निर्माण होऊं शकत नाहींत याचा अनुभव कुणाला नाहीं असें नाहीं. या ग्रंथांची महती कमी प्रकारची असते अशांतीलहि कांहीं प्रकार असत नाहीं. परंतु जीवनदृष्टींतील पूर्ण परिवर्तन, सहजप्रवृत्तीचें उदात्तीकरण, अपरोक्ष अनुभव या गोष्टी केवळ अशा तऱ्हेच्या ग्रंथाध्ययनामुळें होणें ही गोष्ट अगदीं मोजक्याच निग्रही माणसांच्या बाबतींत शक्य झाल्याचीं उदाहरणें असतील. त्या विचारांमुळें सर्वसामान्य व्यक्तिमत्त्वाला आकार येणें ही गोष्ट अशक्यच असल्याचें दिसून येतें. तीव्र जीवनकलहाच्या आपल्या रोजच्या जीवनांत त्यामुळें कांहीं बदल होऊं शकत नाहीं. वैयक्तिक, नैतिक नि आध्यात्मिक प्रेरणेसाठीं जीवनांतील अनेक नि विविध अडचणींच्या प्रसंगीं पत्करावयाचा दृढ दृष्टिकोन, बुद्धीला तेज देणारें मार्गदर्शक शहाणपण, आणि अशा स्वरूपाच्या जीवन उंचावण्याच्या बाबतींत निर्माण झालेल्या समस्या अशा वेळीं जर कोणत्या गोष्टीची प्रामुख्यानें जरूर असते तर ती परिवर्तन घडवून आणणाऱ्या, बुद्धीला उजाळा देणाऱ्या विचारांची. स्वामिजीचे विचार या प्रकाराचे आहेत. त्यांचें मन जणुं ज्ञानाचें साधन नसून आध्यात्मिक अनुभव आविष्कृत करण्याचें साधन आहे. त्यांच्या पुस्तकांतील कोणताहि परिच्छेद, कोणतीहि छोटीं सूत्रें वाचकांस समग्र जीवनाकडे वाटचाल करावयास लावणारीं आहेत. केवळ तर्क, बुद्धिवैभव, भाषा या गोष्टींचें प्रदर्शन त्यांच्या पुस्तकांतून कधीं पाहावयास मिळणार नाहीं. त्या जाणीवस्वरूप परमात्म्याशीं जुडलेलें त्यांचें मन वाचकाला, श्रोत्याला जणुं विचाराच्या उद्धरणशक्तीचा परिचय करून देत असतें; त्यांची जीवनदृष्टि बदलून टाकतें; आपल्या संकुचित स्वरूपाच्या धडपडींत

एक तऱ्हेचें सामर्थ्य ओततें; अडचणींचा निरास करतें. त्यांच्या लिखाणांतील विचार वाचकाला जणुं वैयक्तिक प्रश्नांचीं उत्तरें देणारे वाटतात. एकवार त्यांची ओळख झाल्यानंतर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा असाधारण ठसा कुणाहि अभ्यागताच्या मनावर पडतो याचें एक कारण त्यांच्या या उन्नतिकारक सेवेंत सांपडतें.

सुखाचा शोध सर्वसामान्य आहे. आजवरच्या साधुसंतांनीं हा सुखाचा शोध सुलभ करण्याचा प्रयत्न केलेला आहे. कुणाच्याहि भावना न दुखवितां हें कार्य करण्याची बहुतेकांची इच्छा दिसून येते. एखाद्याला स्वर्गसुखाचें वा मोक्षसुखाचें आश्वासन देण्यापूर्वीं त्याच्या मनाला प्रथम शांतवा असें म्हणतात. स्वामिजींच्या बाबतींत ही गोष्ट पाहावयास मिळते. त्यांच्या-जवळची नुसती दयाबुद्धिच नव्हे तर प्रेमाचा पाझरता भाव त्यांच्या प्रत्येक कृतीमागें नि शब्दामागें अधिष्ठित असलेला अनुभवास येतो. सुखाचा विचार हा असा त्यांच्या बोलण्या-लिहिण्यांतून नेहमींच व्यक्त होतो. कोणत्याहि व्यक्तीच्या जीवनाचा तिरस्कार न करतां सर्वंकषतेकडे नेणाऱ्या त्याच्यांतील गुणांना प्रोत्साहित करण्यांत त्यांना आनंद वाटतो. शाश्वत मूल्याकडे, त्या वैभवपूर्ण जीवनाकडे व्यक्तीची नजर फिरविणें त्यांना चागलें साधलें आहे.

धडपडणाऱ्या मानवी मनाला उमेद देणारीं त्यांचीं वक्तव्यें व त्यांच्या या पद्धती त्यांनीं मिळविलेल्या इंद्रियातीत आनंदाच्या अनुभवाचें द्योतक आहे. गीतेंत सांगितल्याप्रमाणें ( १५ वा अध्याय, पुरुषोत्तम योग ) खऱ्या अर्थानें ते सच्चिदानंदस्वरूप मानव आहेत. व्यक्तिमत्त्वामध्यें प्रसन्न-तेचा प्रकर्ष हवा. औदासीन्य पसरविणाऱ्या लोकांना व्यक्तिमत्त्वच असत नाहीं. एकादा गंभीर प्रकृतीचा मनुष्य शांतपणानें दुःखें सहन करीत चित्तशुद्धि करून त्या दिव्य प्रसन्नतेच्या प्राप्तीसाठीं धडपडत असतो. साऱ्यांनाच हा मार्ग सुखकर वाटतो असें नाहीं. कुणी एका पाश्चात्य विचारवंतानें 'जास्तींत जास्त लोकाचें जास्तींत जास्त सुख' हा नीतिमत्तेचा पाया असावा असें म्हटलें आहे. परंतु सुख ही गोष्ट बाह्यापेक्षां आंतरिक

मनोवृत्तीवर अवलंबून आहे. स्वतःजवळील आनंदाच्या उगमाकडे हजारोंचें लक्ष वेधण्यांत स्वामिजी यशस्वी झाले आहेत.

**There is a fountain of joy within you.**
**Tap the source and drink the cup of bliss**

त्यांच्या लिखाणांत अशा स्वरूपाचे विचार अगदीं स्पष्टपणें आले आहेत. अशा तऱ्हेनें अवीट सुखाच्या प्रवृत्तीची प्रेरणा देणाऱ्या स्वामिजींच्या हंसतमुख चेहऱ्याकडे पाहिल्यावर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाविषयीं आदर दुणावा यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं. विनोद, वात्सल्य, विनंति नि एक तऱ्हेचें अनुपम अगत्य या साधकाबाबतच्या विचार-विनिमयांतील त्यांच्या गोष्टी पाहिल्यावर साधकच गुरूपेक्षां श्रेष्ठ वाटावा! साधकाच्या संस्कारक्षम जीवनांतील सत्कार्याकडे प्रवृत्त झालेल्या गोष्टी हेरणें नि त्याला अनुसरून कांहीं सूचना देणें त्यांना साधलें आहे. साधकाच्या सैरावैरा धांवणाऱ्या शक्तीला ते मार्ग आंखून देतील. वर्तमानांतून आरपार पाहाणाऱ्या द्रष्ट्याप्रमाणें मनोबोध करतील. नि हें सर्व काम जवळच्या मधुर शब्दांनीं करण्याची त्यांची संवय आहे. ते जगद्गुरु म्हणून ओळखले जाऊं लागले याचें रहस्य त्यांच्या या माधुर्यांतहि आहे. तत्त्वप्रणालींतील दाहकता, भावनाशून्य पृथक्करण, तीक्ष्ण बुद्धीनें व्यक्त केली जाणारी तात्त्विक सूक्ष्मता या गोष्टींनीं त्यांच्या साध्या सरळ विचार-सरणींत व बोलण्याचालण्यांतील गोडव्यांत कुठलाहि बेंगरूळ बदल केलेला नाहीं. कोणतेंहि पत्र पाठवितांना त्यांत गोड शब्दांचा मधु असल्याची ते खात्री करून घेतील.

अशा तऱ्हेनें, आलेल्या माणसाच्या चांगल्या गोष्टीचें कौतुक करण्याची त्यांची पद्धति मोठी परिणामकारक ठरली आहे. अशा तऱ्हेच्या सौम्य स्तुतीनें, आलेल्या माणसाचे स्वतःविषयीचे हीन भाव सुरुवातीलाच कमी केले जातात. अधिकारी माणसाकडून होणाऱ्या अशा तऱ्हेच्या संभावनेचें महत्त्व वेगळें आहे. सामान्य संसारी माणसाला तेजस्वी जीवन जगावयास शिकविणाऱ्या अध्यात्माच्या क्षेत्रांतील अधिकाऱ्यांच्या जवळ अशी वृत्ति असल्यास विचारप्रसाराचें त्याचें कार्य किती प्रभावी होतें याची कल्पना

स्वामिजींच्या दिव्य जीवन मंडळाच्या वाढत्या व्यापावरून येण्यासारखी आहे. स्वतःच्या सहज प्रवृत्तींना शक्य तेवढा लगाम घालून अगदीं स्वाभाविक जीवन जगणाऱ्या माणसाला अध्यात्माचें क्षेत्र परकें वाटूं नये. स्वामिजीशीं बोलतांना, त्यांचे विचार ऐकतांना आलेल्या माणसाला नवीन निर्दोष दृष्टीनें जीवन जगण्याची उमेद वाटते. व तसें त्यांना वाटावें असा पद्धतशीर प्रयत्न ते करतात. आपल्याजवळ गंगेकांठीं राहिलेल्या साधकांपेक्षां दुरून आलेले व दूर राहणारे संसारी व असंसारी साधक कुठल्याहि तऱ्हेनें कमी नाहींत अशी त्यांची भावना आहे. विकारी प्रकृतीशीं झगडत मनुष्य आपला विकास करून घेत असतो. त्याचें मूलस्वरूप कलंकरहित आहे. आजचा पापी उद्यांचा संतहि असतो. स्वामिजींचा हा दृढ भाव आहे आणि म्हणून कुणाहि व्यक्तिमत्त्वांतील उजाळा देणाऱ्या सद्‌गुणाच्या लहानसहान स्फुल्लिंगांना चेतविण्याची त्यांची हातोटी अनेकांना हितकारक ठरलेली दिसते. त्यांचीं कांहीं पत्रें तर गौरव करणारीं, आशीर्वाद देणारीं अशा स्वरूपाचीं असतात. साहजिकच आपल्या मनांतील विकासाच्या वाटचालीची अंधुकशी शक्यता यापुढें वृद्धिंगत होते नि आजपर्यंत चांगल्या म्हणून मानलेल्या गोष्टी जेवढ्या प्रमाणांत आचरणांत आणतां येतील तेवढ्या आणण्याचा प्रयत्न होऊं लागतो. योग्यतेनुरूप ते कांहींना 'श्रद्धारत्न,' 'अध्यात्मरत्न' 'कीर्तन-केसरी' अशा स्वरूपाच्या कांहीं पदव्या देतात. त्यांच्या पत्राची सुरुवातच Blessed self वा Adorable self वा Revered Atman, Glorious Atman अशा कुठल्या तरी एका मायन्यानें होते. स्वामिजीसारख्या व्यक्तिमत्त्वानें केलेला आपला गौरव, त्याचें नुसतें स्मरण देखील आपणाला चेतविणारें ठरतें. कुणाहि माणसाला त्यांनीं केलेल्या गौरवाला पात्र होण्याचा प्रयत्न करण्याची उमेद वाटते. अशा तऱ्हेनें स्वामिजींच्या कडून प्रत्यहीं अनेक व्यक्तिमत्त्वें घडविलीं जात आहेत. सत्कृत्याची प्रेरणा प्रबल केली जात आहे. नेणीवेंतील सुप्त चांगले भाव कार्यरत केले जात आहेत. अशा तऱ्हेनें ज्या मनांना तेजस्वी केलें, जीं हृदयें विशाल केलीं, जीं व्यक्तिमत्त्वें उन्नत केलीं त्यांना स्वामिजींचें भव्योदात्त व्यक्तिमत्त्व पूजनीय

वाटलें यांत कांहींच नवल नाहीं. अशा तऱ्हेनें माणसाला त्याच्या मूळ स्वरूपाचा शोध घेण्यास प्रवृत्त करणाऱ्या स्वामिजींना व्यक्तिमत्त्व घडविणारे व व्यक्तिमत्त्वाचे पोवाडे गाणारेच म्हटलें पाहिजे. प्रत्येकाचें मूळ स्वरूप तेजस्वी आहे या तऱ्हेची नुसती भावना मनांत बाळगणारे नव्हे तर त्या दृष्टीनें मानवी स्वभावांतील गुणांचा उत्कर्ष करण्यासाठीं अविश्रांत कष्ट घेणारे स्वामिजी खऱ्या अर्थानें व्यक्तिमत्त्वाचीं स्तोत्रें गाणारे गायक व व्यक्तिमत्त्व घडविणारे कुशल शिल्पकार आहेत.

एकदां भेटलेल्या माणसांना स्वामिजी कधीं विसरूं शकत नाहींत. दहा बारा वर्षांच्या अंतरानें भेटलेल्या अल्पपरिचितांना सुद्धां हा जिव्हाळ्याचा नि गोड अनुभव येतो. आपली पूर्ण माहिती असलेल्या स्नेह्याप्रमाणें त्यांनीं केलेली विचारपूस हा अनुभव गोड नाहीं का ? स्मरणशक्ति तीव्र असलेल्या माणसांचीं उदाहरणें खूप आहेत; परंतु त्यांतील बरीचशीं उदाहरणें अशा लोकांचीं आहेत कीं, ज्यांची स्मरणशक्ति एका वा दुसऱ्या विशिष्ट क्षेत्रांतच अत्यंत चोख असते. एखादी वस्तु, प्रसंग, चेहरा, शब्द यापैकीं प्रसंगानुरूप जरूर असलेली गोष्ट त्यांच्या चटकन् लक्षांत येते. त्यांच्या स्मरणशक्तीचा असा हा विलक्षण विलास पाहिला म्हणजे Dr. Carrel यांच्या 'Man the Unknown' या पुस्तकांतील खालील उद्गारांची सत्यता लक्षांत येते. "The nature of memory like that of psychological time, remains unknown" अंतर्यामीच्या आत्मिक आनंदाच्या कोणत्या प्रक्रियेनें त्यांची स्मरणशक्ति एवढी कार्यक्षम होऊं शकली या प्रश्नाच्या बाबतींत आपलें पढत पांडित्य उपयोगांत न आणणेंच शहाणपणाचें ठरेल. ज्यांना स्वामिजींचे आशीर्वाद मिळाले ते हृदयांतील सुखद 'स्मृतीच्या' दृष्टीनें श्रीमंतच म्हणावे लागतील.

स्वामिजींच्या सहवासांत येणाऱ्या मनःशांतीचा अनुभव सर्वस्वी वैयक्तिक स्वरूपाचा म्हणून बाजूला ठेवूं. सॉमरसेट मॉम ज्या वेळीं रमण-महर्षींच्या आश्रमांत गेले त्या वेळीं ते उन्हाच्या त्रासानें फार दमून गेले होते. आश्रमांत आल्यावर तर त्यांना गळून गेल्यासारखें झालें व मूर्च्छा आली. आश्रमांतील भाविक लोकांनीं या गोष्टीचा अर्थ अर्थात् स्वतःच्या

श्रद्धेला अनुसरून लावला. महर्षींच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव त्यांना याहि गोष्टींत दिसून आला. रमणमहर्षि सॉमरसेट मॉमना ज्या खोलींत आणण्यांत आले तेथें गेले. नेहमीप्रमाणें शांत नि स्थिर चित्तानें त्यांनीं त्यांच्याकडे कांहीं वेळ पाहिलें. मॉमना शुद्धि आल्यावर त्यांना महर्षींची प्रसन्न मुद्रा पाहून अधिक स्वस्थ नि सुखकारक वाटलें. याविषयीं लिहितांना ते म्हणतात, "माझी वृत्ति महर्षींना पाहिल्यावर उल्हसित झाली हें खरें. हा कदाचित् मला मिळालेल्या विश्रांतीचाहि परिणाम असावा." थोर व्यक्तिमत्त्वाच्या सहवासांत अंतर भरून आल्यासारखें वाटणें, एक तऱ्हेच्या उन्नत भावनेनें अंतर व्यापून जाणें या अनुभवाचा निश्चित अन्वय लावण्याचा प्रयत्न करणें ही गोष्ट मॉमसारख्यांनाहि संभ्रमाची वाटली यांत मोठा अर्थ आहे. विशाल बुद्धीला, चतुर शहाणपणाला, एकत्वाचा अनुभव प्राप्त झालेल्याला यांत अगम्य असें कांहीं नाहीं, हें उपनिषत्कारांनीं त्या आनंदस्वरूपाची मीमांसा करून दाखवून दिलें आहे. सामान्य माणसाच्या मर्यादित जाणीवेच्या कोशांतील दिव्य अनुभूतीचें दर्शन अशा महात्म्यांना झालेलें असतें. आपल्या सहवासांत त्याचाच थोडाबहुत अनुभव ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें असे महात्मे आणून देतात ही त्यांची कृपादृष्टि होय. आध्यात्मिक नि नैतिक साधनेनें शुद्ध झालेल्या सूक्ष्म दृष्टीला लौकिक जीवन वैभवपूर्ण करणारी, महात्म्यांच्या जीवनांतील वस्तुस्थिति नीट आकळलेली असते. अद्वैताच्या उत्कट अनुभवाची आणि सुखाच्या पूर्णतेच्या प्रत्ययाची ही वस्तुस्थितिच शिवाजीचा पराक्रम, भास्कराचार्यांची बुद्धिमत्ता, बुद्धाची करुणा नि कालीदासाची प्रतिभा इत्यादि भव्य आणि दिव्य गोष्टींचें उगमस्थान असतें.

अशा तऱ्हेनें त्या चेतनास्वरूप सत्याचा प्रत्यय आल्याखेरीज नि विशाल प्रेमाच्या वागणुकीनें क्षुद्र गोष्टींचा त्याग केल्याखेरीज नि सहज-प्रवृत्तींचें नियंत्रण करणारी प्रेरणा प्राप्त करून घेतल्याखेरीज, अंतर्यामीचें सुप्त सामर्थ्य बाह्य जीवनांतहि मिळविल्याशिवाय, मोठेपणा नि सुख मिळणारहि नाहीं आणि कळणारहि नाहीं. विशाल जाणीवेचें चालतें-बोलतें प्रतीक असें स्वामिजींचें स्वरूप आहे. परतत्त्वाला स्पर्श केलेल्या

प्रज्ञेचा हा पुरुष विश्वपुरुष बनला आहे. स्वामिजींचें जीवन म्हणजे आपल्या मूळ तेजस्वी स्वरूपाचीं रहस्यें व्यक्त करणारा एक छोटा लेख आहे. मानवांतील सुप्त सामर्थ्यांची विविधता नि वैभव याची कल्पना स्वामिजींच्या जीवनावरून करणें हा एक अभ्यास आश्रमांत येणाऱ्यांना व स्वामिजींच्या जवळ कांहीं काळ काढणाऱ्या तत्त्वज्ञानाच्या अभ्यासूंना जिव्हाळ्याचा वाटूं लागला आहे. नित्शेचा 'अति मानव' वा 'कांटचा 'अमूर्त आदर्श मानव' इत्यादींचा पगडा पाश्चात्यांच्यावर कितीहि असला तरी स्वामिजी-सारख्या भारतीयांचे विचार व त्यांची कार्यांतील अभिव्यक्ति यांतून त्यांना आत्मिक सामर्थ्यांच्या विविधतेचें दर्शन थोड्या फार प्रमाणांत घडत असावें असा निष्कर्ष त्यांच्या या अभ्यासाच्या दिशेवरून काढावासा वाटतो.

महायुद्धाच्या, इंद्रियसापेक्ष गोष्टींच्या समृद्धीच्या, यांत्रिक प्रगतीच्या, या विसाव्या शतकांत हजारो लोकांचे सखोल आंतरिक जीवन ते निर्माण करीत आहेत. हें कार्य त्यांच्या पुस्तकापेक्षांहि त्यांच्या अलौकिक व्यापक विराट कार्यरत जाणिवेनें घडून येत आहे. त्यांच्या दृष्टीनें शिवानंद हा शांति, स्वास्थ्य, शक्ति इत्यादि गोष्टी प्रसृत करणारा परवलीचा शब्द बनला आहे. सर्वस्वी वैयक्तिक स्मरणाच्या भावनात्मक अनुभूतीच्या बाबतींत तर पूर्ण जीवनाकडे नेणारा मार्गदर्शक प्रकाशझोतच त्यांना म्हणावें लागेल. व्यवहार, अध्यात्म, नीति, मानसिक उन्नति याशिवाय अधिक कांहींतरी त्यांच्याजवळ असल्याशिवाय त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला एवढी महनीयता आली नसावी.

त्या पैलतीराच्या प्रकाशस्वरूपाच्या अनुसंधानानें प्राप्त झालेलें सामर्थ्य, त्या परतत्त्वांत मिसळून टाकलेली स्वतःची जाणीव यामुळें स्वामिजी त्या उच्च अनुभवाच्या पातळीवरच असतात. अशा तऱ्हेची अनुभूति प्राप्त करून घेणें नि व्यवहारी जगांत चोखपणें वर्तत असतांना तिच्याशीं असलेलें अनुसंधान अणुमात्रहि नाहीसें न होणें ही गोष्टहि त्यांच्या व्यक्तिमत्त्वास मोठेपणा देणारी ठरली आहे. त्या आनंदस्वरूपांतच मग्न असतां एवढें मोठें कार्य लीलेनें लादून घेऊन साधकाच्या कार्योत्सुक मनाला सत्याच्या जवळ नेणारे मार्ग दाखवून देऊन त्या परतत्त्वाच्या सर्वंकष

वैभवाचें दर्शन स्वतःच्या मर्यादित जीवनाच्या माध्यमांतून ' याचि देहीं याचि डोळां ' घडविलें जातें. स्वामिजी म्हणजे असें हें अंतर्यामीच्या साधकांना होणारें समूर्त प्रगटीकरण होय.

मानवी जीवनांतील सुख दुःखाच्या मागील दैवी हेतूशीं पूर्ण एकरूप असलेले स्वामिजी लहान मुलाप्रमाणें क्षुल्लक गोष्टींनीं आनंदून जातात, आश्चर्यचकित होतात, त्यांच्या भावना हेलावल्या जातात. या साऱ्यांना एक तऱ्हेचा आध्यात्मिक अर्थ देऊन ते त्या त्या घटनेला एक तऱ्हेची निरामय आगाळिकता प्राप्त करून देतात. या ठिकाणीं मानवी तर्कशास्त्र त्यांची बुद्धि मानत नाही. ती त्यांच्या अलौकिक दृष्टीला धरून असते. कुणाहि माणसांतील चांगला भाग उत्स्फूर्ततेनें त्याला दाखवून देण्यांत त्यांची ही बुद्धि अत्यंत सावधान असते. नर्म-विनोद हा तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक भागच आहे. परंतु त्या प्रत्येक विनोदाचें बूड कुठल्या तरी मार्गदर्शक तंत्राला चिकटलेलें असेल. आध्यात्मिक अर्थ नसलेला विनोद त्यांच्याजवळ सांपडणार नाहीं. देवाच्या प्रसादाला लाडू केलेल्या दिवशीं सत्संगाच्या कार्यक्रमाच्या वेळीं मुलांची वाढलेली संख्या ही त्यांना फार मोठा आनंद नि त्याचबरोबर विनोदाला खाद्य पुरविणारी गोष्ट आहे. ' Divine Life for Children ' या त्यांच्या पुस्तकांतील Story of Laddu ही गंमतीची गोष्ट खूप मुलांना आवडलेली आहे. मुलांना गंमतीचीं कोडीं पाठविणें व मुलांनीं घातलेल्या गंमतीच्या कोड्यांना उत्तर देणें ही त्यांची करमणूक असली तरी त्यांच्या साहाय्यानें त्यांनीं मुलांचीं मनें फुलविण्याचा केलेला प्रयत्न हें त्याचें एक मोठें कार्य म्हणावें लागेल. God चा अर्थ गंमतीनें Governor Over Death म्हणून सांगणें, लांच घेणाऱ्या माणसाला ४२० म्हणावयाचें तर निर्विकल्प समाधीचें ढोंग करणाऱ्याला ८४० म्हणणें, कांहींच्या पोटांची नि पोस्टाच्या पेटीची तुलना करून त्यांच्या खाण्यापिण्याच्या अनियंत्रित वागणुकीची सौम्य परंतु परिणामकारक टिंगल करणें, गुणांची वृद्धि व व्यक्तिमत्त्वाला कांहींहि उंची प्राप्त करून न देणाऱ्या पदव्यांची व त्यांचा हव्यास असणाऱ्यांची अशीच विनोदानें कानउघाडणी करणें, या गोष्टी त्यांच्या स्वभावांतीलच

म्हणाव्या लागतील. Story of F. F. S. and F. T. D. ( Father of Five Sons and Father of two daughters ) या स्वरूपाच्या छोट्या गोष्टींतील त्यांचा विनोदहि तुम्हाला आत्मचिंतनाला प्रवृत्त करतो. वार्ता इकडची तिकडे कळविण्याचें जसे Telegram नि Telephone प्रकार आहेत तसेच Tele-woman हें एक परिणामकारक साधन आहे. इकडची तिकडे बातमी स्त्रिया फार लवकर पोहोंचवितात. पैसे खर्चण्याचें कारण नाहीं.

त्या निःशब्द अशा प्रदेशाची ओळख करून घे नि शाश्वत सुखाचा अधिकारी हो. अशा त्यांच्या गंमतीच्या बोलण्यांतील उतारे समोरच्या माणसाचे नुसते दोष दाखवून थांबत नाहींत. उद्बोधनाचें मोठें काम त्यांतील विधिपर ( positive ) संदेशानें होतें. सर्वंकष व्यक्तिमत्त्वाच्या प्रातीच्या दृष्टीनें ज्या गोष्टीची चर्चा सर्वथैव निरुपयोगी अशा प्रश्नोत्तर चर्चेला पायबंदहि ते आपल्या विनोदी नि व्यंगपूर्ण उत्तरानें घालतात. त्याचप्रमाणें साधकांतील असे कांहीं दोष असतात कीं, जे केवळ विचारविनिमय करून नव्हे, तर त्यांचें प्रत्यक्ष जीवन काळजीपूर्वक निहाळून स्वाभाविकपणें व सुलभतेनें नाहींसे करणें अवश्य असतें, अशांचा परामर्श पत्रोत्तररूपानें घेणें त्यांना बरें वाटत नाहीं. ‘ पांढरे केस नाहींसे करण्याचा उपाय कोणता ? ’ ‘ नित्य नियमानें क्षौर करणें. ’ पक्क मोतीबिंदु झालेल्या माझ्या डोळ्यासाठीं कृपया औषध पाठवा.’ ‘ बाधित डोळा माझ्याकडे पाठवून द्या. मी त्याच्यावर योग्य तो उपचार करून तो परत पाठवीन.’ अशा सारख्या कांहीं उताऱ्यांना त्यांच्या ‘ Wisdom through humour ’ अशा पुस्तकांतून स्थान मिळण्याचें कारण हेंच आहे. त्यांचा असा विनोद हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक निकोप व स्वतः बरोबरच इतरांची मनें टवटवीत करणारा भाग आहे. सोयीस्कर समजुतीनें सर्व प्राण्यांना समान असलेल्या सहज प्रवृत्तीला मुरड घालण्याचें मानवाचें सामर्थ्य लुळें होत जातें. तो त्यामुळें पशुपेक्षां असंयमी नि त्यामुळेंच हीन ठरतो. स्वामिजींनीं हा भाग असाच गंमतीच्या गोष्टीनें ऐकविला आहे. “ एकदां कांहीं माकडें झाडावर एकत्र जमलीं. त्यांनीं कांहीं चर्चा केली. त्यांतील एक माकड म्हणाले, ‘ लोक म्हणतात, माणूस माकडापासून

उत्क्रांत झाला. ही गोष्ट आमचा पाणउतारा करणारी आहे. माकडें आपल्या लहान मुलांची उपासमार करीत नाहींत. मुलांना टाकून देत नाहींत. स्वैराचार करून प्रकृतीचें मातेरें करीत नाहींत. 'मित्रांनो, माझ्यावर विश्वास ठेवा. डार्वीनचें म्हणणें खोटें आहे.' अशी ही गोष्ट आहे. अशीं संख्येनें विपुल नि विविध असलेलीं गंमतीचीं उदाहरणें वाचणें व त्यांच्या संवादांतून ऐकणें मोठें रंजक नि बोधक आहे.

स्वामिजींची शरीरयष्टी मोटी बळकट आहे. त्यांची उंची सहा फूट आहे. उंचीला शोभणारा लठ्ठपणाहि आहे. पूर्वायुष्यांतील कांहीं कडक तपाचरणामुळें थोडे शारिरिक दोष निर्माण झालेले आहेत. त्यामुळें त्यांच्या कर्तव्यतत्परतेंत कांहीं म्हणावी तेवढी उणीव अद्यापहि निर्माण झालेली नाहीं. तत्त्वज्ञान्यांचा प्रभाव त्यांच्या बाह्य व्यक्तिमत्त्वांत असत नाहीं. विचारांत नि आचारांत असतो. त्यांच्या भरीला सुदृढ नि नेटकें शारीरिक व्यक्तिमत्त्व असणें केव्हांहि फायदेशीरच. सुरुवातीला प्रथम दर्शनाचा परिणाम बव्हंशीं बाह्य व्यक्तिमत्त्वावर आधारलेला असतो. कुंडलिनी योग, प्राणायामाचें शास्त्र, हठयोग या त्यांच्या पुस्तकांचें मूळ त्यांच्या प्रत्यक्ष साधनेंत नि अनुभवांत आहे. याचा चालता बोलता पुरावा असें त्यांच्या या वयांतील शरीरयष्टीकडे नि कार्यक्षमतेकडे बघून म्हणतां येईल. माणसाचे अवयव शिल्पकारांनीं बोलके केलेले आहेत. डोळ्यांतील भाव हे असेच तुमच्या व्यक्तिमत्त्वाला बोलके करणारे असतात. आध्यात्मिक अधिष्ठान असल्याखेरीज व भावांत एक तऱ्हेची सार्वकालीन स्थिरता आल्याखेरीज बाह्य व्यक्तिमत्त्वांतहि एक तऱ्हेची आकर्षकता येणार नाहीं. उंची, वजन, वर्ण, चेहऱ्यावरील भाव, आवाज, पोषाख यांचा परिणाम बघणाऱ्याच्या मनावर होतोच. योगसाधना, सूक्ष्म आत्मिक अनुभव यांचा परिणाम बाह्य शरीरावर होतो. सखोल अंतरांतील समतोलतेनें बाह्यालाहि तेज येतें. स्वामिजींचें बाह्य देखणेपण नि अध्यात्माच्या क्षेत्रांतील अधिकार परस्परपूरक असल्यानें विपुल त्रिविध मुमुक्षूंचें, आर्तांचें नेतृत्व ते करूं शकत आहेत असें म्हटल्यानें मोठेपणाच्या इतर कांहीं बाबींचा कस कमी केल्यासारखें होणार नाहीं. आसन,

प्राणायाम, आहार-विहारांतील नियमितता या सर्व गोष्टीं लक्षांत घेऊन व त्यांचें योग्य तें महत्त्व मान्य करूनहि 'Imitation of Christ' या पुस्तकांतील खालील उद्‌गारांची आठवण होते.

' All his glory and beauty come from within, and there he delights to dwell, his visits there are frequent, his conversation sweet, his comforts refreshing, and his peace passing all understanding.'

नित्शेच्या Superman बाबत शॉनें आपल्या एका नाटकांत म्हटलें आहे कीं, नित्शे हा जीवनशक्तीचा पूजक होता. या नवीन खुळाचा (Crages) स्वीकार विसावें शतक जगाचा कंटाळा आल्यावर करील. इतिहास पुराणांतून रेखाटलेलीं अतिमानवाचीं बहुतेक चित्रें अशीं आहेत कीं, सामान्य लोकाजवळ असलेल्याच एका वा दुसऱ्या वा अनेक गुणांचा प्रकर्ष त्यांच्या ठिकाणीं आहे. आपल्या आंतरिक आत्मिक शक्तीचें स्वरूप, त्या शक्तीच्या व्यापक नि विशाल क्षेत्रांत दृढ झालेली जाणीव आणि दृढ जाणीवेनें व्यक्तिमत्त्वाला प्राप्त झालेली महनीयता या गोष्टींचा बव्हंशीं अभावच अशा अतिमानवांच्या चित्रणांत असतो. अशा या चित्रणांतच नवीन युगधर्माला अनुसरून व थोडा फार बदल होऊन नित्शेचा 'अतिमानव' निर्माण झाला. परंतु मानवाचें गूढ स्वरूप, (सच्चिदानंद स्वरूप) मानवी जीवनाचें तें आत्मिक अधिष्ठान कीं, ज्यांतून उपनिषत्कारांची प्रतिभा जन्मली, ख्रिस्तासारखें पुण्य अवतरलें, बुद्धाची करुणा जन्माला आली, पातंजल सूत्रें लिहिणारी प्रज्ञा साकारली त्यांचा अर्थपूर्ण उलगडा अशा स्वरूपाच्या चित्रणांतून होऊं शकला नाहीं. मानवाच्या सर्व धर्मांच्या इतिहासानें असें सिद्ध केलें आहे कीं, केवळ मानसिक, कलात्मक, शारीरिक शक्तीच्या प्रकर्षांत अतिमानवता असूं शकत नाहीं. आंतरिक विशाल जाणीवेच्या सामर्थ्याच्या साक्षात्कारांतच ती असूं शकते. अशा तऱ्हेनें अव्यक्त आत्मिक चिरनूतन जाणीवेंतून सहजतेनें प्रस्फुटित होणाऱ्या सदाचारानें अतिमानुषत्व निदर्शनास येत असतें. न हून मानवी बुद्धीनें कल्पिलेल्या मानवी गुणांच्या प्रकर्षांत त्याचें स्वरूप सांगता येण्यासारखें नाहीं.

मानवाच्या दिव्य स्वरूपाची स्वामिजींची दृढ जाणीव आणि भारतीय त्याचप्रमाणें पाश्चात्य स्त्रीपुरुषांशीं केलेल्या मनोमन विचार प्रक्षेपणांतून ( Telepathy ) स्वामिजींच्या गूढ सामर्थ्याचा त्यांना आलेला प्रत्यय, त्यामुळें श्रेष्ठमानव म्हणून त्यांचा या लोकांकडून गौरव होणें ही गोष्ट माणसाच्या मनोरचनेचें ज्ञान असलेल्याला नवलाची वाटणार नाहीं. या लोकांत मोठ्या विद्यापीठांच्या मानाच्या पदव्या धारण केलेले लोक आहेत. तत्त्वज्ञानाचे अभ्यासू आहेत, संशोधक आहेत.

आपल्या कल्याणकारी सामर्थ्याचा प्रत्यय आणून देणारें स्वामिजींचें सर्वंकष व्यक्तिमत्त्व, विशाल प्रेमानें भरलेलें त्यांचें अंतःकरण, त्यांच्या मनाची शुद्धता, ज्ञानाची उंची; माणसाला सुख, समाधान नि सामर्थ्य देण्यासाठीं कोणताहि त्याग करण्यास आंसुसलेली त्यांची उत्कट इच्छाशक्ति इत्यादि बाबींतील स्वामिजींचें 'अतिमानव्य' आज कांहीं पाश्चात्य अभ्यासूंचा विषय बनावें ही चांगली गोष्ट आहे.

सभोंवतालच्या सामाजिक परिस्थितींत मानव या बुद्धिमान् प्राणिमात्राला व्यक्तिमत्त्व प्राप्त होत असतें. कांहींच्याबद्दल आदर तर कांहींच्याबद्दल अनादर नि तिरस्कार आपल्या मनांत निर्माण होतो. प्राप्त परिस्थितींत माणसानें मिळविलेल्या चांगल्या गोष्टी पाहून, त्यानें केलेलें कार्य पाहून आपण त्याच्या व्यक्तिमत्त्वाचें मोल करीत असतो. स्वामिजींच्याविषयीं पूज्यभाव, ते बोलतील तें अत्यंत उत्कटतेनें ऐकून घेणें, त्यांच्या सूचनेप्रमाणें वागण्याची इच्छा होणें, त्यांच्या बोलण्यानें बाह्य वर्तनांतहि बदल घडून येणें या गोष्टी त्यांच्या सहवासांत आलेल्या अनेकांच्या अनुभवास येतात. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विशेष म्हणजे त्यांच्या सहवासांत आलेल्या कुणाहि माणसाला वेगळ्या शांतिदायक वातावरणाचा व एक तऱ्हेच्या अस्पष्ट स्नेहसंबंधाचा अनुभव येतो. जाणीवेच्या विशाल क्षेत्रांत वावरत असलेला मनुष्य आपणाला परका, वेगळा वाटूं नये हें वैशिष्ट्यच म्हणावें लागेल. त्यांचें हें विश्वात्मक जाणीवेचें व्यक्तिमत्त्व म्हणजे ज्ञान, सेवा, प्रेम इत्यादि शक्तींचें उगमस्थानच म्हणावें लागेल. ज्याला त्याला पेलेल त्याप्रमाणें तो ज्ञानाचा

प्रकाश नि तेवढ्या प्रमाणांतच त्या जाणीवेचा भाग देणारें त्यांचें व्यक्तिमत्त्व हें एक काळाच्या अटीनें निर्माण झालेलें माध्यम म्हणावें लागेल. आणि म्हणूनच स्वामिजीसारख्या विश्वात्मक जाणीवेच्या लोकांचें व्यक्तिमत्त्व इतर इतिहासपुराणांतील मोठ्या लोकांच्या व्यक्तिमत्त्वांच्या संदर्भात समजून घेणें ही गोष्ट अशक्य म्हणावी लागेल. वेळोवेळीं, परिस्थितीच्या गरजेप्रमाणें सातत्यानें नवनवीन स्वरूपांत होणारा तो एक परतत्त्वाचा आविष्कार आहे—स्वयंप्रकाशी अंतर्यामीच्या स्वरूपाचें दर्शन आहे—मानवाच्या आत्मोद्धारासाठीं प्रगट झालेला तो एक साकार संकल्प आहे. अशा —विशाल जाणीवेचें जीवन जगणाऱ्या—लोकांच्या बाबतींत व्यक्तिमत्त्वाच्या मानवी मर्यादा सर्वस्वी अपुऱ्या ठरतात. प्रसंगोपात्त त्या दिव्य प्रेरणेनुसार निर्माण झालेल्या वेगवेगळ्या व्यक्तिमत्त्वाचें दर्शन स्वामिजीसारख्या विश्वात्मक जाणीवेच्या असाधारण व्यक्तिमत्त्वांत आपणांला होतें. त्या दिव्य प्रेमाचें दर्शन, त्या दिव्यतेचें स्वरूप, ती परमेश्वराची इच्छा, त्या चतुर शहाणपणाचें मूर्तिमंत सामर्थ्य, तो दिव्य भाव नि दिव्य कार्य यांचें दर्शन स्वामिजीसारख्या व्यक्तिमत्त्वामुळें अगदीं मानवी स्वरूपांत होतें. स्वामिजींचें चालू कालांतील कार्य म्हणजे त्या चैतन्यानें हेतुपुरस्सर आरंभलेली एक कल्याणकारी लीला आहे. त्यांनीं आपल्या बुद्धीला दिलेली चेतना, आपल्या भावनांचें केलेलें उन्नयन, शुद्ध चित्ताला केलेलें आवाहन, आणि ज्ञानदृष्टीला घडवून आणलेलें अव्यक्त अमृतानुभव स्वरूपाचें दर्शन या गोष्टींचें मूल्यमापन मानवी मनाच्या आकलनाबाहेरचें आहे. स्वामिजींचें व्यक्तिमत्त्व असें हें 'पैलतीरावरील' व्यक्तिमत्त्व आहे. ते विश्वपुरुष आहेत. मानवी विचारांची मर्यादा न पडलेली ती एक विश्वात्मक जाणीव आहे. मानवी स्वरूपांत विलास करणारें तें एक मुक्त 'अस्तित्व' आहे. त्यांचें रोजचें जीवन निहाळलें कीं, टेनिसनप्रमाणें म्हणावेसें वाटतें,

Thou seemest human and divine,
The highest, holiest manhood, Thou.

दिव्य तुझें तेज असे मनुज जरी तूं दिससी ।
हिमगिरीसम उच्च तुझ्या पावित्र्याची राशी ॥

* * *

# तत्त्वज्ञान

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

## योग-समन्वय

स्वामिजींचें चरित्र मी लिहीत आहें असें कळल्यावर अनेकांनीं पत्रें पाठवून मला त्यांच्या साधनेविषयीं विस्तारानें व स्वतंत्रपणें लिहिण्यासंबंधीं सुचविलें. परंतु स्वामिजींनीं गंगेत जें पुरश्चरण केलें, परिव्राजकाचें जीवन कंठलें, पैशानें नि औषधोपचारानें अनेकावर असंख्य उपकार केले, त्या त्या वेळीं त्यांच्या मनांत ज्या विचारांनीं उचल खाल्ली, ज्या गोष्टींचें त्यांनीं चिंतन, मनन व निदिध्यासन केलें व स्वानुभवाच्या कांहीं गोष्टी लिहून ठेवल्या त्या त्यांच्या साधनेहून वेगळ्या नाहींत असें मला अनेक ठिकाणीं दिसून आलें.

त्यांनीं केलेल्या भाष्यावरून, त्यांच्या स्वतंत्र तत्त्वज्ञानावरून, त्यांनीं व त्यांच्या शिष्यांनीं निर्माण केलेल्या विविध संस्थांच्या कार्यावरून त्यांच्या साधनेची पुरेशी कल्पना येण्याजोगी आहे म्हणूनच त्यांच्या कांहीं ग्रंथांतून व्यक्त झालेले त्यांचे विचार सांगणारीं ही एक दोन प्रकरणें लिहिण्यास मी उद्युक्त झालों आहे.

स्वामिजींचें आवडतें तत्त्वज्ञान म्हणजे योग-समन्वयाचा ( Yoga of synthesis ) विचार हें होय. या विचारांतून दिसून येणारी त्यांची नवी दृष्टि मराठी वाचकांना जवळची वाटण्यासारखी आहे.

आत्मप्राप्तीचे चार मुख्य मार्ग, कर्मयोग, भक्तियोग, राजयोग नि ज्ञानयोग हे सर्वश्रुतच आहेत मंत्रयोग, लययोग, कुंडलिनी योग इत्यादि आणखी कितीतरी योग बोलले जातात. योग म्हणजे आत्म्याशीं मीलन. योगाभ्यास म्हणजे आत्म-प्राप्तीची साधना. सुरुवात कुठून का असेना, मार्ग भिन्न का असेना, सर्वांचें साध्य असें हें एकच आहे.

कर्मयोग हा निष्काम सेवेचा मार्ग आहे. भक्ति अभिप्रेत आहे. राजयोगांत मनाचें नियंत्रण प्रामुख्यानें येतें. विवेक, तर्क या गोष्टींनीं शहाणपण प्राप्त करणें या गोष्टींचा अंतर्भाव ज्ञानयोगांत होईल.

मनुष्य हें एक क्रियाशक्ति, भावना, बुद्धि इत्यादींचें विलक्षण मेंडोळें आहे. इच्छित वस्तु प्राप्त करण्यासाठीं तो धडपडतो. त्याच्याजवळ भावना आहे, त्यामुळें वेगवेगळ्या वृत्तींतील वेदना तो अनुभवितो. त्याच्याजवळ बुद्धि आहे त्यामुळें तो तर्क करतो, विचार करतो. कांहीं लोक भावनाप्रधान असतात तर कांहीं तर्कप्रधान असतात. क्रियाशक्ति ( will ) भावना ( emotion ) व बुद्धि ( intellect ) या गोष्टी एकमेकांपासून सर्वस्वी निराळ्या नाहींत. तसेंच कर्म, भक्ति व ज्ञान यांच्याबाबतहि सांगतां येईल.

कांहींजण निष्काम कर्मयोगच मोक्षाचें एकमेव साधन समजतात. तर कांहींजण केवळ भक्तिमार्गाचा महिमा गातात. तिन्ही मार्ग सारखेच महत्त्वाचे मानणारेहि लोक आहेत. परंतु या साऱ्या मार्गांचा समन्वय हा एक अत्यंत परिणामकारक व सत्वर फलदायक अशा साधनेचा प्रकार आहे असें स्वामिजींनीं सांगितलें आहे.

मनांत तीन तऱ्हेचे दोष असतात. मल, विक्षेप आणि आवरण. कर्में करून मनाची अशुद्धता घालवावी. उपासनेनें त्याची चलबिचलता दूर करावी आणि ज्ञान प्राप्त करून घेऊन मनावरील मायेचा थर दूर करावा; असें घडलें तरच आत्मप्राप्ति शक्य आहे. पाणी म्हणा वा आरसा म्हणा, ज्या कोणत्या माध्यमांतून आपणांस आपलें प्रतिबिंब पाहावयाचें आहे ती गोष्ट स्थिर असल्याशिवाय ज्याप्रमाणें ही गोष्ट घडत नाहीं त्याचप्रमाणें मन हें स्थिर असल्याशिवाय, शुद्ध झाल्याशिवाय आत्मदर्शन कसें संभवनीय आहे? अशी ही शुद्धता नि स्थिरता मिळविण्याच्या दृष्टीनें वर सांगितलेले

हे तिन्हीं मार्ग एकमेकांस पोषक नाहींत का? Head, Heart and Hand बुद्धि, भावना व क्रियाशक्ति या तिन्हीहि गोष्टी पूर्णांशानें कार्यान्वित करण्यानें पूर्णतेकडे लवकर पोहोचतां येईल:- सर्वंकष उन्नति, समग्र व्यक्तिमत्त्वाची संपादणी हें कोणत्याहि धर्माचें साध्य आहे. ही गोष्ट योगसमन्वयाच्या मार्गानें सुलभ होईल.

आत्मौपम्य बुद्धीनें सार्‍यांच्याकडे पाहणें हें ज्ञान-शहाणपण-झालें, त्या दृष्टीनें सार्‍यावर प्रेम करणें ही भक्ति झाली आणि त्यांची सेवा करणें हें कर्म झालें. ज्ञानयोग्याला जेव्हां असा हा अद्वैताचा साक्षात्कार होतो तेव्हां त्याच्यांत भक्तीचा उदय होऊन तो निष्काम कार्यांतच आनंद घेऊं लागतो. कर्मयोग ही त्याच्या आध्यात्मिक वृत्तीची अटळ नि उत्स्फूर्त स्वरूपाची अभिव्यक्ति आहे. विविध व्यक्तींच्या वृत्तींची भिन्नता या मार्गांतील वरवर दिसणाऱ्या वेगळेपणाच्या बुडाशीं असली तरी हे मार्ग स्वरूपतः भिन्न नसल्यानें त्यांचा समन्वय साधून सुलभतेनें साध्यप्राप्ति करून घेणें साधकाला अशक्य असत नाहीं.

### आत्मवंचनेचीं लक्षणें

तर्ककर्कश अनुमान, बौद्धिक शब्दच्छल, पांडित्यपूर्ण वादविवाद यांपैकीं कोणत्याच गोष्टीचा आत्मप्राप्तीच्या दृष्टीनें उपयोग नाहीं. समन्वयाचा योग ( Yoga of synthesis ) साधून बुद्धि, भावना व क्रियाशक्ति यांचा विकास तुम्ही करून घेणें जरूर आहे. तरच सर्वंकष उन्नति नि पूर्णता या गोष्टींचें फलित पदरांत पडण्याची शक्यता आहे.

‘ अहं ब्रह्मास्मि ’ चा नुसता जप करणें कितीसें कठिण आहे ? परंतु तें तत्त्व उत्कटत्वानें जाणवणें व त्याचा अनुभव येणें ही गोष्ट सोपी नाहीं. जप, कीर्तन, उपासना, निष्काम सेवा इत्यादि गोष्टी सातत्यानें न कंटाळता करून मनाची शुद्धि केल्याशिवाय कोणतीच समाधि साधणें शक्य नाहीं. मन स्थिर नसतांना ब्रह्मभावनेचा उद्भव तरी कसा होईल ?

ज्यांना जग हें मृगजळवत् आहे असा अनुभव आला, ज्यांच्या बाबतींत तो अनुभव दृढमूल झाला, ते सतत आनंदकोशांत निमग्न असतात. चहांत साखर कमी पडली वा भाजींत मीठ कमी झालें कीं, ज्यांच्या मनाचा

तोल जातो त्यांच्या बाबतींत ' शिवोऽहम् ' चा जप अर्थशून्यच नाहीं का?

कांहीं लोक स्वतःला तुर्यावस्था प्राप्त झाली असें मानतात; परंतु प्रत्यक्ष कसोटीची वेळ आली कीं, अगदीं नैराश्यपूर्ण पराजय पदरीं घेतात. वेदान्ताचा मजला यमनियमपूर्ण आचरणाच्या पक्क्या पायावरच उभा राहूं शकेल.

निष्काम सेवेनें, उपासनेनें नि प्रभुकृपेनें चित्तशुद्धि प्राप्त घेतलेल्यालाच ही वेदान्तसाधना शक्य आहे. संस्कारांची समूळ निवृत्ति प्रभुकृपेनेंच शक्य आहे. तो परमेश्वर ज्याच्यावर कृपा करतो त्याला तो मुक्त नि पूर्ण करतो, ही गोष्ट तर कठोपनिषदांत स्पष्टच केली आहे.

वेदान्तावर पांडित्यपूर्ण प्रवचन करतां येऊनसुद्धां वेदान्तिक जीवनाचा अंशमात्रहि अनुभव न मिळणें अनेकांच्या बाबतींत दिसून येतें. वेदान्त्याला आपण वेदान्ती आहोंत अशी जाहिरात करण्याचें कारणच काय मुळीं? तसा जर तो असेल तर वेदान्तिक एकत्वाच्या भावनेचा आविष्कार त्याच्या बारीकसारीक कृतींतूनहि प्रगट होईल. तथाकथित वेदान्ती माणसाला मूर्तीला नमस्कार करणें म्हणजे अगदीं अज्ञानाचें कृत्य वाटतें! जणुं त्याला असें वाटतें कीं, मूर्तीला नमस्कार करण्यानें आपल्या अद्वैताविषयीच्या श्रद्धेला कलंक लागेल! अद्वैतानुभव घेतलेल्या आजवरच्या संतांच्या चरित्रावरून अशी गोष्ट कधीं नजरेला आली आहे काय? त्यांना परमेश्वर साऱ्यांत दिसत होता. परंतु मूर्तीचें पूजन करण्यांत, देऊळ झाडण्यांत त्यांना कधीं कमीपणा वाटला नाहीं. या साऱ्यांचा योग हा समन्वयाचाच योग होता. देवळांतील मूर्ति ही त्यांच्या दृष्टीनें पत्थराची वस्तु नसून तें एक साकारलेलें चैतन्य होतें. जाणीवस्वरूप असें कांहीं तरी तें होतें.

ग्रंथाध्ययनानें कुणालाहि वेदान्त बडबडता येईल, परंतु तेवढ्यानेंच चित्तशुद्धि होणें सुतराम् अशक्य! इतक्या लांब कशाला जायचें? साधी चहाचीच बाब घ्या. एवढें क्षुल्लक व्यसनहि सोडणें कठिण होऊन बसलेलें असतें या लोकांना! खऱ्या साधकालाच आचरणांतील अडचणी कळून येतील.

मिनिटभर विचार करा नि आठवा 'आजपर्यंत मी किती पुण्यकृत्यें केलीं?' 'प्रभुचरणीं अर्पण करतां येतील अशीं किती?' तुम्हांला या प्रश्नाचें मिळालेलें उत्तर उत्साहदायक असणार नाहीं. कर्मयोगाच्या आचरणाला पैसा लागतो असें थोडेंच आहे! शेजाऱ्याला, पीडिताला शरीरकष्टानें साहाय्य देणें, तसें साहाय्य देण्याची मनाची सदैव तयारी ठेवणें, पीडितांचें संकट दूर व्हावें म्हणून मनोमन प्रार्थना करणें, इत्यादि गोष्टी चित्तशुद्धि घडवून आणतील नि तुम्हाला सर्वांत एकत्व अनुभवास आणून देतील. एवढें झाल्यावर तुम्ही निसर्गाशीं खऱ्या अर्थानें जिव्हाळ्याचें नि जवळचें नातें निर्माण कराल.

पद्मासनावर बसून डोळे मिटणें, अंतरांतील घाण तशीच ठेवून केवळ एवढीच गोष्ट करणें तुम्हांला समाधीला साधनभूत कशी ठरेल? पद्मासनावरील ही तंद्री, अर्धवट झोपेची स्थिति, समाधि कशी ठरेल? कांहीं अज्ञ लोक असें समजण्याची चूक करतात. हें ध्यान नव्हे. खरें ध्यान केवळ अर्धा तास जरी साधलें तरी तुम्ही योग्याचें विकासशील व्यक्तिमत्त्व प्राप्त करून घ्याल. शांति, शक्ति, आनंद इत्यादि गोष्टी तुम्ही मिळवाल व इतर हजारोंना द्याल.

खऱ्या वेदान्त्याला इतरांना सोडून कुठल्याहि गोष्टीचा भोग घेणें रुचणार नाहीं; गरजूंना सोडून तर बिलकूल नाहीं. खूप वृद्ध पेन्शनर गंगेकांठीं येतात, स्वतःपुरतें पाहतात. अध्ययन करतात. सेवाकार्य, दानकार्य म्हणाल तर शून्य! अशा तऱ्हेनें औदार्य वा चित्ताची विशालता प्राप्त केल्याशिवाय आत्मप्राप्ति तरी त्यांना कशी होणार? त्यांनीं इतरांच्या दुःखाचा अनुभव घ्यावा. यायोगें त्यांची इच्छाशक्ति बलवान् होईल. प्रभूच्या अदृश्य संगतीचा अनुभव येईल. त्यामुळें श्रद्धा दृढमूल होईल. थंडी, वारा, भूक, तहान ह्या वेदना त्यांना जशा अनुभवाला येतील तसें त्यांच्यांत औदार्य निर्माण होईल, विशालता येईल. अशा तऱ्हेच्या असह्य वेदना अनुभविणाऱ्याविषयीं अनुकंपा निर्माण होईल.

सकाळपासून संध्याकाळपर्यंतचें बहुतांशीं लोकांचें आजचें जीवन अगदीं कालापव्यय वाटण्यासारखें आहे. ब्रह्म-विचार, सत्संग, आत्मचिंतन

या गोष्टी त्यांच्या गांवींहि नाहींत. जीवनाचा कांहीं कार्यक्रम नाहीं वा आराखडा नाहीं. सेवानिवृत्तीनंतरहि त्यांना नोकरी करावीशी वाटते. कारण वेळेचा व्यय कसा करावा याची त्यांना नीटशी कल्पनाहि असत नाहीं. स्वतःच्या सहवासांत आनंद घेण्याचें, सखोल आंतरजीवन जगण्याचें ज्ञान त्यांनीं तरुणपणीं मिळविलेलें असत नाहीं. असें हें केवळ पोटभरू नि खिसाभरू जीवन निरर्थक नाहीं का ?

संकीर्तन हें वेदान्ती माणसालाहि उत्साह देणारें आहे. मन ज्या वेळीं ध्यानांत विसावूं शकत नाहीं त्या वेळीं संकीर्तनच मनाला एकाग्र करील. ध्यानाचा अभ्यास करणाऱ्यांना ही गोष्ट सहज लक्षांत येण्यासारखी आहे.

चोवीस तास तुम्ही ध्यान करूं शकाल काय ? कठिण आहे ही गोष्ट ! ध्यानाच्या नांवाखालीं तमोगुणाची का वृद्धि करायची आहे ? मन ज्या वेळीं लक्ष्यबिंदूपासून दूर होऊं लागेल, ज्या वेळीं एकाग्रचित्तत्व अगदीं कठिण होईल त्या वेळीं ध्यानाचा नाद सोडून द्या नि कोणतें तरी उपयुक्त सेवा-कार्य एकदम हातीं घ्या. कार्य चालू असतां ध्यानाचा विचार पुनः पुनः करा वा मानसिक जप मोठ्या जोमानें सुरू करा. कारण ध्यान ही गोष्ट अशी आहे कीं, ज्यामुळें तुम्हांला वारंवार उत्साह नि उमेद या गोष्टी मिळत गेल्या पाहिजेत. त्यामुळें विवेकशीलता, अंतर्मुख दृष्टि, मनःशांति, सामर्थ्य नि विकासशीलता इत्यादि गोष्टी तुमच्यांत निर्माण व्हावयास हव्यात. या जर प्राप्त होत नसतील तर ध्यानांत कुठें तरी चूक होत असली पाहिजे असें समजायला हरकत नाहीं. कदाचित् या गोष्टीचा अर्थ असाहि होईल कीं, सर्वस्वी ध्यानयोगाला तुमची प्रकृति प्रतिकूल आहे. अशा वेळीं तुम्ही ध्यान नि कर्म या दोन गोष्टींचें एकत्रीकरण करावें. मग मात्र तुमचा विकास व्हावयास बिलकूल वेळ लागणार नाहीं.

पक्षी कांहीं दोन पंखाशिवाय वा शेपटीशिवाय उडूं शकणार नाहीं. शेपटीमुळें त्याचा तोल राहतो. त्यामुळें त्याला हव्या त्या दिशेला मार्गक्रमण करतां येतें. ही शेपटी ही भक्ति आहे जणुं ! ती ज्ञान नि कर्म यांचा समन्वय साधते. त्यांचा तोल सांभाळते. कर्म, भक्ति नि ज्ञान या तिन्हीहि

गोष्टी हव्यात. तरच तुम्ही पूर्णतेला पोहोंचाल. बुद्धि (मेंदू) कर्म (हात) नि भावना (हृदय) यांचा एकसारखा विकास हवा.

भगवान् कृष्णाच्या जीवनांतील हा योग-समन्वय निहाळा. तो रथी होता, मुत्सद्दी होता, वादक होता नि नर्तकहि होता. "या तिन्ही जगांत मला मिळविण्यासारखें कांहीं एक नाहीं तरीसुद्धां मी कर्मे करण्यांत रंगतों" असें त्यानें म्हटलें आहे. तीच गोष्ट भगवान् येशू, भगवान् बुद्ध इत्यादींच्या बाबतींत सांगतां येईल.

ह्या समन्वयाच्या योगानें सत्याच्या मार्गाचें आक्रमण तुम्हाकडून होवो. पूर्णता नि सर्वंकष उन्नति तुम्हाला प्राप्त होवो!

**सर्वंकष उन्नति**

**करावें-मिळवावेंसे नसे कांहीं जरी मज।**
**तिन्ही लोकीं तरी पार्था कर्मी मी वागतोंचि कीं।**

(गीताई ३ रा अध्याय २२)

असें म्हणणाऱ्या भगवान् श्रीकृष्णानें ज्ञानयोगापेक्षांहि कर्मयोग श्रेयस्कर म्हणून सांगितला आहे. कर्मयोगांत ज्ञान हें निहित असतेंच. म्हणूनच प्रश्न उरतो तो हा कीं, कर्में टाकून ज्ञानमार्ग धरावा का कांक्षारहित, आसक्तिरहित कर्में करावीत.

कृति हा तर या साऱ्या निर्मितीचा प्राण आहे. जी गोष्ट उत्पत्तिबाबत तीच गोष्ट लयाबाबत. कृतीशिवाय लय तरी कसा शक्य आहे? आत्म-प्राप्तीसाठीं विश्वात्मक भाव हवा. अहंकाराचा समूळ नाश हवा. विवेकाशिवाय ही गोष्ट शक्य नाहीं. अहंकाराचा नाश हा तर योगाचा पाया आहे. तो एकदां नष्ट झाला कीं, आत्म्याचा अखंड आनंद तो अनुभवतो. येथें क्रिया नाहीं नि भोगहि नाहींत. विकसित होत जाणारी प्रचंड कर्में अशा योग्याकडून होतात; परंतु अंतर्यामीच्या एकरूपतेमुळें तो निश्चलच असतो. शिवाय अहंकाराचा अभाव झाल्यामुळें संस्कारांच्या फेऱ्यांत सांपडण्याची भीतिहि असत नाहीं. अशा तऱ्हेनें झालेल्या ज्ञान व कर्मांच्या मीलनांत भक्तीचीहि भर पडते! भावना ही मनुष्य-मात्राच्या व्यक्तिमत्त्वाची एक प्रमुख घटक आहे. बुद्धि नि शारीरिक

क्षमता यांच्याइतकेंच तिला महत्त्वपूर्ण स्थान आहे. अंतरांतील भक्तीचा उदय त्याला त्वरित विशाल जाणीव प्राप्त करून देतो.

अशा तऱ्हेनें मनुष्यमात्र सर्वंकष उन्नति साधून परमात्म्याप्रत पावतो. त्याच्या अशा ह्या दैवी व्यक्तिमत्त्वांत दोष तो कसचा राहणार? अहंकार-रूपी क्रूर श्वापदापासून त्याला आतां भीति राहत नाहीं. नि आजूबाजूच्या इंद्रियोपभोग्य वस्तूंच्या दर्शनानें नेणिवेंतील संस्कारित न केलेले विकार बंड करतील असें म्हणावें तर तीहि गोष्ट त्याला भीतिदायक ठरूं शकत नाहीं. कारण जाणिवेच्या विशाल क्षेत्रांत सुप्त विकारांचें स्थान केव्हांच नष्ट झालेलें असतें!

तीच गोष्ट ध्यानाची. साधनाहि त्याच्याकडून होते. सकाळ सायं-काळच्या ध्यानधारणेमुळें बाह्य वातावरणांतील विचारांचा व इतरहि अनेक अपायकारक गोष्टींचा त्याच्यावर बिलकूल परिणाम होत नाहीं.

असा हा समन्वयाचा, सर्वंकष व्यक्तिमत्त्वाची संपादणी करून देणारा गीताप्रणीत योग आहे.

## सेवाकर्म नि भक्ति यांची उपेक्षा : साधकाची एक गंभीर चूक

परमेश्वराशी नातें, आत्म्याशीं एकरूपत्व, निर्विकल्प समाधि, जीवन-मुक्ति इत्यादि शब्द सारख्याच अर्थानें मानवजीवनाचा अंतिम हेतु प्रगट करणारे आहेत. पूर्णत्वाप्रत पोहोंचलेलें मानव्य हें त्या दैवी तत्त्वाला धरून आहे; नि म्हणूनच उणीव आहे, जरूरी आहे ती सर्वंकष उन्नतीची! त्या भूतकालीन थोर ऋषींनीं विचार करून, खूप काळ ध्यान करून जे कांहीं चार मार्ग शोधून काढलेले आहेत ते माणसाची परमेश्वरप्राप्तीची वाटचाल फलद्रूप करणारे आहेत. कर्म, भक्ति, ज्ञान व चौथा राजयोग; असे हे चार मार्ग आहेत.

परस्परांना पूरक असें जें त्यांचें स्वरूप आहे तें कालांतरानें दुर्लक्षिलें जाऊं लागलें नि त्याची मजल हे चार मार्ग परस्परापासून पूर्णांशीं भिन्न मानण्यापर्यंत गेली. वस्तुतः हे सारे मार्ग व्यक्तिमत्त्वाच्या एकसंध उन्नतीला पोषक आहेत. आजच्या काळाला तर ह्या योगांचा समन्वयच ( Yoga of synthesis ) फलदायक आहे.

कांहीं साधकांना जणुं कर्ममार्गी वा भक्तिमार्गी म्हणून घेणें कमीपणाचें वाटतें ! ज्ञानयोगी म्हणवून घेण्यांत आनंद तो कसला नि अभिमान तरी कसला ?

भगवान् श्रीकृष्णाचा नित्यक्रम लक्षांत घ्या. ब्राह्ममुहूर्तावर उठणें, वडीलधाऱ्यांना वंदन, अर्घ्यप्रदान आणि गायींना चारा घातल्याशिवाय अन्नग्रहण न करणें. तीच गोष्ट ब्रह्मवेत्त्या शुकदेवाबद्दल सांगतां येईल. आत्मप्राप्तीची वाटचाल करतांना देवतांना आळवणें साध्याच्या सुलभतेच्या दृष्टीनें चांगलें ठरतें. उपनिषदारंभीं जे देवतांना उद्देशून मंत्र आहेत त्याचें कारण हेंच. आदित्यहृदय स्तोत्र म्हणून सूर्याची प्रार्थना केली असतां ती देवता तुम्हांस आरोग्य, उत्साह, उमेद इत्यादि गोष्टी देते कीं, ज्यामुळें ब्रह्मप्राप्तीची वाटचाल करतांना नवा दम, नवा उत्साह सातत्यानें मिळतो. पावलोंपावलीं देवतांची मदत घेणें फायदेशीर नाहीं का ? नव्हे, ती तशी आवश्यकच आहे असें अनुभव सांगतो.

फिरून सांगायचें तें हेंच कीं, आजच्या काळाला असा हा समन्वयाचा योगच अनुकूल आहे. आजच्याहि महापुरुषांनीं हीच गोष्ट सांगितली आहे.

जगद्गुरु शंकराचार्य तपस्वी, ज्ञानी, कर्मयोगी नि भक्त होते. परमेश्वराची आळवणी करतांना ते म्हणतात, "परमेश्वरा, मी आणि तूं एकच आहोंत. परंतु मी तुझा आहे. तूं माझा नाहींस. लाट सागराची असते. लाटेचा सागर असत नाहीं."

**सत्यपि भेदापगमे नाथ तवाहं न मामकीनस्त्वम् ।**
**सामुद्रो हि तरंगः क्वचन समुद्रो न तारंगः ॥**

आठव्या शतकांत होऊन गेलेले मधुसूदन सरस्वती जसे पूर्ण ज्ञानी होते, तसेच ते आर्त भक्त होते. ते म्हणतात, 'कृष्णा, जरी मला सर्वत्र एकच आत्मस्वरूप दिसत असलें तरी तुझ्या चरणांचें पूजन मला सोडवत नाहीं.' कांहीं लोक भक्ताला ब्रह्मसायुज्य प्राप्त होत नाहीं असें समजतात; पण ती चूक आहे. त्यांनीं केवळ तुकारामाचे साक्षात्काराचे अभंग वाचले तरी त्यांची चूक त्यांना ताबडतोब कळून येईल. ज्ञानयोगाच्या आचरणाइतकेंच भक्ति व कर्म या मार्गांचें आचरण अवघड आहे.

आत्मभावानें कर्म करणें हें गुहेंतील ज्ञानसाधनेपेक्षांहि कठीण आहे. योग्य वृत्तीनें केलेलें कार्य हें एक प्रकारचं श्रेष्ठ दर्जाचें ध्यानच आहे. फार मोठी भक्ति आहे ती. निष्काम कर्म, आर्त भक्ति नि ज्ञान यांचा असा हा एकत्रित वास असतो.

तीच गोष्ट गीतेबाबत सांगतां येईल. गीतेंत कुठेंहि एकांतिक मत-प्रतिपादन नाहीं. माया तरून जाणें अवघड आहे; त्यासाठीं 'मामू प्रपद्ये' असें त्यानें सांगितलें आहे. आतां ही 'प्रपत्ति' ( भक्ति ) कशी ? तर याचें उत्तर त्यांनें अगदीं स्वच्छ सांगितलें आहे.

'मन्मना भव' या ठिकाणीं राजयोग आला. तुझें मन माझ्याकडे लाव. विक्षेप नाहींसा करून टाक. ब्रह्माकार वृत्तीचा उदय होऊं दे. विषयाकार वृत्तीनें मन भरून गेलें असतां तें एकाग्र होऊं शकत नाहीं; त्याचा तोल राहात नाहीं. ती मनाची आनंददायी स्थिरता अशा परि-स्थितींत कुठली लाभायला ? जेव्हां या वृत्तींचा निरास होईल नि मन केवळ त्याच्या जाणीवेनें भरून जाईल तेव्हांच या विविध दुःखांचा नाश होईल. एवढें झाल्यावर पराभक्ति उदित झालीच. या भक्तीला आचार्यांनीं 'आत्मप्रातीचा शोध' म्हणूनच संबोधलें आहे. सर्वत्र आंत व बाहेर त्या एका परमात्म्याचें दर्शन घेण्यास अशा तऱ्हेनें अधिकारी झाल्यामुळें पुढल्या पदांत त्यास 'मद्भक्तः' असें म्हटलें आहे.

अशा ह्या भक्ताची वाटचाल आतां इथें थांबली का ? नाहीं. त्यानें पुढें म्हटलें आहे 'मद्याजी' माझ्या नांवानें कर्में कर. कर्में व त्याचीं फलें मला अर्पण कर. अहंकार टाक नि केवळ निमित्तभावानें कर्मांत गढून जा. केवळ त्याच्या शक्तीमुळें तुम्ही सारीं कर्में करीत आहांत हें समजून घ्या. त्यानें ही आपली शक्ति आपल्या शरीरांतून काढून घेतल्यावर राहिलें काय, तर लांडग्यांचें नि गिधाडांचें खाद्य !

अशा तऱ्हेनें स्वतःच्याच जीवस्वरूप आविष्कारांतून स्वतःची लीला दाखविणाऱ्या त्या परमात्म्याला शतशः धन्यवाद !

या नंतरचें महत्त्वाचें पद 'मां नमस्कुरु।' हा नमस्कार म्हणजे केवळ शारीरिक क्रिया नव्हे. ही बाह्य शारीरिक क्रिया सर्वशरणतेसाठीं झुरणाऱ्या

मनांतून प्रस्फुरित झालेली पाहिजे. या सर्वशरणतेंतच शांति आहे, आनंद आहे, अमरत्व आहे.

अशा तऱ्हेनें चार मार्गांच्या समन्वयांतून निर्माण झालेली ही साधना करणारा ' मामेवैष्यसि । ' मजप्रत येऊन पोहोंचतों असें त्यानें म्हटलें आहे. अशा तऱ्हेनें (साधनसंपन्न होऊन) ' मत्परायण ' झालेला, माझी प्राप्ति हेंच सर्वश्रेष्ठ साध्य धरून चाललेला, मजप्रत पोहोंचतो. अस्तु.

अशा तऱ्हेनें स्वामिजींनीं आपल्या कांहीं ग्रंथांतून असें साधार पटवून दिलें आहे कीं, **योगसमन्वय** ( Yoga of synthesfis ) हा अंतीम फलप्राप्तीच्या दृष्टीनें सुलभ नि सर्वांना सोयीस्कर आहे एवढेंच नव्हे तर पूर्वकालीन ऋषिमहर्षींनींहि याच तऱ्हेच्या साधनेचा प्रसार केला.

उपनिषदांतूनहि योगसमन्वय कसा सांगितला आहे याचें अगदीं अभ्यासपूर्ण विवेचन स्वामिजींनीं त्यांच्या Yoga of synthesfis या इंग्रजी ग्रंथांत केलें आहे. त्यापैकीं ईशावास्योपनिषदावरील त्यांच्या एका परिच्छेदाची थोडक्यांत कल्पना सांगून हें प्रकरण आवरतें घेणें जरूर आहे.

अगदीं पहिल्याच मंत्रांत ज्ञानयोग सांगितला आहे. हा सारा पसारा ही त्या एकाचीच व्याप्ति असें अनुभवाला येणें यापरतें अत्युच्च ज्ञान तें कोणतें ? ' ईशावास्यमिदं सर्वं ' हें सर्व ईश्वराचें आहे. ही सर्वश्रेष्ठ जाणीव नव्हे काय ? महर्षि विनोबा या मंत्रावरच्या एका टिपणींत म्हणतात. ईश्वराच्या सत्तेच्या ज्ञानामुळें मानवाचें स्वामित्वनिरसन सहज होतें. राजविद्या ती हीच. ह्या मंत्रांत वैदिक धर्माचें सर्व सार सांठविलें आहे.

**कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेत् शतं समाः ।**
**एवं त्वयि नान्यथेतोऽस्ति न कर्म लिप्यते नरे ॥**

[ इहलोकीं कर्में करीत करीतच शंभर वर्षें जगण्याची इच्छा धरावी. तुला देहवंताला हाच मार्ग आहे. ह्याहून वेगळा मार्ग नाहीं. मनुष्याला कर्म चिकटत नाहीं. ] ( ईशावास्य वृत्ति )

या दुसऱ्या मंत्रांत कर्मयोग आहे. गीतेंतील कर्मयोगाची आठवण करून देणारें गीतेच्या पूर्वीचें इतकें स्पष्ट असें दुसरें वाक्य नाहीं असें म्हटलें जातें.

याच मंत्राबाबतचें ब्रह्मसूत्रांतील भाष्यहि योगसमन्वयाच्या तत्त्वाला अनुकूल असेंच आहे. याबाबत विनोबाजी म्हणतात, 'प्रस्तुत मंत्रांतील कर्मनिष्ठेचा विधि ज्ञानी पुरुषाला लागू आहे काय?' याबाबत ब्रह्मसूत्रांत निर्णिलें आहे कीं, "विधि म्हणून खास ज्ञानी पुरुषासाठीं तो सांगितलेला नाहीं. सर्वांसाठींच सामान्यतः तो आहे. ज्ञानी पुरुष त्याप्रमाणें आचरील तर त्याला बाधा तर नाहींच; उलट, त्यानें त्याच्या ज्ञानाचा एकपरी गौरवहि आहे. कारण त्याची कर्मांची लेप न लागणारी स्थिति त्यानें कदाचित् अधिकच खुलून दिसणार आहे." (ब्रह्मसूत्र अध्याय ३, पाद ४, सूत्रें १३–१४) अस्तु।

**हिरण्मयेन पात्रेण सत्यस्यापिहितं मुखम् ।**
**तत् त्वम् पूषन्नपावृणु सत्यधर्माय दृष्टये ॥**

(सुवर्णमय पात्रानें सत्याचें मुख झांकलेलें आहे. हे विश्वपोषक प्रभो, सत्यधर्माचा मी उपासक, माझ्या दर्शनासाठीं तें तूं उघडें कर.)

या ठिकाणीं भक्तिपूर्ण प्रार्थना आहे. या ठिकाणच्या भाष्यांत परमहंस प्रज्ञानेश्वर यति म्हणतात, 'ऋषींचा अभिप्राय असा आहे कीं, लोकांस चकित करून सोडणाऱ्या शब्दपांडित्यानें सत्यज्ञानाचें स्वरूप इतकें कांहीं विकृत केलें आहे कीं, त्यामुळें खरा धर्म कोणता हें कळण्याचीहि मारामार झाली आहे. म्हणून जास्त सावधगिरीनें अनुभवाचा आश्रय करून, आपणांस चकित करून सोडणाऱ्या शब्दांची माया दूर करून त्या शब्दांच्या आड सत्य तत्त्वें कोणतीं आहेत, तीं शोधून काढण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे; व तदर्थ बुद्धि तीव्र करण्यासाठीं निष्कपटपणें अनन्यगतिक होऊन ईश्वराचें साहाय्य मागितलें पाहिजे.' असो.

आध्यात्मिक विकासाबाबतचें अरविंदबाबूंचेंहि विवेचन योगसमन्वयाला धरूनच आहे. अध्यात्म सद्वस्तूशीं प्रत्यक्ष संबंध ही आध्यात्मिक विकासाला आवश्यक अशी गोष्ट आहे हें स्पष्ट करतांना असें त्यांनीं सांगितलें आहे कीं, असा हा संबंध अनेक मार्गांनीं होतो. त्या मार्गांनें मानवाची प्रज्ञा (Intellect) वा क्रियाशक्ति (will) वा अंतःकरण (emotion) या गोष्टी कार्यान्वित होतात. ज्ञानयोग, भक्तियोग व कर्मयोग असे हे तीन

मार्ग आहेत; परंतु हे सर्व मार्ग सुटेपणानें स्वीकारल्यास त्यांतून माणसाची प्रज्ञा, क्रियाशक्ति व अंतःकरण यांपैकीं सर्व गोष्टी कार्यान्वित होऊन त्यांचें परिवर्तन ( Integral transformation ) होणार नाहीं. एवढ्यासाठीं ज्ञान, भक्ति आणि कर्म या तिन्ही योगांचा समुच्चय श्रेयस्कर आहे.

सर्व धर्मांतील पवित्र ग्रंथ, समर्पक युक्तिवाद, प्रत्यक्ष अनुभव, मोठ्या पुरुषांचीं चरित्रें, इत्यादि अनेक गोष्टीच्या साहाय्यानें स्वामिजींनीं केलेलें योगसमन्वयाचें प्रतिपादन व समर्थन येथें विस्तारानें करतां येणें शक्य नसल्यानें त्याबाबत जिज्ञासूंनीं त्यांचे याबाबतचे मूळ ग्रंथ अभ्यासावेत एवढें नम्रपणें सुचवावेंसें वाटतें.

भारतीयांनीं तत्त्वज्ञान हा केवळ बुद्धीचा प्रांत कधींच मानला नाहीं. त्यांचा भर दर्शनावर होता. या शास्त्राला ‘ दर्शन ’ असेंच त्यांनीं म्हटलें आहे. बुद्धीला योग्य तें महत्त्व नि स्थान देतांना तिच्या मर्यादाहि त्यांनीं ओळखल्या होत्या. केवळ बुद्धीतून निर्माण झालेलें तत्त्वज्ञान अज्ञानाच्या नि म्हणूनच दुःखाच्या अंधःकारांत चांचपडणाऱ्यांच्या दृष्टीनें फार उपयोगाचें ! मानवांच्या सुप्त कांक्षांची पूर्ति होण्यासाठीं लागणाऱ्या मार्ग-दर्शनाचें सामर्थ्य त्यांत कुठून येणार ? केवळ बुद्धीनें ज्ञान प्राप्त करुन घ्यावयाचें असेल तर या ज्ञानी लोकांनीं शास्त्रज्ञांचे शिष्य व्हावें हें बरें. तमाला तेज ज्यामुळें येत नाहीं नि नीचाचा उद्धार ज्यामुळें होऊं शकत नाहीं तें तत्त्वज्ञान कसलें ! भारतीय तत्त्वज्ञान हें अनुभवाचें आणि म्हणूनच उद्धार करणारें तत्त्वज्ञान आहे. स्वामी शिवानंद हे केवलाद्वैती आहेत. त्यामुळें शंकराचार्य, गौडपादाचार्य यांचे ग्रंथ वाचलेल्यांना शिवानंदांचें तत्त्वज्ञान नवीन नाहीं. परंतु मांडणी-सांगणी सुलभ असल्यानें व आजच्या काळाला अनुरूप त्यांतील अन्वय समजावून सांगितला गेल्यानें त्यांचें असें एक स्वतंत्र तत्त्वज्ञान आहे असें वाटणें साहजिक आहे.

आजच्या काळांतील नवीन समस्यांच्या नि नवीन वेदनांच्या तीव्रतेंत सत्याकडे नेणाऱ्या मार्गांचें त्यांना झालेलें दर्शन कोणत्या प्रकारचें आहे नि त्या दर्शनाचें निश्चित स्वरूप कोणतें आहे हें समजून घेण्याच्या दृष्टीनें

Sivanand Research Institute ची स्थापना शिवानंदाश्रमांत होत आहे ही गोष्ट चांगली आहे नि चिंतनीय आहे. शिवानंदांनीं दिलेला दृष्टिकोन ही त्यांच्या वागण्याची दिशा आहे. त्यांचें तत्त्वज्ञान व शिकवण ज्यांनीं वाचली आहे त्यांना ही व्यक्ति आहे तरी कशी हें पाहण्याची उत्सुकता निर्माण व्हावी हें सहजच आहे. आचरणांत अभिव्यक्त करतां येईल असेंच त्यांचें तत्त्वज्ञान आहे. शब्दांच्या पसाऱ्यांत त्यांची दृष्टि लुप्त होऊं शकत नाहीं हें त्यांच्या कोणत्याहि पुस्तकांच्या वाचनानें कळण्यासारखें आहे. त्यांच्या विचारांची झेंप वाचकांचे पाय मोडणारी नाहीं वा त्यांचे अवयव नि शक्त करणारी नाहीं. अशा तऱ्हेनें मानवी व्यवहाराच्या मर्यादेंत अतिमानव्य आणणारें त्यांचें तत्त्वज्ञान आहे. नास्तिक, संशयवादी, अश्रद्ध या साऱ्यांना ते सारखेंच आवाहन करतात याचें हें एक कारण आहे. त्यांचे शब्द व त्यांची कृति यांनीं परस्परांना गौरविलें आहे. आपल्या तत्त्वज्ञानानें त्यांनीं प्रत्यक्ष रोजचें जीवन जगण्याची पद्धति सांगितली आहे. आणि म्हणूनच कांहीं पाश्चात्य विचारवंताच्या तुलनेनें त्यांचें तत्त्वज्ञान समजून घेणें हें उत्साहदायक व प्रेरक ठरेल.

सुप्रसिद्ध ग्रीक तत्त्ववेत्ता सॉक्रेटिस यानें सांगितलें आहे कीं, मनुष्य कांहीं समजून उमजून वाईट गोष्ट करीत नाहीं. त्याच्या हातून चूक घडते ती अज्ञानामुळें; आणि सॉक्रेटिसानें सांगितलें, 'ज्ञान म्हणजे सद्‌गुण.' स्वामिजी म्हणतात, "ज्ञानाची अभिव्यक्ति आचरणस्वरूप हवी हें खरें; परंतु खोटें बोलूं नये हें ज्याला माहीत आहे तो खोटें बोलतो. ही माया आहे, हा मायेचा प्रभाव आहे." प्रकृतीच्या प्रवृत्तींचा जोर मोठा असतो. म्हणूनच या प्रकृतीचें आवरण, त्याचें विकृत वळण दूर करण्यासाठीं कांहीं मार्गदर्शक सूचना ते देतात. प्लेटोचा 'कल्पना' विलास वाचकांना माहीत असेलच. आपणांस सभोंवार दिसणाऱ्या पदार्थमात्रांना व प्राणिमात्रांना तो त्या सत्यस्वरूप कल्पनांचीं केवळ प्रतिबिंबें समजतो साहजिकच प्रतिबिंबांना तो खरें मानीत नाहीं. दिसणारी सुंदर वस्तु खोटी परंतु सौंदर्याची कल्पना सत्य. या दृष्टिकोनाचा परिणाम म्हणजे बाह्य सर्व पदार्थमात्राविषयी एक तऱ्हेचा परका

भाव निर्माण झाला. लौकिक व्यवहाराविषयींचा जिव्हाळा कमी झाला. स्वामिजी सांगतात कल्पनाहि खोट्या व वस्तुमात्रहि खोटें. ती एक जाणीवस्वरूप स्थिति कीं, जिला फक्त त्या जाणीवेचेंच भान आहे; तेवढी एकच सत्यस्वरूप आहे. परंतु असें असलें तरी जोपर्यंत आपण लौकिक व्यवहार करीत आहोंत तोपर्यंत सर्व पदार्थमात्राकडे व प्राणिमात्राकडे आत्म्यौपम्य बुद्धीनें पाहाण्यास शिकलें पाहिजे. त्या परतत्त्वाचें दर्शन सर्वत्र व सर्वांत घेण्यास शिकलें पाहिजे. सुंदर वस्तु ही त्या सत्सौंदर्याचाच एक आविष्कार आहे. उत्कृष्ट गाण्यांतील स्वरसंगति ही त्या विश्वात्मक कंपनलहरींच्या संगतीचेंच एक छोटें स्वरूप आहे. अशा तऱ्हेनें वस्तुमात्रांत ही विशालता पाहा. त्या एकमात्र जाणीवस्वरूपालाच सर्वत्र पाहा. जगाकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. आपला विकास घडविणारें तें ठिकाण आहे.

जग खोटें म्हणून जीवनाकडे दुर्लक्ष करावयाचें म्हटल्यास सद्‌गुणाला कांहीं अर्थच उरणार नाहीं. जीवनाच्या या तीव्र कलहांत नि विलक्षण धांवपळींत ते मौन पाळावयास सांगतात. आणि अनंतत्त्वाचे सूर त्या असीम शांततेंत ऐकण्यास सांगतात. प्लेटोच्या सर्वश्रेष्ठ चांगलेपणाची ( Highest good ) कल्पना अशीच सदोष आहे. आपल्याकडील, निर्गुण सत्याच्या स्वरूपाची कल्पना स्पष्ट करतांना स्वामिजी म्हणतात, चांगले-पणाचा दुसरा भाग वाईटपणा आहे. या द्वंद्वाच्या पलिकडे तें सत्यस्वरूप आहे. परंतु असें असलें तरी त्या स्वरूपाचा अनुभव घेण्यापूर्वी आपणाला चांगल्याची प्राप्ति करून घेतली पाहिजे. चांगले व्हा नि चांगलें तेंच करा. मानवी स्वभावांत चांगलें व वाईट अशा दोहोंचीं बीजें आहेत. स्वभा-वांतील चांगल्या प्रवृत्तींच्या साहाय्यानें वाईट प्रवृत्तींवर विजय मिळविला पाहिजे. एरवीं तसा कोणताहि प्रयत्न न केल्यास वाईट प्रवृत्ती अंकुरतील नि वाढीस लागतील. अशा तऱ्हेनें अंतीम साध्याच्या दृष्टीनें फार मोठा अडथळा निर्माण होईल. एकदां वाईट प्रवृत्ति चांगल्या प्रवृत्तींच्या साहा-य्यानें नष्ट केल्यावर अहंता नि चांगलेपणा यांच्याहि पलिकडे गेलें पाहिजे. चांगल्या प्रवृत्तींचें तें एक स्वाभाविक परिवर्तन आहे. अशा तऱ्हेनें ज्या सद्‌गुणांचा विकास करून घेतला त्यांना त्यांच्या साहाय्यानें टाकूनच त्या

निर्गुणाची प्राप्ति करून घेतली जाते. ॲरिस्टॉलचें तर्कशास्त्रहि असेंच या बाबतींत अपुरें आहे. त्या परतत्त्वाचें ओंकाररूप प्रगटीकरण (उपनिषदांतून स्पष्ट केलेलें ) स्वामिजीसारखे उपनिषदांचे भाष्यकार मानतात. जगताचें तें एकच ओंकारस्वरूप कारण मानणाऱ्यांचा, सुप्त वा व्यक्त शक्तीचा उगम नि लय त्या ओंकार स्वरूपांतच आहे याचा प्रत्यक्ष अनुभव घेतलेल्या स्वामिजीसारख्या भारतीय ऋषींच्या परंपरेंतील अभ्यासूंचा, ॲरिस्टॉलनें प्रतिपादलेल्या आदिकारणांच्या चतुर्विध स्वरूपाबाबत मतभेद होणें साहजिक आहे.

पाश्चात्य अर्वाचीन तत्त्ववेत्ता डेकार्टस् मन आणि वस्तुजात हें द्वैत ओलांडू शकला नाहीं. त्याचें सुप्रसिद्ध वाक्य ‘Cogito ergo sum’ ‘मी ज्या अर्थीं विचार करतों त्या अर्थीं मी आहे’ हे त्याच्या विचार-प्रणालीचें सूत्र आहे. स्वामिजी म्हणतील ‘मी आहे म्हणून मी विचार करतो.’ आत्मा आहे म्हणून मन विचार करूं शकतें. ‘मी’ म्हणून व्यक्तिमात्रांत स्फुरणारें तें स्वयंप्रकाशी चैतन्यच नसेल तर त्या चैतन्याचें केवळ प्रतिबिंब दाखवूं शकणारें मन विचार तरी कसें करूं शकेल? त्याच्या शक्तीमुळेंच मनाला विचार करण्याचें सामर्थ्य प्राप्त झालें आहे. बुद्धीचा उगमच मुळीं त्या शक्तींत आहे. पूर्णत्वाची कल्पना आहे त्या अर्थीं परमेश्वर आहे असें तो मानतो. परंतु त्याच्याबाबत अधिक समाधानकारक स्पष्टीकरण तेथें नाहीं. मन आणि वस्तुजात यांच्यांत संवादित्व ठेवणें इतकेंच त्या परमेश्वराचें कार्य आहे काय? मन आणि वस्तुजातांशीं परमेश्वराचा मूलभूत संबंध कसल्या प्रकाराचा आहे याचा कांहीं नीट बोध त्या विवेचनांत होत नाहीं. स्वामिजी म्हणतात सत्य हें एक आहे. तें सर्वदर्शी, सर्वव्यापक आणि सर्वशक्तिमान आहे. चांगल्या वाइटापलिकडे तें असून जें कांहीं चांगलें नि तेजस्वी असतें त्यांत त्याचा विशेष अंश ( विभूतिमत्त्व ) कल्पिलेला असल्यानें मनुष्यमात्राला स्वतःच्या कल्याणासाठीं चांगलाच मार्ग चोखाळावा लागतो.

प्रत्येक वस्तुमात्राच्या नि व्यक्तिमात्राच्या कार्याचें स्वरूप अगोदरच निश्चित झालेलें असतें असें डेकार्टस् म्हणतो. तेथें स्वतंत्रेच्छा नाहीं.

शिवानंद म्हणतात, **मनुष्य हा आपल्या नशिबाचा शिल्पकार आहे.** आत्मरूप नाव वल्हविण्याचा सुकाणू त्याच्या हातांत आहे. 'स्वतःचें स्वरूप समजून घ्या नि स्वतंत्र व्हा' असें ते म्हणतात. सर्व तऱ्हेच्या दुःखापासून निवृत्ति हवी असल्यास, ती विशाल जाणीव प्राप्त करून घेतली पाहिजे असें ते म्हणतात. ती कशी प्राप्त करून घ्यावयाची हेंहि त्यांनीं सांगितलें आहे. स्पायनोझानें देवाविषयींचें बौद्धिक प्रेम प्रतिपादलें आहे. तो असें म्हणतो कीं, त्याच्याकडून आपण कुठल्या गोष्टीची अपेक्षा करतां उपयोगी नाहीं. अशा परमेश्वरी स्वरूपाबद्दल प्रेमभाव मनांत निर्माण होणें कठिण आहे असें स्वामिजी म्हणतात. परमेश्वराकडून रक्षण, आशीर्वाद, दया यांची अपेक्षा मनुष्यमात्रास असणारच. तो दयाळू आहे, प्रेमस्वरूप आहे आणि म्हणूनच प्रारब्ध भोगतांना परमेश्वरी कृपा एवढा एकच आधार मनुष्यमात्राला आहे. स्पायनोझानें चांगल्याची महती गायली आहे, परंतु तें चांगलेपण कसें प्राप्त करून घ्यावयाचें याची स्पष्ट कल्पना त्यानें दिलेली नाहीं. शिवानंदांच्या शिकवणीचा तो एक प्रमुख भाग आहे.

लायब्नीझ ह्या तत्त्ववेत्याला मूलभूत स्वरूपाचें अनेकत्व अभिप्रेत आहे. शिवानंदांच्या दृष्टीनें अनेकत्व हें भ्रामक आहे. अनेकत्वांतील एकत्व पाहणारी त्यांची दृष्टि आहे. लायब्नीझची दृष्टि पूर्णांशानें जीवनानुगामी आहे किंवा नाहीं याबद्दल संभ्रम निर्माण होतो. स्वामिजींचें तत्त्वज्ञान विलक्षण प्रेरक नि जगतां येण्यासारखें आहे. अनंत संख्येचे मोनॅड्स् तो मानतो. एका मोनॅडचा दुसऱ्या मोनॅडशीं तसा मूलगामी नि अनिर्बंध संबंध नाहीं. कांहीं आकस्मिक अपघातानें त्यांच्यांत कांहीं बदल घडून येतो. एकमेकांवर प्रतिक्रिया होते. ही प्रतिक्रिया ज्या प्रमाणामध्यें अधिक स्पष्ट स्वरूपाची आहे त्या प्रमाणांत त्या मोनॅडचें स्थान उंचावतें. चांगल्याची महती वाढविण्यासाठीं वाईट गोष्टी आहेत असेंहि तो म्हणतो. उत्पत्ति, स्थिति आणि लय हीं एकाच सचेतन तत्त्वाचीं स्वरूपें आहेत. तें सचेतन तत्त्व सर्वत्र भरून राहिलें आहे. हा लहान 'मी' नाहींसा करा नि त्या मोठ्या 'मी'त मिसळून जा. अशा स्वरूपाची विचारसरणी असलेले स्वामिजी मोनॅड्सचे श्रेष्ठ-कनिष्ठ स्थान ठरविणाऱ्या शिडीला (hierarchy)

केवळ लौकिक दृष्टीनेंच मानतील. संकुचित ' मी 'ची कल्पना आहे तों-पर्यंत श्रेष्ठ-कनिष्ठ पायऱ्यांना अस्तित्व आहे. त्या एका जाणीवस्वरूप सत्याच्या दृष्टीनें या लहानमोठेपणा ठरविणाऱ्या शिडीला कांहीं अर्थ उरत नाहीं.

लॉक हा अज्ञेयवादी होता. पदार्थमात्राचें मूलतत्त्व कधीं समजून येऊं शकत नाहीं असें तो म्हणतो. ज्ञानाचीं साधनें त्यानें फक्त इंद्रियें मानलीं. केवळ इंद्रियाधिष्ठित ज्ञानानें मूलतत्त्वाचें आकलन कसें होणार? शिवानंदांनीं हें स्पष्टपणें सांगितलें आहे कीं, इंद्रियांमुळें प्राप्त होणारें ज्ञान भ्रामक आहे. पदार्थमात्राचें मूलस्वरूप प्रतिभेच्या ( Intuition ) दृष्टीला अगम्य नाहीं. आध्यात्मिक साधनेनें ही प्रतिभा प्राप्त करून घेतां येते. लॉक म्हणतो, मनामध्यें जें कांहीं आहे तें इंद्रियांनीं या जीवनांत दिलेल्या ज्ञानामुळें नि अनुभवामुळें आहे. मनांतील कित्येक गोष्टी गत जन्मांच्याहि संस्कारांमुळें असतात. एकाच जन्मांत उत्क्रान्ति होत नाहीं. त्या सत्य-स्वरूपाच्या साक्षात्काराला समर्थ असणारें शुद्ध मन एकाच जन्मांत मिळत नाहीं. अशा स्वरूपाची शिवानंदांची विचारसरणी आपणांला माहीत आहेच. स्वर्गलोकींच्या सुखासाठीं सद्गुणी जीवन पाहिजे असें लॉकनें सांगितलें आहे. भारतीय तत्त्वज्ञानाचे अभ्यासू स्वामिजी नैतिक साधना चित्तशुद्धीसाठीं आवश्यक मानतात. ही शुद्धि केवळ परमेश्वराच्या साक्षात्कारासाठींच फक्त नव्हे तर ऐहिक अभ्युदयासाठींहि तिची आवश्यकता आहे असें ते प्रतिपादितात.

बर्कले या तत्त्ववेत्याच्या दृष्टीनें मन आणि मनांतील कल्पना यांनाच अस्तित्व आहे. पदार्थमात्राला स्वतंत्र असें अस्तित्वस्वरूप नाहीं. मनानें त्याचें स्वरूप अनुभवण्यांत – मानण्यांत – त्याला अस्तित्व आहे असें तो म्हणतो. आपल्याकडील ' मनःकल्पित जग ' या कल्पनेपेक्षां ही बर्कलेची विचारसरणी वेगळी आहे. स्वतःच्या शरीराचें अस्तित्वहि ह्यूमला संशयास्पद वाटलें. ' मन ' अशी कांहीं वस्तु नाहींच असें तो म्हणतो. स्वतंत्र कल्पना, भावना, आठवणी यांचीच आपणांस जाणीव होते. विचारामागील आत्मतत्त्व त्यानें मानलें आहे. शिवानंदांची याबाबतची

भूमिका भारतीय तत्त्वज्ञानाच्या अभ्यासूंना ज्ञात आहेच. मन हें संकल्प-विकल्पात्मक आहे. या संकल्प-विकल्पानें अंतर्मन संस्कारित होतें. हे संकल्प, विचार, भावना दोन प्रकारच्या असतात. एक विहित व दुसऱ्या निषिद्ध. यांतील विहित गोष्टींची कांस धरून निषिद्धाचें निर्मूलन करणें हा साधनेचा भाग आहे. अशा तऱ्हेनें निषिद्ध गोष्टींच्या निर्मूलनानंतर मन सुलभतेनें त्या विशाल जाणीवेंत लय पावतें. एवढें साधेपर्यंतच मनाचें कार्य महत्त्वाचें आहे. मानव्याला देवत्वाइतकें माहात्म्य असल्याचें स्पष्ट करणारी त्यांची विचारसरणी आहे. शंकराचार्यांनीं सांगितल्याप्रमाणें ते 'जीवनमुक्त' आहेत. आणि म्हणूनच आजच्या काळांतील लोकांचीं विविध स्वरूपाचीं दुःखें समजून घेऊन ती दूर करण्यांत ते स्वतःला विसरून गेलेले आहेत.

स्वामिजींचें तत्त्वज्ञान हे वेदान्ताचें तत्त्वज्ञान आहे. आचार्यांचें तत्त्वज्ञान आहे. तें स्पष्ट करण्यांतील त्यांची मधुर शैली नि आजच्या काळांतील मर्यादा ओळखून त्याला दिलेलें व्यावहारिक मूल्य या गोष्टी विशेष वाटल्यावरूनच त्यांची विचारसरणी स्पष्ट करण्याचा प्रपंच या प्रकरणांत चालू ठेवला आहे.

उच्च तऱ्हेचें, दुःखरहित जीवन जगावें असें प्रत्येकाला वाटत असतें. वास्तवाच्या पलीकडे आपली दृष्टि जाते त्याचें कारण आपली ही सुखाची इच्छाच होय. या इच्छेच्या स्वरूपावरूनच त्या साध्याच्या स्वरूपाची कल्पना येऊं शकते. वास्तवस्थितींतच त्या उच्च स्थितीची जाणीव होणें, तिच्या प्राप्तीची इच्छा होणें ही गोष्ट पूर्वपुण्याईमुळें शक्य होते.

वास्तवस्थिति व इच्छिलेलें सुख यांतील फरक लक्षांत येणें हें विवेकाचें फळ आहे. हा फरक लक्षांत आल्यावर वास्तवांतील सुखाची ओढ कमी होणें—यालाच वैराग्य म्हणतां येईल. हे विवेकाचें फळ आहे. अशा तऱ्हेनें विवेकवैराग्यानेंच साधनेला आरंभ होतो. इंद्रियांनीं अनुभवास येणाऱ्या पदार्थमात्राच्या स्वरूपानें साधकाचें समाधान होत नाहीं. हें त्याचें असमाधान—हें विवेक आणि वैराग्य—गुरूच्या—पदार्थमात्राचें सत्यस्वरूप जाणणाऱ्या माणसाच्या सहवासांत साहजिकच वाढीस लागतें. स्वतःच्या

स्वरूपाचा शोध घेण्यास गुरु मार्गदर्शन करतो. कारण सुरुवात स्वतःच्या अस्तित्वापासूनच केली पाहिजे साक्षात् अनुभवास येणारी गोष्ट म्हणजे 'मी ' मनुष्य इतर पदार्थमात्राच्या अस्तित्वासंबंधानें एक वेळ शंका घेईल परंतु स्वतःच्या अस्तित्वाची त्याला शंका येणार नाहीं.

सभोंवतालच्या पदार्थमात्रांतून प्रकाशकिरण निघून आपल्या डोळ्यांतील मज्जापटलावर येऊन आदळतात नि मग आपणांस बाह्य पदार्थांचें ज्ञान होतें. ते पदार्थ आपल्या जाणीवेचा भाग बनतात. अशा तऱ्हेच्या अनुभवांत कांहीं भ्रम आहे का, असा प्रश्न सर्वसामान्य माणसास बिलकूल पडत नाहीं. साधकालाच या जाणीवेच्या प्रक्रियेचें गूढ वाटूं लागतें. सत्स्वरूपाची जाणीव अशा तऱ्हेनें होऊं शकेल का? बाहेरच्या पदार्थमात्राची जाणीव होते, तो पदार्थ आपल्या जाणीवेचा भाग बनतो. त्या पदार्थमात्राचा व आपला कांहीं स्वाभाविक संबंध असला पाहिजे. या संबंधाचें स्वरूप चेतन असलें पाहिजे. एरवीं आपल्या चेतनस्वरूप बुद्धीचा तो विषय होऊं शकणार नाहीं. वेगवेगळ्या गुणधर्मांच्या दोन वस्तु एकमेकांत मिसळूं शकत नाहींत. लोखंड आणि दूध मिसळूं शकणार नाहींत. परंतु दूध व पाणी यांचें मिश्रण होऊं शकतें. ज्यामुळें तुम्हांला बाह्य जगाचें ज्ञान होतें त्या तुमच्या जाणीवेचें स्वरूप आत्मिक (चेतन) आहे. बाह्य जगांतील वस्तुमात्रांतहि हा चैतन्याचा अंश असला पाहिजे. आणि म्हणूनच त्या वस्तु तुमच्या चेतनस्वरूप जाणीवेचा भाग बनूं शकतात. द्रष्टा आणि दृश्य यांच्यामध्यें कांहीं संबंध असल्याशिवाय जाणीव नाहीं. ह्या संबंधाचे गुणधर्महि द्रष्टा आणि दृश्य यांच्या गुणधर्मांशीं मिळते जुळते हवेत. याचाच अर्थ असा कीं, तो संबंधहि चेतनस्वरूप आहे. चैतन्य सर्वत्र भरून राहिलें आहे असें जें म्हटलें जातें त्याच्या मागील विचारसरणी सामान्यपणें ही अशी आहे. हें चैतन्य स्वतंत्र आहे, अवस्थानिरपेक्ष, इंद्रियनिरपेक्ष आहे. स्वप्नांत इंद्रियें काम करीत नाहींत. परंतु त्या वेळीहि स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव असतेच. तीच गोष्ट निद्रावस्थेबाबत सांगतां येईल. निद्रा झाल्यावर आपणास गाढ झोंप लागल्याचें आठवूं शकतें. आतां हें जें स्मरण होतें तें अनुभव आल्याखेरीज होणार नाहीं आणि जाणीव

असल्याखेरीज अनुभव नाहीं. हा गाढ निद्रासुखाचा अनुभव त्याच वेळीं—गाढ निद्रासुख घेत असतांनाच—कां लक्षांत येत नाहीं? त्याच वेळीं त्याची जाणीव कां होऊं नये? ही जी आपली त्याच वेळीं जाणीव करून घेण्याची असमर्थता आहे ती केवळ योगसाधनानेंच नाहींशी होऊं शकेल. योगसाधनानें ती निःसंशयपणें नाहींशी करतां येते हा योग्यांचा प्रत्यक्षानुभव आहे. हें जाणीवेवरील आवरण दूर करणें हाच योगाचा उद्देश आहे. या आवरणामुळेंच आपणास गाढ निद्रेंत चैतन्याची जाणीव होऊं शकत नाहीं. चैतन्याचा अनुभव हा प्रत्येक अवस्थेंत आहे हें यावरून स्पष्ट होतें.

आतां महत्त्वाचा प्रश्न आहे तो असा कीं, गाढ निद्रेंत चैतन्याची जाणीव न होणें. किंवा स्वप्नांतहि न होणें हें पटूं शकेल. परंतु जागृतींतहि त्या सर्वत्र भरून राहिलेल्या चैतन्याची जाणीव कां होऊं नये? याचें कारण असें आहे कीं, आपण बाह्य जगाकडे मन-इंद्रियांच्या भिंगांतून पाहातो. साहजिकच भिंगांतच जर दोष असेल तर वस्तुमात्राचें खरें स्वरूप कसें लक्षांत येणार? भिंगांतील विकृतीमुळें पदार्थमात्राच्या स्वरूपांतहि विकृति दिसणारच. स्थळ, काळ आणि कार्यकारण भाव अशी ती या मनाच्या भिंगाची चौकट आहे. मनाच्या भिंगाच्या या स्वरूपलक्षणामुळें सत्यस्वरूप आकळतां येत नाहीं. डोळे मिटून क्षणभर बसा नि कोणतीहि वस्तु मनांत आणा. तिला ठिकाण आहे, ती अमक्यापासून निर्माण झाली हा बोध आहे. इतक्या तीव्रतेनें मनाच्या स्वरूपलक्षणाचा परिणाम त्याच्या साहाय्यानें ज्यांचें ज्ञान घ्यावयाचें त्यांच्या ज्ञानाबाबत होतो. आमची जाणीव जागृतींतहि विशाल बनत नाहीं आणि सर्वत्र भरून राहिलेलें चैतन्य पाहूं शकत नाहीं यांचें कारणच आपल्या मनांतील विकृति हें होय. आणि ही जाणीव जर विशाल करावयाची असेल आणि तें सर्वव्यापक चैतन्य पाहण्याची क्षमता आणावयाची असेल तर त्याला सोपा मार्ग म्हणजे मनाच्या भिंगांतील विकृति नि अशुद्धता नाहींशी करून टाकणें हा होय. ही अशुद्धता नाहींशी करणें हें योगानेंच शक्य आहे. मनाची शुद्धि म्हणजे मनाचा लयच होय. पतंजल महर्षींनीं असें म्हटलें आहे कीं, 'योगः चित्तवृत्तिनिरोधः।'

अशा तऱ्हेनें मनोलय झाल्यावर, चित्तशुद्धि झाल्यावर सर्वत्र भरून असलेल्या त्या चैतन्याची जाणीव स्थिर करणें, त्या चैतन्याचा अनुभव घेणें ही पुढली पायरी आहे. हा फक्त राजयोगाचाच भाग नसून सर्व योगांचें कार्य हेंच आहे. सर्व योगांत त्या चैतन्याचें ध्यानच अभिप्रेत आहे. कोणत्याहि योगाची परिणति सर्वंकष उन्नतींत होते. एकांगी विकास हा कोणत्याहि निर्दोष योगसाधनेचें पर्यवसान असूं शकणार नाहीं. व्यक्तिमत्त्वाचे मानसिक, बौद्धिक, भावनात्मक, क्रियात्मक हे सर्व भाग उन्नत झाले पाहिजेत. अशा तऱ्हेनें मानवाच्या समग्र व्यक्तिमत्त्वाची त्या पूर्णतेकडील–त्या परमात्म्याकडील–ही वाटचाल आहे.

ही वाटचाल तुम्हाला एकट्यानेंच केली पाहिजे. ही एकट्याची त्या एकट्याकडील वाटचाल आहे. 'Flight of the Alone to the Alone' असें प्लेटोनें एके ठिकाणीं म्हटलें आहे. सुरुवातीला गुरूचें (त्या चैतन्याचें साक्षात् दर्शन ज्यानें सर्वत्र घेतलेलें आहे त्याचें) साहाय्य मिळेल, पण पुढील वाटचाल तुमची एकट्याचीच आहे. तुमचे येथील सामाजिक हितसंबंध तुमचे प्रारब्धाचे भोग पुरे करण्याकरितां आहेत. सामाजिक जीवनाचा हा अनुभव म्हणजे विकासाच्या मार्गातील एक अवस्था, एक पायरी आहे.

प्रत्येक बाबतींत आपण पूर्ण व्हावें असें आपणांस वाटतें. मृत्यु कुणालाच नको आहे. ज्या चैतन्यामुळें आपण विचार करूं शकतो, ज्या चैतन्यामुळेंच आपलें अस्तित्व आहे त्या चैतन्याचें स्वरूप पूर्ण आहे, शाश्वत आहे, अनादि नि अनंत आहे. आपल्या पूर्णत्वाच्या कांक्षेचें, पूर्णत्वाकडील वाटचालीचें बीज या चैतन्याच्या स्वरूपांतच आहे. पूर्ण होऊनच तें पूर्ण अनुभवायचें आहे. देव होऊनि देवासी पाहावें. या दुबळ्या इंद्रियांनीं तो पूर्णत्वाचा अनुभव कसा शक्य आहे ? इंद्रियांच्या चष्म्यांतून तें एकच पूर्णत्व विविधतेनें विनटलेलें दिसतें, जड दिसतें. आणि म्हणूनच योगाचा हेतु भोक्ता–भोग्य, द्रष्टा–दृश्य अशा स्वरूपाची द्वंद्वात्मक जाणीव देणाऱ्या मनाला त्या चैतन्यांत मिसळून टाकणें हा आहे. चैतन्यरूप द्रष्ट्यानें

केलेलें हें चैतन्यस्वरूप दृश्याचें ध्यान आहे. द्रष्टा आणि दृश्याची ही एकरूपता आहे. जाणीवेचें हें आत्मरूपांत ( चैतन्यस्वरूपांत ) स्थिरावणें होय.

आमची जाणीव वखवखलेल्या वासनेनें दडपली गेली आहे. ती मन-इंद्रियांच्या चष्म्यांतून बाह्याचा शोध घेते आहे नि सुख पाहते आहे. सुख म्हणजे जाणीव स्थिर होणें. इच्छित वस्तूंची प्राप्ति नव्हे. आनंद हा वस्तूंत नाहीं. जाणीवेच्या स्थिरावण्यांत आहे. एकाग्रतेंत आहे. मनाच्या वृत्तींच्या नाशांत आहे. आनंद हा जाणीवेच्या गाभ्यांत आहे. अशा तऱ्हेनें त्या सच्चिदानंदमय जाणीवस्वरूपांत स्थिर झालें पाहिजे. हा योग रोजच्या जीवनांत आणतां येण्यासारखा आहे. त्या जाणीवस्वरूपाशीं संबंध ठेवून ही गोष्ट सहज शक्य आहे. **जीवनांतील प्रधान कर्तव्य आत्मदर्शन हेंच आहे.** रोजच्या जीवनांतील कर्तव्यें ही या प्रधान कर्तव्याला पूरक अशीं आहेत. कोणत्याहि क्षणीं दुःख होतां कामा नये. कोणतीहि परिस्थिति आम्हाला आमच्या योगाला अनुरूप अशी करून घेतां आली पाहिजे. योग ही एक जगण्याची कला आहे. ही कला प्राप्त करून जगणें प्रत्येकाला हवें आहे. योग केवळ ऋषिमुनीसाठीं मर्यादित नाहीं. योगः कर्मसु कौशलम् । कार्यांत प्राविण्य आलें पाहिजे. अशा तऱ्हेनें कार्यरत झालें पाहिजे कीं, अंतरीची समाधानता, त्या जाणीवस्वरूपाचें संधान बिलकूल नष्ट होणार नाहीं. मनाच्या समतोलपणानेंच हें प्राविण्य येईल. श्रवण, मनन, निदिध्यास यांत केव्हांहि खंड पडूं नये. कारण हें ध्यान जीवनाच्या प्रत्येक क्षणीं साधणें जरूर आहे. दिवसाच्या इतर वेळीं तें न करणें हें असुरक्षिततेचें आहे आणि म्हणूनच या ठिकाणीं कर्मयोगाचें महत्त्व आहे. ध्यान आणि कर्मयोग यांत फरक करून चालणार नाहीं. तसें झालें तर जगांत वागणें कठिण जाईल. ध्यानाच्या साहाय्यानें प्रत्येक अवघड परिस्थितीला आम्हांला अनुकूल असें स्वरूप देतां येईल. मग जीवन ही एक आनंदाची गोष्ट वाटेल. पुरुषोत्तम बनणें हें साध्य आहे. योग म्हणजे प्रपंचाला सोडून असणारें कांहीं नाहीं. तें एक शहाणपण आहे. चतुर शहाणपण आहे.

सुप्तेरुत्थाय सुप्त्यंतम् ब्रह्मैकम् प्रविचिन्त्यताम् । ही अत्यंत आवश्यक अशी गोष्ट आहे श्रीकृष्णांनींहि म्हटलें आहे.

**यतः प्रवृत्तिर्भूतानाम् येन सर्वमिदम् ततम् ।**
**स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः ।**

अशा तऱ्हेनें पूर्णतेकडे वाटचाल आपलीं रोजचीं कार्यें उत्कृष्ट तऱ्हेनें करून करतां येते. मोठ्या लोकांनीं हाच मार्ग अनुसरला आहे. स्वामिजींच्या वेदान्ताच्या तत्त्वज्ञानाची स्थूल रूपरेषा ही अशी आहे.

* * *

... ग्रंथ संग्रहालय, ...
अनुक्रम 25628
विभाग अ-वा
क्रमांक 7548
नों. दि. 3-7-67

# शिकवण

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

शिवानंद हें जणुं आचरणस्वरूप तत्त्वज्ञानाचें नांव आहे, असें ज्यांचें वर्णन केलें जातें त्यांच्या शिकवणीचें मूलसूत्र वेगळें स्पष्ट करण्याचें कारण नाहीं. Be good, Do good; हें त्यांचें आवडतें वाक्य आहे. Service, Love, Purity, Meditation, Realisation; सेवा, भक्ति, चित्तशुद्धि, ध्यान आणि साक्षात्कार ही त्यांची पंचसूत्री आहे.

आजच्या काळांत ही पंचसूत्री अंमलांत कशी आणावयाची हा खरा प्रश्न आहे चलनवाढ, काळाबाजार, लांचलुचपत, चोरटा व्यापार या गोष्टींनीं मानवी जीवनांत कर्कशता आलेली आहे. विलासी जीवनाची चटक निर्माण झाली आहे आणि वरच्या दर्जाचें जीवनमान म्हणजे विलाससंपन्न राहणी अशी समजूत बळावत आहे. द्वेष, मत्सर, लोभ, एकमेकांवरील अविश्वास यामुळें जीवनांत अस्थिरता आली आहे. अशा वेळीं पाहिली गोष्ट म्हणजे जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनांत बदल केला पाहिजे. साधी राहणी व उच्च विचारसरणी पत्करली पाहिजे. निष्काम सेवेचे पाठ प्रत्येकाला लहानपणापासून मिळाले पाहिजेत. उदात्त हेतूनेंच जेव्हां कोणत्याहि कार्याला हात घातला जाईल तेव्हांच विकास शक्य होईल. हक्क आणि कर्तव्यें यांपैकीं हक्कांच्या अपेक्षेपेक्षां कर्तव्य करण्यावर भर दिला गेला पाहिजे.

आपण आपल्या कृतीनें असें सिद्ध करून दाखविलें पाहिजे कीं, उपनिषदांतून व्यक्त होणाऱ्या व्यावहारिक शहाणपणाचें आम्ही खरे वारस आहोंत. लांचलुचपत, मालांत भेसळ करणें, सांठेबाजी आणि यांच्या भरीला चोरटा व्यापार या सर्व गोष्टींचें उग्रस्वरूप आपण पाहिलेलें आहे. लहान मुलांच्या छोट्या रंगीत खेळण्यांतून लपवून सोनें आणणें, पुस्तकांतून अफू, गांजा आणणें या साऱ्या प्रकाराचें मूळ, जीवन जगण्याच्या चुकीच्या दृष्टिकोनांत आहे. व्यक्तिमात्राचें अज्ञान दूर केलें तर सामाजिक जीवन शुद्ध होऊं शकेल. हें अज्ञान दूर झाल्यानंतर नवी दृष्टि दृढ करण्यासाठीं, जुने वाईट संस्कार पुनरुज्जीवित होऊं नयेत म्हणून त्यासाठीं कांहीं प्रयत्न केले पाहिजेत. योग्य मार्गानें थोडा अभ्यास केला पाहिजे. असा हा अभ्यास म्हणजे वेळेचा अपव्यय वाटूं नये. जीवनवेतन मिळविण्यास पात्र होण्यासाठीं ज्याप्रमाणें कांहीं अभ्यासक्रम पुरा करावा लागतो तसाच हा एक अभ्यासक्रम आवश्यक ती जीवनदृष्टि येण्यासाठीं जरूर हवा. त्यासाठीं वेगळीं वर्षें दिलींच पाहिजेत असा बिलकूल प्रकार नाहीं. दिवसांतून तास, अर्धा तास या कामीं दिला गेला तरी तेवढ्यानेंहि खूप काम होईल. विधिपर ( Positive ) गोष्ट निषिद्ध ( Negative ) गोष्टीवर नेहमींच मात करते हें त्रिकालाबाधित सत्य आहे. सर्व सद्‌गुण हे विहित आहेत. दुर्गुण निषिद्ध आहेत. मग दिवसांकांठीं कांहीं काळ विहित गोष्टींच्या चिंतनाला देणें जरूर आहे. स्वामिजी छोटीं छोटीं सूत्रें चिंतनाला देतात. अनेक वेळां तींच तींच सूत्रें पत्रांतून लिहितात आपल्या रोजच्या आहारांत कांहीं गोष्टी ठरलेल्याच असतात कीं नाहीं? हीं छोटीं सूत्रें मनाचें पोषण करणारीं आहेत. आपल्यावर सहजप्रवृत्तींचा पगडा फार असतो. यांतील निषिद्ध सहजप्रवृत्तींचें निराकरण अशा या वारंवारच्या चिंतनानें सुलभ जातें.

जीवनाचें सखोल चिंतन केलेल्या लोकांना अशा या सहज प्रवृत्तींचें, विकारांचें स्वरूप, त्यांचा प्रभाव, त्यांचें फसवें स्वरूप याची पूर्ण कल्पना आलेली असते. भिन्न भिन्न संस्कृति असलेल्या लोकांचें जीवन त्यांना माहीत असतें. लहान मुलांची परीकथांची आवड, तरुणांचा जीवनाचें कोडें उलगडण्याच्या संकल्पाबाबतचा विलक्षण आशावाद, अनुभवांनीं

भ्रमनिरास झालेल्या प्रौढांची अंतर्मुख दृष्टि आणि ज्यांतून जीवनावरचें भाष्य मिळेल अशा ग्रंथांकडून मार्गदर्शन मिळविण्याचा त्यांचा प्रयत्न आणि श्रद्धेनें एखादी गोष्ट पत्करण्याची अनुभवानें शहाणे झालेल्या वृद्धांची तयारी या गोष्टी त्यांनीं पाहिलेल्या असतात. या जीवनांतील विविध कटु-गोड अनुभवांचें चिंतन करून प्रेम आणि प्रतिभा (Intuition) यांच्या साहाय्यानें बोध देण्याचा प्रयत्नहि ते करीत असतात. माणसाच्या हातून अज्ञानानेंच चुका घडताहेत तर त्या माणसांच्या चुकाबद्दल त्यांना राग येणें शक्य आहे काय? अशा लोकांच्या बाबतींत प्रेमाखेरीज अन्य भावना त्यांच्या मनांत येणें कसें शक्य आहे? मार्गदर्शनाची नितांत जरूरी असलेलीं हीं लहान मुलेंच नव्हेत का? अशा लोकांच्यासाठीं त्यांनीं शिक्षणाच्या पद्धती शोधून काढल्या. वेद, धर्मग्रंथ, स्मृति, इतिहास–पुराणें यांचा उगम यांतच आहे. या ग्रंथांतून जीवनाचें मार्गदर्शनच भिन्न भिन्न लोकांना मिळत आलेलें आहे. काव्य, संगीत, गद्य, कथा, दंतकथा, तार्किक विवेचन, विनोद या सगळ्यांच्या साहाय्यानें लोकांच्या मनांत जीवनाचीं साधीं सूत्रें दृढमूल करण्याचा प्रयत्न या लोकांनीं केला. यासाठीं त्या त्या काळीं उपलब्ध असलेलीं शिक्षणाचीं साधनें त्यांनीं उपयोगांत आणलीं. आजच्या काळाला अनुसरून शिक्षण देण्याचें कार्य स्वामिजींनीं अशाच भिन्न भिन्न शिक्षणाच्या अद्यावत् साधनांनीं चालू ठेवलें आहे. टेलिव्हिजनसारखें अद्यावत् साधनहि त्यानीं या कामासाठीं उपयोगांत आणलें आहे. केवळ टेलिव्हिजनसाठीं लिहिण्यांत आलेली शिवानंदांच्या जीवनपटावरील शिवानंदांच्या निवडक सूत्रांचा ठासून पुनरुच्चार करीत असल्याचें दिसून येतें. रेडिओ, सिनेमा यासारख्या अत्यंत परिणामकारक नि प्रभावी शिक्षणसाधनांतून मनांतील अयोग्य वृत्तींचें पोषण होत असेल तर त्याविरुद्ध नुसता ओरडा करण्या-ऐवजीं त्याच साधनांचा विहित कार्यासाठीं उपयोग करणें अधिक श्रेयस्कर आहे. या दृष्टीनें, स्वामिजींचें प्रचाराचें कार्य केवळ अनुपम म्हणावें लागेल. त्यांच्या आश्रमांतील अद्यावत् मुद्रणालय, योगाच्या विविध शाखांचें पोस्टानें शिक्षण देऊं शकणारे स्वामिजींनीं तयार केलेले ध्येयासक्त स्त्री-पुरुष, शिक्षक व साउंड स्टुडिओ, यांचा अशा विहित गोष्टींच्या

शिकवणीसाठीं व त्यांच्या दृढमूलीकरणासाठीं पुरेपूर वापर गेलीं दोन तपें स्वामिजींनीं केला आहे नि आज त्या कार्याला कालानुरूप चांगली गति मिळाली आहे.

ज्या संवयींनीं आमचें जीवन आकार घेतें, त्या संवयी आम्ही विचार-पूर्वक लावून घेतलेल्या असत नाहींत. प्रायः मन आणि शरीर यांच्या आधीन होऊन प्राप्त झालेल्या या सवंयी असतात. खाणें, पिणें, पोषाख, बोलणें, हंसणें, खेळणें, भांडणें इत्यादि रोजच्या साध्या साध्या गोष्टींतून या संवयी जडलेल्या असतात. जेवणासारखी साधी गोष्ट पण जर ती पद्धतशीर, वेळेवर घडणारी नि समतोल नसेल तर त्यांतील आल्हाद नाहींसा होतो. आधाशी माणसाची आहारांतील चांगलें-वाईट पाहण्याची दृष्टि नाहींशी होते. साधें पाणी पिण्याची बाब घ्या. तें देखील दारू सारखें एखाद्याला पितां येईल. गडबडीनें घटाघटा नि आपल्या घाण हातानें ! तीच गोष्ट बोलण्याबाबतची. एकामेकांचे संबंध सुखावह ठेवण्याच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाची बाब आहे ही. मैत्री आणि कलह यापैकीं कोणतेंहि पर्यवसान बोलण्याचें होईल. उच्च भावनेनें वातावरण भारून टाकणें, दुखऱ्या दिलाला दिलासा देणें, या गोष्टी हे बोलण्याचेच परिणाम आहेत. शब्द वापरतांना आपण फार जपलें पाहिजे. एखादा कंजुष जेवढ्या काळजीनें पैका खर्च करतो तेवढी काळजी आपण बोलतांना घेतली पाहिजे. शब्दांनींच रक्तांचीं रणें झालीं. शब्दांनींच स्त्रियांचा मान मातीमोल झाला. शब्दांनींच शिशूंच्या अविकसित कळ्या कोमेजल्या. अशा परिस्थितींत दुःखाचें कारण शोधायला आणखी दूर कशाला गेलें पाहिजे ? या संवयींचीं खोलवर गेलेलीं मुळें हलविण्याची आम्हाला भीति वाटते. तसें झाल्यास आम्हाला जणुं आमचें अस्तित्वच नाहींसें होईल असें वाटतें. फांद्या तुटतील, झाड पडेल परंतु खोलवर गेलेलीं मुळें पुढें तशींच राहतात.

संवयींचें हें सामर्थ्य शिक्षणाचें शास्त्र माहीत असलेले स्वामिजी चांगलें जाणून आहेत. मायेला दूर टेवून तिला तिच्या मर्यादेची जाणीव देणें आणि तिच्या प्रभावानें दृष्टिमंद होणें या दोन्ही गोष्टी संवयीमुळें शक्य

होतात. आणि म्हणूनच वाईट संवयींच्या निर्मूलनासाठीं आणि चांगल्या संवयींच्या संवर्धनासाठीं त्या विविध लोकांकरतां विविध साधना शोधल्या आणि त्या यशस्वी आहेत हें सिद्ध करून दाखविलें. बोलणें, वागणें आणि विचार यांच्या बाबतचा साधेपणा नि शुद्धपणा त्यांनीं अनेक तऱ्हेनें पटवून दिला आहे. अत्यंत गहन ज्ञान त्यांनीं अत्यंत सोप्या सूत्रांतून स्पष्ट केलें आहे. हा वागण्यांतील साधेपणा म्हणजे सौंदर्यदृष्टीचा अभाव नव्हे. निसर्गाच्या सहवासांत असलेल्या या थोर पुरुषानें निसर्गाचें सौंदर्यच आपल्या शिकवणींतून गुंफलें आहे. त्या सौंदर्याचा शोध घेत असतांनाच त्यांना निकृष्ट जिणें जगणाऱ्यांच्याशीं आणि जनावरांशीं स्वतःची एकरूपता अनुभवता आली.

साधेपणा, सौंदर्य यांच्या जोडीला शारीरिक सामर्थ्याचीहि उपासना करण्यास त्यांनीं सांगितलें आहे. तुमचें शरीर जेवढें निकोप तेवढें अधिक तुम्ही दिव्य जीवन जगण्यास अधिकारी आहांत. अन्न हें स्वतःच्या कष्टांनींच मिळविलें पाहिजे. कोणतेंहि काम हलकें नाहीं. सामर्थ्याच्या जोडीला आवश्यक तें धैर्य हवें. साध्यप्राप्तीपर्यंत अनेक अडचणी असतात. पाशवी विकारांना धैर्यानें तोंड देणें जरूर असतें. गंमतीची गोष्ट म्हणजे हीं सारीं संकटें मायेसारखीं असतात. त्यांना तसें सघन अस्तित्व म्हणायला गेल्यास असत नाहीं. धैर्याच्या प्रकाशकिरणांनीं धुक्याप्रमाणें असणाऱ्या या अडचणी एकदम लुप्त होतात. तुझें मूळस्वरूप दिव्य आहे असें ठासून सांगितल्यानंतर आणि दृढमूल केल्यानंतर या दिव्यतेची प्रचीति आणवून द्यावयाचें मोठें काम असतें. तेवढ्यासाठीं सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य यांचा पुरस्कार आजवर करण्यांत आला आहे.

ब्रह्मचर्य म्हटल्यावर आमच्या मज्जातंतूंना जणुं कंप सुटतो. तरुण लोक तरुण रक्ताचा विचार सांगतात; तरुण स्त्रियांच्या-मातृत्वाच्या भुकेबद्दल बोललें जातें आणि मग बहुजन समाज म्हणूं लागतो, "हें कांहींतरी भयंकर आहे; आमच्या कुवती पलीकडील आहे." तथापि आजवरच्या द्रष्ट्या ऋषींनीं ठासून सांगितलें आहे कीं जर शुद्धता प्राप्त करून घ्यावयाची

असेल, सत्याच्या साक्षात्कारासाठीं लागणारी शुद्धि हवी असेल तर ती ब्रह्मचर्याखेरीज कदापि प्राप्त होणार नाहीं. म्हणूनच इंद्रियांना अंतर्मुख करून, अंतर्यामीच्या आनंदाची गोडी चाखविण्याचा प्रयत्न केलेल्या मानसशास्त्रज्ञांनीं लैंगिक सुखाची इच्छा ही गरज मानली नाहीं. सत्याचा साक्षात्कार करून घेणाऱ्यांना स्वामिजीचें असेंच सांगणें आहे. ज्यांना असें महान् कार्य करावयाचें आहे, ध्येयाची ज्वलंत ओढ ज्यांच्या ठिकाणीं आहे, अशांना स्वामिजींनीं "लग्नविना राहणें तुम्हांला शक्य असेल तर लग्न करूं नका." असें स्पष्टपणें कळविलें आहे. उपजीविकेचें साधन प्राप्त झाल्यावर विवाह करणें वाईट नाहीं. अनेक विवाह-समारंभांना पूर्वाश्रमीं ते उपस्थित राहिले आहेत. आजहि समारंभाच्या दिनीं विवाहितांना ते शुभाशीर्वाद पाठवितात नि सुप्रजाजननाच्याहि दृष्टीनें शक्य तेवढें संयमित जीवन घालविण्याचा उपदेश त्यांना करतात. पत्नीशीं वारंवार भांडणें, नंतर आपल्या विकारवश स्वभावानुसार तिची मनधरणी करणें असल्या वैवाहिक जीवनाचा त्यांनीं उपहास केला आहे. उभयतांनीं आदर्श गृहस्थाश्रम करावा. एकमेकांचें जीवन फुलवावें. आर्थिक परिस्थिति ठीक असल्यास पत्नीला नोकरी करण्यास सांगूं नये. पत्नीच्या ठिकाणीं असलेल्या कांहीं गुणविशिष्ट स्त्रीत्वामुळें पतीला तिचा सहवास सुखकर होत असतो. बाहेरच्या जीवनाच्या धकाधकींत, स्त्रीच्या प्रकृतीला योग्य नसलेल्या नोकऱ्यामुळें तिचें स्त्रीत्व टिकत नाहीं. मुलाबाळांच्या सुशिक्षणाच्या दृष्टीनें आबाळ होते ती वेगळीच. नोकऱ्या करण्याची पाळी आलेल्या स्त्रियांनीं आपण थोडेफार 'पुरुषी' होत नाहीं ना यांची दक्षता घ्यावी. थोडक्यांत म्हणजे त्यांनीं साधकाचें सुखी वैवाहिक जीवन हाहि एक विकासाचा टप्पा मानला आहे.

विचार, आचार, उच्चार यांत संगती हवी. "**तुझ्या दिव्य स्वरूपाला साजेसें असें तुझें वर्तन हवें. तुझ्या जीवनाचा तूं शिल्पकार आहेस; अडचणींनीं निराश होऊं नकोस; अंतरांतून जरूर ती शक्ति प्राप्त करून घे.** अंतरांत **प्रचंड शक्तींचें उगम-स्थान आहे. त्या उगमांतून शक्तीचा प्रवाह कसा घ्यावयाचा तें**

शिकून घे." ही त्यांची शिकवण नीट समजून घेणें जरूर आहे. त्यांची शिकवण वाचत असतांना विविध लोकांच्या विविध शंकांना उत्तरें मिळतात. असें कोणतें रहस्य नाहीं, अशी कोणती अडचण नाहीं कीं जी स्वामिजींच्या जवळ स्पष्ट करण्यास आपण कचरावें. साधकांचा असा अनुभव असल्यानेंच स्वामिजींच्या विचारांचा खूप प्रसार झाला आहे. मंदमतींना नाउमेद केलें जात नाहीं. क्रूर माणसांतून कवि निर्माण करणारे नि शिष्याविषयीं नि पृच्छकांविषयीं पूर्ण सहानुभूति असलेले ते शिक्षक आहेत.

प्रतिपक्ष भावना पद्धति त्यांना परिणामकारक वाटते. राग आल्यावर प्रेमाचें चिंतन, लोभ निर्माण झाल्यावर औदार्याची आठवण करणें, अशा तऱ्हेनें क्षुद्र विकार नियंत्रित करतां येतात. विकार दूर व्हावेत ही उत्कटता मनांत निर्माण झाली पाहिजे. त्या विकारांमुळें, तुमच्या स्वभवांतील त्या दोषामुळें घडलेल्या वाईट परिणामांची स्मृति नि त्याच्या निर्मूलनानंतर जें सुख नि शांति मिळूं शकेल त्यावर दृष्टि राहिल्यासहि निषिद्ध गुणांच्या निर्मूलनाबाबत करण्याच्या प्रयत्नांत उत्कटता येईल. समतोल मन हा आमचा सततचा सुमित्र आहे. निषिद्ध गुणांनीं मनाचा तोल बिघडतो नि मग आमच्या हातून आम्हांला नकोशा वाटणाऱ्या गोष्टी घडतात.

एखादी फीट आल्याप्रमाणें आध्यात्मिक साधनेचा संचार कांहीं लोकांत होतो. ती इच्छा उत्कट असत नाहीं. तो सत्त्वगुणाचा प्रभाव असत नाहीं. ती तामसी वृत्ति आहे. प्रयत्न अपुरे पडल्यानें, वारंवार आलेल्या अपयशानें, अपयशाकडे बघण्याच्या चुकीच्या दृष्टिकोनामुळें त्यांना एकदम लौकिक जीवनाचा उबग येतो. सारें कांहीं टाकून जावेसें वाटतें. विकारांची निवृत्ति झालेली असत नाहीं. त्यांना वावच मिळालेला असत नाहीं. त्यांना डोकें वर काढण्यासारखी परिस्थिति निर्माण झाली कीं, असा हा 'झटपट' साधक तत्त्वज्ञानाचे नि परमार्थाचे विचार विसरूं शकतो. नित्य सखोल चिंतन केलें पाहिजे असें वारंवार सांगण्याचा हेतु अशी परिस्थिति उद्‌भवूं नये हाच आहे. व्यावहारिक जीवन यशस्वी करण्याच्या दृष्टीनेंहि माणसानें नेहमीं सावधान असलें पाहिजे. अनियंत्रित विकारानें येणाऱ्या

विस्कळितपणाची जाणीव ठेवली पाहिजे. एखादा विकार आपण काबूंत ठेवतो. त्याच विकाराबाबत थोडी बेफिकीरी झाली कीं, परिणाम चांगला होत नाहीं. याबाबत बायबलमधील एका गोष्टीचा उल्लेख स्वामिजी नेहमीं करतात.

कली (वाईट वृत्ति) आपलें घर सोडून जातो. त्याला कुठें स्थान मिळत नाहीं. तो तडफडूं लागतो. तो आपल्या घरीं परततो. पण दरम्यान घर स्वच्छ झालेलें असतें. कली परत जातो. आणि करतो काय? आपले आणखी पांच सहा स्नेही घेऊन त्या घरांत राहण्यासाठीं येतो. साधका, विचार कर, त्या घराची काय स्थिति होईल! पूर्वींपेक्षांहि वाईट स्थिति नव्हे का ही? एखाद्या विकाराचें पोषण झालें नाहीं कीं, त्याची उपासमार होते. तो कांहीं काळ दूर राहतो खरें, परंतु संधि मिळतांच शिरकाव करून घेतो आणि आपल्या चिकट स्वरूपाचा प्रत्यय देतो. या वेळची त्याची उग्रता वाढलेली असते. कधीं कधीं सहा-सात पटीइतकी!

सावधानतेसंबंधानें सूचना दिल्या कीं, कांहींना वाटतें, अशा तऱ्हेच्या सततच्या साक्षेपी सावधानतेनें जीवनाची मौज नाहींशी होईल; पण असें होणार नाहीं. त्यांची ही कल्पना चुकीची आहे. जागरणानें डोळे बिघडूं नयेत याबाबत आपण सावधान असतो, परंतु त्यामुळें कधींकाळीं औदासीन्य येतें असें नाहीं. कधीं जागरणें करतो, सिनेमा पाहातों परंतु डोळ्याची काळजी घेऊनच या साऱ्या गोष्टी करतो. एकतऱ्हेच्या धुंदीनें आणि मस्तीनें जीवन जगणें दानवी म्हणावें लागेल. एकांतिक विचार-सरणी त्यांना बिलकूल मान्य नाहीं.

देवाला जातांना चार चिल्लर नाणीं जवळ ठेवा. शक्य तेवढा दानधर्म करा. कांहीं लोक म्हणतात, अपंग भिकाऱ्यांनाच दान करावें. तसा अपंग नसला तर दान द्यावयाचे पैसे परत आणणें ठीक नाहीं. आपण चांगल्या भावनेनें शक्य तेवढी मदत करावी. ज्याचें कर्म त्याच्याबरोबर. समृद्धीच्या प्राप्तीचें रहस्य औदार्यांत आहे.

दिवसाचे क्षण आपण कसे घालवितो त्यावर आपल्या जीवनाची सांगता अवलंबून आहे. आपला दिवसभराचा कार्यक्रम, रात्रीच्या वेळीं

सहज आठवून पाहा. त्या कार्यक्रमांत श्रद्धेनें केलेली, भावपूर्णतेनें केलेली एखादी जरी घटना तुम्हांला आढळून आली तर त्यांत तुमच्या थोरपणाचें बीज आहे. पुढें प्राप्त होणाऱ्या सुखशांतीचें रहस्य आहे. मग कुणाला केलेली मदत, कुणाचें गोड शब्दानें केलेलें आश्वासन, ईश्वरानें सोंपवलेलें काम या भावनेनें पूर्ण केलेली ऑफिसांतील बाब असें या ना त्या तऱ्हेची कोणती का चांगली गोष्ट असेना! ती त्या दिव्य भावनेनें प्रेरित होऊन केलेली असावी. या दिवसभराच्या कार्यक्रमांतून घडलेल्या कांहीं वाईट गोष्टीहि असतील. कुणाला मत्सरानें टाकून बोलला असाल, कुणाचा हिरमोड केला असेल, कुणासंबंधानें क्रोध निर्माण झाला असेल. अशा वाईट गोष्टी कमी कशा होतील याचा विचार करावा व चांगल्या गोष्टींची वाढ करावी. अशा प्रयत्नांतून मिळणाऱ्या सात्त्विक सुखाची गोडी लागली कीं, तुम्हांला एक तऱ्हेची उमेद येईल, सामर्थ्य येईल. आध्यात्मिक दैनंदिनी ठेवा असें स्वामिजी कधीं कधीं म्हणतात याचा हाच उद्देश आहे.

पहांटे चारची वेळ चिंतनाला अनुकूल असते. ही वेळ झोपेंत काढणें हिताचें नसल्यानें स्वामिजींनीं आपल्या वीस सूचनांमध्यें या सूचनेला अग्रस्थान दिलेलें आहे.

१. पहांटे चारला उठा.
२. शौचमुखमार्जनानंतर सुखासनावर बसून अर्धा तास चिंतन करा. हा काळ शक्य तर आणखी वाढवावा. शीर्षासन व सर्वांगासन करा. मोकळ्या हवेंत थोडें फिरून या. थोडा प्राणायाम करा.
३. इष्ट मंत्राचा कमींत कमी १०८ वेळां तरी जप करा.
४. सात्त्विक आहार घ्या.
५. शक्य तर चिंतनाची खोली स्वतंत्र असावी.
६. शक्य तेवढा दानधर्म करा. रुपयांतील एक आणा तरी इकडे खर्च करा.
७. गीता, रामायण, उपनिषदें यांचें वाचन करावें.
८. शक्य तेवढें ब्रह्मचर्य-पालन करावें.

९. कांहीं अभंग, प्रार्थना पाठ म्हणाव्यात.
१०. मद्य, मांस, धूम्रपान, वाईट संगति यांच्यापासून दूर राहावें.
११. महिन्यांतून दोन दिवस उपवास करावा. फळें, दूध एवढाच आहार त्या दिवशीं घ्यावा.
१२. स्वतःसाठीं जपमाळ असावी.
१३. दिवसांतून दीड-दोन तास मौन पाळावें.
१४. थोडें बोला, मधुर बोला, खरें बोला.
१५. गरजा कमी करा.
१६. दुसऱ्याला दुखवूं नका.
१७. याचना करूं नका. स्वावलंबी व्हा.
१८. झोंपण्यापूर्वी हातून घडलेल्या चुकांची आठवण करा.
१९. मृत्यु केव्हांहि येऊं शकेल याची जाणीव ठेवावी.
२०. सकाळीं उठल्यावर व झोपीं जातांना देवाचें स्मरण करा.

स्वामिजींच्या वीस सूचना अशा स्वरूपाच्या आहेत. आजच्या काळांत महामृत्युंजय मंत्राचा जप अवश्य करावा असें त्यांचें सांगणें आहे. कुणाच्याहि वाढदिवशीं त्याचें अभिनंदन करतांना ते त्याला महामृत्युंजय मंत्र जपण्यास सांगतात. वीजा पडणें, आगगाडीचे व मोटारींचे अपघात, सर्पदंश, रोगभय, इलेक्ट्रिकचे झटके, यंत्रांचे अपघात इत्यादि गोष्टी आजच्या काळांत वाढल्या आहेत. जीवन अस्थिर व गुंतागुंतीचें झालें आहे. अशा वेळीं सुख, समृद्धि व स्वास्थ्य या दृष्टीनें महामृत्युंजय मंत्राचा जप आम्ही करणें जरूर आहे.

मृत्यु केव्हांहि येऊं शकेल असें एकदां ठसल्यानंतर कोणतीहि चांगली गोष्ट करण्यास सुरुवात करावयाची ती विनाविलंब करावयाची हें ओघानेंच आलें. Do it now हें एक स्वामिजींचें महत्त्वाचें पालुपद आहे. योगाच्या भिन्न भिन्न शाखांच्या विद्यार्थ्यांना व विद्यार्थिनींना आलेल्या अडचणी, त्यांना दिलेली शास्त्रीय दृष्टि व सूचना यांचा विचार येथें करण्याचें कारण नाहीं. सर्वसामान्य संसारी लोकांच्या दृष्टीनें त्यांनीं केलेलें मार्गदर्शनच या ठिकाणीं अभिप्रेत आहे.

आपणांला प्राप्त झालेली परिस्थिति आपल्या विकासाच्या अवस्थेला अनुकूल अशीच असते. कारण आत्म्याकडील ओढ हा आपला स्वधर्म—स्वभाव—आहे. आहे त्यापेक्षां चांगली परिस्थिति प्राप्त होण्यासाठीं आपण धडपडतो, अनेक तऱ्हेचे ताप सहन करतो. मनासारखी परिस्थिति प्राप्त न झाल्यानें नाउमेद होतो. दैवाला दोष देतो. कमी प्रयत्नानें चांगली परिस्थिति प्राप्त झालेल्याचा मत्सर करतो. स्वामिजी म्हणतात, "मित्रा, तुला मिळालेली परिस्थिति तुझ्या दृष्टीनें अत्यंत योग्य आहे. त्या कृपाळू जगन्नियंत्याची इच्छा तूं अशा परिस्थितींत राहावेंस अशीच आहे. त्यानें तुला जेवढी बुद्धि दिली, शक्ति दिली तिच्या साहाय्यानें करावयाचें कर्तव्य तूं केलेंस. यांतच तुला पूर्ण समाधान मिळालें पाहिजे. प्रयत्न करूनहि एखादी गोष्ट तुला मिळाली नाहीं तर ती न मिळण्यांतच तुझा भोगक्षय आहे, तुझें कल्याण आहे असें तूं समज."

अशा तऱ्हेच्या स्वामिजींच्या बोलण्यामुळें ते पुरुषार्थापेक्षां प्रारब्धालाच अधिक किंमत देत आहेत कीं काय असें कांहींना वाटतें; परंतु तसा प्रकार नाहीं. ईश्वरी योजनेनें सर्व कांहीं घडतें हें खरें, परंतु त्यानें आपणांस स्वतंत्रेच्छा दिली आहे. चांगलें-वाईट, श्रेय-प्रेय यांचा विवेक दिलेला आहे. जगांतील लौकिक सुखांच्या गाभ्यांतील दुःख ज्याला माहित झालें तो आपणहूनच योग्य मार्गानें प्रारब्धाच्या भोगक्षयाची कामना करतो. ईश्वरी योजनेखेरीज अन्य कोणतीहि गोष्ट माणसाच्या प्रयत्नांत व त्याच्या फलांत कांहीं बाधा आणूं शकत नाहीं हें सत्य पुरुषार्थी माणसाला उमेदच देणारें आहे. ईश्वरदर्शन देखील ईश्वरी कृपेनेंच शक्य होतें.

तिऱ्हाईताच्या भूमिकेनें जयापजय, लाभालाभ स्वीकारणें ही गोष्ट सुखाची नाहीं का? खरें शहाणपण ज्याला प्राप्त झालें त्यालाच या गोष्टींतील सुख आकळेल. लौकिक सुखाची कोणतीहि कांक्षा म्हणजे अहंतेचाच आविष्कार आहे. मग ती कांक्षा शब्दांत प्रगट झालेली असो, विचारांत असो वा कृतिरूपानें व्यक्त झालेली असो. शास्त्राला सोडून नसलेल्या गोष्टीच्या प्राप्तीचा प्रयत्न प्रत्येकानें करावयालाच हवा. अशाच तऱ्हेचा प्रयत्न जो करतो त्याला ईश्वरी साहाय्य मिळतें. आणि म्हणूनच

जन्मापासून मरेपर्यंत 'स्वप्रयत्न' हें कोणाहि व्यक्तीच्या जीवनाचें सूत्र बनलें पाहिजे.

अपमान सहन करा, दुःख सहन करा (Bear injury. Bear insult), हें त्यांचें आणखी एक महत्त्वाचें सांगणें आहे. नैतिक सामर्थ्य, आत्मिक शक्ति, ईशकृपा प्राप्त करून घेण्याचा हा मार्ग आहे. राग, द्वेष, सूड इत्यादि गोष्टी मनांत आणून आपलें दिव्य स्वरूप, आपली उच्च भूमिका विसरूं नका. अशा तऱ्हेनें स्वतःचा उपहास करून घेणें चांगलें कसें होईल? हातून एखादी चुकीची गोष्ट घडली तर त्याबद्दल वाईट वाटून घ्या. पुन्हां तसें न करण्याचा निश्चय करा. सावध राहा; नामस्मरण नेहमीपेक्षां अधिक करून त्याबद्दल स्वतःला शासन करा.

नामस्मरणासारखी सुखाची प्राप्ति सुलभ करून देणारी गोष्ट नीट समजून घ्या. नाम आणि स्मरण यांतील स्मरणाकडे कांहींचें लक्ष असत नाहीं. तोंडानें यंत्राप्रमाणें नाम मात्र घेतलें जातें हें ठीक नाहीं. नाम घेतांना हातून वाईट कृति व मनांत वाईट भाव ही किती असमंजसपणाची गोष्ट आहे! ऐहिक गोष्टींतून प्रतीत होणारें परमेश्वराचें प्रेमस्वरूप, विहित गुणांचें चिंतन, अशा कांहीं गोष्टींनीं त्या वेळीं अंतर भरून आलें पाहिजे. आश्रमांत गप्पा मारीत बसलेले बाहेरचे कांहीं लोक पाहिले कीं, लगेच 'Take Lord's name' (देवाचें नांव घ्या.) असें त्यांना सांगितल्याखेरीज राहावत नाहीं.

गुरुबाजीच्या नादीं लागलेल्या आजच्या साधुसंन्याशांबद्दल त्यांच्या मनांत कांहीं निश्चित कल्पना आहेत. अशा लोकांनीं समाजाला भारभूत ठरावें ही गोष्ट त्यांना शोचनीय वाटते. आपल्यापेक्षां कमनशिबी असलेल्या लोकांच्या सुखदुःखाशीं त्यांनीं समरस व्हावें. लोकांच्या चारित्र्यसंवर्धनाला साहाय्य करण्याचें फार मोठें काम त्यांना करतां येण्यासारखें आहे. शाळाकॉलेजांतून, तुरुंगांतून, दवाखान्यांतून व इस्पीतळांतून त्यांनीं अधूनमधून जावें. व्याख्यानें, प्रवचनें, कीर्तनें करावींत. वीतभर पोट कसेंहि भरेल नि अंगभर कपडाहि मिळणें कठीण नाहीं. आपल्या किमान गरजा पूर्ण करणारा तो राम समर्थ आहे. त्याची चिंता करण्याचें कारण

नाहीं. विकासाकडे नेणारा जीवनांतील कोणताहि बदल पत्करण्यास सर्वांनीं सदा तयार राहिलें पाहिजे. नाशवंत गोष्टीवरील श्रद्धा ही मुख्य चूक आहे. ती दूर केली पाहिजे. मनानें आणि शरीरानें सतत कार्यरत राहण्यानें विकारापासून मुक्ति सुलभतेनें मिळूं शकते. मनावर ज्या प्रमाणांत अधिक स्वामित्त्व, त्या प्रमाणांत सुख विश्रांति अधिक, ही आजवर मोठ्या लोकांनीं स्वानुभवानें दिलेली शिकवण आहे.

सर्वांना उपयोगी पडेल अशी छोट्या सूत्रांतून स्वामिजींनीं दिलेली शिकवण वाचकांच्या सोयीच्या दृष्टीनें खालीं विभागशः दिली आहे.

१. **साधनेंतील प्रगतीचे टप्पे** :– परिस्थितीशीं मिळतें घे; सेवा कर. सर्वांविषयीं प्रेम ठेव; शक्त्यनुसार दान कर; मन शुद्ध व विशाल कर; ध्यान कर नि अमृतानुभव प्राप्त करून घे.

२. **शोध आणि मिळव** :– आत्म्याचा शोध घे; न संपणाऱ्या सुखाची इच्छा कर; सत्यप्राप्तीसाठीं प्रयत्न कर; सर्वत्र ईश्वर पाहा; जो सोशिकपणानें कष्ट करतो तो मिळवितो.

३. **देव आणि मानव** :– मनुष्य देवत्व मिळवूं शकतो; देव मनुष्यावतार घेतो; मानव कृतींचा विचार करतो; देव कृतीमागील हेतु लक्षांत घेतो.

४. **मनाचें नियंत्रण** :– मनाला पारख; मन शांत ठेव; मनाचें निरीक्षण कर; मन शुद्ध ठेव; मनाला शिस्त लाव; तें प्रभुचरणीं गुंतव; मनानेंच हें जग निर्माण केलें आहे; मनाचें बाहेरचें भटकणें थांबव; शांत मन हा तुझा शिक्षक आहे; शुद्ध मनाचें तेज चेहऱ्यावर स्पष्ट होतें.

५. **ध्यान कर** :– त्या प्रणवाचें ध्यान कर; ही गोष्ट अत्यंत समजुतदारपणानें नि गंभीरपणानें कर; ध्यान नियमित कर; ध्यानांतूनच तो प्रगट होईल; त्या अज नि अमर आत्म्याचें ध्यान कर.

६. **सत्याचा अनुभव घेण्याच्या पद्धती**:– ध्यान कर; सत्य अनुभवलें पाहिजे हें लक्षांत ठेव; सत्याला धैर्यानें तोंड देण्याची तयारी हवी; सत्य हाच तुमच्या जीवननौकेचा सुकाणू असावा; तर्क सत्यापर्यंत पोचूं शकत नाहीं; तें प्रतिभेनें ( Intuition ) समजून घे; सत्याचा स्पर्श

तुझ्या मनाला सातत्यानें होत राहावा; तुझ्या बोलण्यांतून त्याचाच आविष्कार व्हावा; तुझ्या कृतींतून त्याचीच प्रभा पसरावी.

७. **आत्म्याचें स्वरूप:**– तो अमर आहे; तो दु:खरहित, पापरहित व वासनारहित आहे; तो सर्वव्यापी आहे; तो सर्वसाक्षी आहे; तो अकर्ता व अभोक्ता आहे; तो नित्यमुक्त आहे; तो केवलानंद आहे; तो स्वस्वरूप आहे; आत्मा म्हणजे दिव्य जाणीव; आत्म्याखेरीज कांहींच नाहीं; आत्म्याचा शोध घे; तोच अमर आत्मा हें तुझें स्वरूप आहे; त्याचें ज्ञान करून घे नि कर्मफलांतून मुक्त हो.

८. **वेदान्त:**– वेदान्त ही एक जगण्याची पद्धति आहे; वेदान्त ही आत्मज्ञानाची गुरुकिल्ली आहे; वेदान्त आचरणांत आण; विवेक आणि वैराग्य वाढीव; त्याग हें शहाणपण होय; साधन-चतुष्टयानें संपन्न हो; या लहान 'मी'ला विसरून मोठ्या 'मीं'त विलीन हो; आणि त्या अनंतत्वाचा अनुभव घे.

९. **वेदान्ताचा व्यवहार:**– मनानें पाशरहित हो; आसक्ति ठेवूं नको; साऱ्या ऐहिक पाशांच्या पलिकडे जा; समत्वदृष्टि असूं दे; जननिंदेची पर्वा करूं नकोस; भेद आहे तेथें भीति आहे; एकत्व–अद्वैत हें सत्याचें स्वरूप आहे; स्वसमर्थनाची संवय टाकून दे; अहंकार टाक; मौन पाळ; स्वयंकेंद्रितता कमी कमी कर; इंद्रियसुखापासून सावध रहा; झोंप म्हणजे समाधि नव्हे; वर्तनांत विवेक नि विचार हवा; 'मी कोण आहे?' हा प्रश्न तुला पडावा; विचार कर नि मनन कर; जग हें मन:कल्पित आहे; सत्संगानें ज्ञानप्राप्ति होते; बुद्धि तेजस्वी कर; अंतर्मुख हो; मनाच्या पलीकडील प्रांतांत जा; वासना टाकून दे; जाणीवेच्या विशाल क्षेत्रांत भरारी मार; प्रतिभेच्या प्रांतांत रहा; तर्क हा अपुरा आहे, तो टाकून दे; इच्छाशक्ति बलवान् कर; तूं ज्ञानस्वरूप आहेस हें लक्षांत ठेव.

१०. **अज्ञानाचें स्वरूप:**– विकार अज्ञानामुळें उद्भवतात; विकारानें आत्मबल कमी होतें; आसक्ति हा एक प्रकारचा मृत्युच; दुबळेपणा हें पाप होय; परावलंबन हें दु:ख आहे; भीति संसर्गजन्य आहे; खोटेपणा धोके देणारा आहे; संकुचितपणा दु:खाकडे नेतो; विशालता हें सुखाचें

उगमस्थान होय; सत्ता ही मद्याप्रमाणें आहे; चैन ही शापाप्रमाणें आहे; यतिवृत्ति हा आशीर्वाद आहे; आजची चैन ही उद्यांची गरज होते; कुतूहलानें अस्वस्थता येते; ज्ञानाचा शोध कर; अज्ञान नाहींसें कर.

११. **वैराग्य आणि संन्यासः**– वैराग्यांत शहाणपण आहे; वैराग्यांत शक्ति आहे; संन्यास म्हणजे जबाबदारी टाळण्याचा मार्ग नव्हे; गतिशील व्यक्तिमत्त्वाची प्राप्ति करून देणारा तो एक सद्गुण आहे; अनासक्ति हीच थोरवी.

१२. **अमृतत्त्व देणारी शांतता**:– एकांतस्थानाची प्राप्ति ही साधनेला पूरक आहे; शांततेची सोबत ही आत्मोन्नतीला पूरक आहे; शांततेची सोबत ही इच्छाशक्तीच्या वाढीला अनुकूल आहे; शांत वातावरणांत राहा; त्या अमर आत्म्याचें चिंतन कर; सर्वत्र अभेद दिसणें हेंच अमृतत्त्व; आपल्या जीवनाचा अंतीम हेतु त्या अमृतत्त्वाची प्राप्ति हाच आहे.

१३. **भक्ति**: गौरांगाप्रमाणें कीर्तन कर; राधेप्रमाणें त्याचें नाम गा; प्रल्हादाप्रमाणें त्याची प्रार्थना कर. मीरेप्रमाणें त्याच्या विरहामुळें रड; भक्तीचें अमृत पी; ईश्वराला संपूर्णपणें शरण जा; त्याचें नांव लिही; त्याचेच मंत्र उच्चार. त्याची कृपा प्राप्त करून घे. त्याच्याच इच्छेची प्राप्ति करून घे. त्याचेंच नाम आठव; नाम ही शक्ति आहे; तें बलवर्धक आहे; नामाचाच आश्रय घे; स्वतःच्या सार्‍या गोष्टी त्याला अर्पण करण्यांतील आनंद लूट; अशा आत्मनिवेदनाखेरीज विकास नाहीं.

१४. **संकीर्तन**:– संकीर्तनामुळें मनांतील भाव बदलतात; संकीर्तनामुळें मनांतील निषिद्ध विचार नाहींसे होतात; संकीर्तनानें उमेद नि उत्साह प्राप्त होतो; जीवनशक्ति मिळते.

१५. **श्रद्धा आणि भक्तिः**– श्रद्धेंत फार मोठी शक्ति आहे; श्रद्धेनें आश्चर्यकारक कामें होऊं शकतात; पूर्ण श्रद्धा ठेव; भक्ति वाढीव; भक्तीविना जीवन व्यर्थ आहे; भक्तीनें जीवन समृद्ध बनतें; भक्ति म्हणजे धर्मवेडेपणा वा अंधळें पंथप्रेम नव्हे; भक्ति म्हणजे भावनांची भरतीहि नव्हे; भक्ति म्हणजे उत्कट आत्मिक प्रेम.

१६. **प्रार्थना आणि आत्मनिवेदन**:- कळकळीनें प्रार्थना कर; प्रार्थना म्हणजे याचना नव्हे; प्रार्थनेनें चित्तशुद्धि होते; उत्कटतेनें प्रार्थना कर; प्रार्थनेनें आत्मोन्नति होते; तुझें सारें जीवन त्याला अर्पण कर; सारीं कर्में त्याला अर्पण कर; कर्मफलें त्याला अर्पण कर; प्रभुनामाचा आश्रय घे नि त्याचाच आशीर्वाद घे.

१७. **सेवेचीं क्षेत्रें**:- आजाऱ्यांची शुश्रूषा कर; भुकेलेल्याला अन्न दे; वस्त्रविहीनाला पांघर; त्रस्तांचें सांत्वन कर; परिस्थितीनें अडलेल्याला वाट करून दे; उदासीनाला व अस्वस्थाला हंसव.

१८. **सेवा योग** :- सेवा हा मोठा योग आहे; सर्वांतील परमेश्वराची सेवा कर; तुझ्या प्रत्येक कर्मामागील प्रेरणा ही त्याच्याच करितां आहे असें समजून वाग; सेवेनें चित्तशुद्धि साधून घे; मानवाचा सेवेकरी हो; सेवेनें कुणी पाशबद्ध होत नाहीं; केवळ बोलाची सेवा नको; कोणतीच सेवा कनिष्ट असत नाहीं; सर्व प्रकारची सेवा पवित्र असते.

१९. **दान** :- दान कर; दानानें तूं गमावत कांहींच नाहींस; औदार्याची जोपासना कर नि लोभ नाहींसा कर; दानानें अनेकांचे आशीर्वाद मिळतात; दानानें सद्‌गुणांच्या वाढीला अनुकूलता प्राप्त होते; दानानें हृदय विशाल बनतें; दानानें आत्मोन्नतीच्या मार्गांत प्रगति होते.

२०. **विचार साधना** :- योग्य तऱ्हेनें विचार करणें म्हणजेच खरी साधना; विचार ही मोठी शक्ति आहे; विचाराला वेग आहे; प्रत्येक विचार नीट नीहाळ; विचारांना शांत कर; तुझे विचार तूं नीट समजून घे; मनांत नेहमीं उदात्त विचार वागीव.

२१. **स्वतःला सुधार** :- वाईट प्रवृत्तींपासून स्वतःचा बचाव प्रथम कर; स्वतःच्या चुका सुधार; तुझे हेतू तूं नीट समजून घे; क्रोधासारखी आपत्ति नाहीं; द्वेषासारखा दुर्गुण नाहीं; विषयवासनेसारखी आग नाहीं; शिवीसारखें शस्त्र नाहीं; या साऱ्यांपासून दूर रहा.

२२. **शिस्त आणि चारित्र्य** :- कुणाला दुखवूं नकोस, विसर आणि क्षमा कर; शिस्तीनें चारित्र्य संवर्धन होतें; प्राणशक्तीची जपणूक कर; शुद्ध मनाचे विचार ऐक नि ते आचरणांत आण; जीवनाच्या प्रत्येक

क्षेत्रांत शिस्तीचें संवर्धन कर; व्यक्तिमत्त्वाचें तेज आणि बल वाढवीत जा; संयमाची बैठक बळकट ठेव.

२३. **सामाजिक जीवनांतील शहाणपण :**— दुसऱ्याचे दोष हुडकीत जाऊं नकोस; चांगल्या लोकांच्या सहवासांत अस; सदिच्छेचें संवर्धन कर; निरक्षरांना साक्षर कर; अडाण्यांना मार्गदर्शन दे.

२४. **नैतिक प्रगति :**- हेतुशुद्धता साध; शुद्ध अन्न घे; चांगलें तें ऐक; चांगलें तें कर; चांगलें तें बोल; इंद्रियांना शिस्त लाव; निंदा सहन कर; तुझे दोष तूं नीट समजून घे; ते दोष नाहींसे करण्याचा प्रयत्न कर; कसोट्यांना उतर; धीरपुरुष हो.

२५. **आत्मसंयमन:**— नम्रतेनें अभिमानाला जिंक; प्रेमानें क्रोधाला जिंक; सोशिकतेनें क्रोधाला जिंक; धैर्यानें भित्रेपणा घालीव; आत्मनिवेदनानें अहंकार घालीव; वेदान्ताच्या विचारानें भीतीला जिंक; दानानें लोभाला नष्ट कर.

२६. **दुर्गुणांचे परिणाम:**— स्वार्थबुद्धीनें प्रगति खुंटते; वासनांनीं शांति-समाधान नाहींसें होतें; उतावीळपणामुळें नुकसान होतें; विषयसेवनानें आयुष्य क्षीण होतें; वाईट संगतीनें अधोगति होते; दुटप्पी वर्तनानें निष्ठा निर्माण होत नाहीं नि विवेकबुद्धीची बोंचणी लागते; चंचलतेनें नि निर्णय घेण्याच्या शक्तीच्या अभावामुळें अपयश येतें; गोष्टीवेल्हाळपणामुळें मनुष्य कुचेष्टेला पात्र होतो.

२७. **अगदीं साधा उपदेश:**— शांत राहा; प्रामाणिक राहा; नम्र राहा; उत्साही राहा; बालवृत्तीचा बन; सश्रद्ध अस.

२८. **योग आणि विचार :**— सातत्यानें योगाचरण कर; हुशारीनें प्रगति कर; नियमानें ध्यान कर; दिव्य जीवन जग; काळजीपूर्वक विचार कर; खरेपणानें विचार कर; विचारांत उत्कटता असूं दे.

२९. **विश्रांति :** भरपूर मोकळेपणानें विश्रांति घे; श्वासोच्छ्वासांत ताल असूं दे; जगण्यांतील मौज चाख; आनंदानें सेवा कर.

३०. **अनिष्ट प्रवृत्तींचें नियंत्रण :**— द्वेष करूं नकोस; चिंता करूं नकोस; पैशाचा लोभ करूं नकोस; दुसऱ्यांना सतावूं नकोस; गट करूं

नकोस; अश्लील बोलूं नकोस; कुणाला दोष देऊं नकोस; लांच घेऊं नकोस; सत्तेचा हव्यास धरूं नकोस; हातांतील कामापासूनच्या मोकळिकीचीच वाट पाहूं नकोस; संधी गमावूं नकोस; कोणत्याहि जीवाचा घात करूं नकोस; कोणतीहि अनिष्ट गोष्ट करूं नकोस.

**३१. जीवन आणि अध्यात्म** :– जीवन ही एक दीर्घ प्रार्थना आहे; विकसित होत जाणें म्हणजे जीवन; जीवनांत अनेक अनुभवाचे धडे घ्यावयाचे असतात; पूर्ण जीवनासाठीं अध्यात्माची उत्कंठा हवी; आत्मिक शक्ति हीच खरी शक्ति; कष्टाचें जीवन जग; दृढनिश्चय कर; निश्चित ध्येय ठेव; विवेकपूर्वक निश्चित केलेले प्रयत्न मोठ्या धैर्यानें कर; परमेश्वराची प्राप्ति इथेंच आणि आतांच करून घे.

याचि जन्मीं येणेचि काळें । संसारीं होईजे निराळें ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥ श्रीसमर्थ ॥

**३२. आनंदाचीं उगमस्थानें** :– दुःखांत आनंद घे; दुःखानें हृदय करुणापूर्ण बनतें; दुःखानें स्वभाव शुद्ध होतो; दुःखें सहन कर; दयेपासून आनंद घे; दानापासून आनंद घे; सत्यापासून आनंद घे; साधनेतून आनंद घे; अंतर्यामीकडून आनंद घे; आनंद म्हणजे पूर्णता.

**३३. वेळेचें मोल**:– वेळेचा व्यर्थ व्यय करूं नकोस; वेळ म्हणजे जीवन; वेळेचा फायदा करून घे; वेळ जलद पळते आहे; उद्यां कधींच उजाडत नाहीं; जें करावयाचें तें आतां कर; भूतकाळ विसरून जा; वर्तमानांतच वावर.

**३४. धैर्याचे धडे** – सर्व कांहीं शक्य आहे; जगांत अशक्य असें कांहिंच नाहीं; जाड्य नाहींसें कर नि जागा हो; कशाचीच भीति धरूं नकोस; भीतीची काल्पनिक पिशाच्चें नाहींशीं कर; प्राप्त कार्यासाठीं परमेश्वराचा आशीर्वाद माग.

**३५. धर्म** – धर्म म्हणजे परमेश्वराचा साक्षात्कार; धर्म म्हणजे भीतीपासूनची मुक्तता; धर्म म्हणजे केवळ विश्वास वा श्रद्धा नव्हे; संयम म्हणजे धर्म, सत्य हाच धर्म, धर्म म्हणजे सदाचार; धर्माची उभारणी प्रेमावर आहे; धर्माचा आविष्कार सेवेंत आहे; धर्माविना जीवन म्हणजे मृत्युच; दुराचार टिकूं शकत नाहीं; शाश्वत धर्माचें पालन कर.

* * *

# कार्य

★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★ ★

आतांपर्यंतच्या प्रकरणांतून स्वामिजींच्या कार्याची थोडीबहुत कल्पना कुणालाहि येण्यासारखी आहे. अध्यात्म-विद्येचें खरें स्वरूप स्पष्ट करणें आणि त्या विद्येचा जगभर प्रसार करणें या गोष्टीसाठीं त्यांनीं सर्व तऱ्हेची शिक्षणाचीं साधनें हाताळलीं आहेत. उपनिषदांतील तत्त्वज्ञानांतून उगम पावलेली भिन्न भिन्न विचारसरणी आणि काळानुरूप जन्माला आलेले कांहीं वाद यांतून स्वामिजींच्या प्रत्ययाला आलेला एकजिनसी अर्थ जसा व्यक्तिविकासाला तसाच समाजविकासाला अनुकूल दृष्टि देणारा आहे.

केवलाद्वैताची शिकवण उपनिषदांतून व्यक्त झालेली आहे. उपनिषदांतून कित्येक ठिकाणीं वरवर विरोधी वाटणाऱ्या परंतु या दृश्य अनेकत्वामागील एकत्वाचेंच स्पष्टीकरण करणाऱ्या विधानांचा सुसूत्र अर्थ भगवान् व्यासांनीं लावला. परंतु त्यांनीं यासाठीं लिहिलेला ब्रह्मसूत्र हा ग्रंथच वादाचा विषय बनला. श्री शंकराचार्य, रामानुजाचार्य, मध्वाचार्य, निंबारकाचार्य, वल्लभाचार्य या वेगवेगळ्या व्यक्तींच्या वेगवेगळ्या विचारसरण्या उदयाला आल्या. हीं सर्व माणसें सत्याची प्राप्ति करून घेतलेलीं व विविध प्रवृत्तींच्या लोकांना जवळचा मार्ग दाखवून देण्यासाठीं व त्यांचें दुःखमूल अज्ञान नाहींसें करण्यासाठीं आंसावलेलीं होतीं. विविध लोकांच्या विविध वृत्तींना मानवणारी व त्यांच्या विकासाला अनुकूल अशी त्या सत्याकडील वाटचाल

त्यांनीं शोधून काढली त्याचें कारण केवळ त्यांच्या मनांत लोकांच्याबद्दल असलेली कणव व प्रेम होय. परंतु त्यांच्या या भूमिकेची नीट समजूत जनमनांत राहूं शकली नाहीं. आणि म्हणूनच कीं काय, ही भूमिका जनमनांत पुन्हां एकदां दृढमूल करण्यासाठीं आधुनिक काळांत रामकृष्ण, विवेकानंदासारखे साक्षात्कारी सत्पुरुष निर्माण झाले.

ब्रह्मसूत्रावर भाष्य लिहितांना स्वामिजी लिहितात, केवलाद्वैत, अद्वैत, द्वैत, विशिष्टाद्वैत इत्यादि जीव, शिव, जगत् यांचे परस्पर संबंध स्पष्ट करणाऱ्या विचारसरण्या म्हणजे योगाच्या मार्गांतील पायऱ्या आहेत. केवलाद्वैताचा अनुभव ही त्यांतील वरची पायरी आहे. भिन्न भिन्न प्रवृत्तीच्या लोकांसाठीं भिन्न भिन्न अशा ह्या विचारसरण्या आहेत. एकाची साधकावस्था दुसऱ्याच्या अवस्थेपासून भिन्न असणारच. कुणांत तार्किकपणा अधिक तर कुणांत भावनेचा अंश अधिक तर कुणाची कर्म-प्रवृत्ति जबरदस्त; असें हें असावयाचेंच. विचारसरणींतील विविधता अशा ह्या विविध लोकांच्या गरजेसाठीं आहे. प्रत्येकाचें साध्य एकच आहे. तीच गोष्ट सगुण व निर्गुण उपासनेबाबतची; दोन्ही उपासना सारख्याच महत्त्वाच्या आहेत. वासनाक्षय व सुखाची प्राप्ति जशी सगुण उपासनेनें होऊं शकतें तशीच ती निर्गुणोपासनेनें होऊं शकते. माणसाला वासनेपासून मुक्तता हवी आहे एवढेंच. मीरा (भक्त) आणि मदालसा (वेदान्ती) ह्यांचा श्रेष्ठपणा सारख्याच तोलाचा आहे.

सगुणोपासनेंतील मतभिन्नता अशीच निरर्थक आहे. शिव, हरि, देवी हीं त्या ईश्वराचींच भिन्न भिन्न स्वरूपें आहेत. स्वामिजींची भिन्नतेंतून एकता, संघर्षांतून शांति, विसंगतींतून संगति प्राप्त करून देणारी विचार-सरणि जशी कालानुरूप महत्त्वाची तसेंच त्या विचारसरणीच्या प्रसाराचें त्याचें कार्यहि तेवढेंच मोलाचें आहे. Seek harmony हें त्यांचें जीवना-नुगामी दृष्टि देणारें आवडतें सूत्र आहे.

दुसऱ्या महायुद्धानंतर उध्वस्त जीवन झालेल्या अनेक पाश्चिमात्य स्त्रीपुरुषांना त्यांनीं जीवनरस पोहोंचविला आहे. ज्या अवीट सुखाची इच्छा तुम्ही करीत आहांत तें तुमच्याजवळच आहे. व तुम्हांला

भीतीपासून मुक्त व्हावयाचें आहे असें नव्हे तर तुम्हीं भीतीपासून मुक्त आहांतच हा अनुभव आणून देणाऱ्या विचारसरणीचें ज्ञान त्यांनीं किती अधीरतेनें करून घेतलें असेल याची कल्पनाच करणें बरें ! हा अनुभव घ्यावयाचा कसा ? योगानें ? योग म्हणजे काय ? विस्तवावरून चालणें का जमिनींत पुरुन घेणें ?

योग म्हणजे मनाचें नियंत्रण, निषिद्ध गोष्टींचें निर्मूलन आणि विधिपर गोष्टींच्या एकाग्र चिंतनानें नि सृष्टीला आधारभूत अशा त्या अमर आत्म्याच्या ध्यानानें तो अनुभव घेणें. अशा तऱ्हेनें भारतीयांबरोबर परदेशीयांनाहि योगाचा नुसता श्रीगणेशा देऊन नव्हे तर वैयक्तिक मार्गदर्शनानें त्यांची पायरीपायरीनें उत्क्रांति त्यांनीं घडवून आणली. आजच्या अश्रद्ध माणसाला अध्यात्माची गोष्ट निवांतपणें समजून घ्यावी असें वाटत नाहीं. त्याचें मन एक वेळीं एखादें मिनिटच या गोष्टीचा विचार करील. मग अध्यात्मपर ग्रंथांचें अध्ययन नि चिंतन तो काय कपाळ करणार? एका मिनिटांतच इंजेक्शन ठोकून दिलें पाहिजे. स्वामिजींची छोटीं छोटीं सूत्रें हीं अशी परिणामकारक इंजेक्शन्स् आहेत. वैयक्तिक मार्गदर्शनासाठीं प्रत्येक पृच्छकाचा पत्ता ते काळजीपूर्वक टिपून ठेवतात. या बाबतींत देशधर्मजातिनिरपेक्ष दृष्टि त्यांनीं ठेवली आहे. गीतेंत म्हटलें आहे, ‘ तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया;’ परंतु स्वामिजींनीं विचारल्याशिवाय, शंका निर्माण झाल्याशिवाय अनेकांना ज्ञान दिलें. पात्र-अपात्र, आर्त-उदासीन हे भेद लक्षांत न घेतां त्यांनीं हें ज्ञान दिलें. आणि या ज्ञानाच्या आचरणस्वरूप अभिव्यक्तीची गरज अनेक तऱ्हेनें स्पष्ट केली. ‘ येथून ( जर्मनींतून ) आश्रमासाठीं एक पैहि पाठविता येण्यासारखी वस्तुस्थिति नसतांना जर्मनींतील पृच्छकांना स्वामिजींनी जें मार्गदर्शन केलें नि करीत आहेत तें कार्य दिव्य म्हणावें लागेल,’ असें एका जर्मन पंडितानें काढलेले उद्‌गार अध्यात्म विद्येच्या प्रसाराची स्वामिजींची उत्कटता दर्शविणारे आहेत. त्यांच्या दिव्यजीवन संघाच्या जगभर पसरलेल्या शाखांचें कार्य मोठें प्रभावी ठरलें आहे. दिवसानुदिवस त्यांची संख्या व

व्याप वाढता आहे; परंतु स्वामिजी या बाबतींत पूर्ण अनासक्त आहेत.

"परमेश्वरी योजनेनें या संस्था निर्माण झाल्या. त्याची इच्छा असेल तर यांची काळजी तो घेईलच. उद्यां जरी या संस्था नष्ट झाल्या तरी मला माझें सेवेचें कार्य थांबविण्याचें कांहींच कारण नाहीं. मी एखाद्या कुटींत राहीन. आजाऱ्यांना उपचार करीन. मिळालेल्या थोड्याबहुत पैशांतून छोट्या पुस्तिका प्रसिद्ध करीन नि त्या वांटीत राहीन."

अशा तऱ्हेनें संपूर्ण निर्मम व उदासीन राहून अध्यात्मविद्येच्या निती प्राप्त करून घेण्याच्या व्यावहारिक पद्धतीच्या प्रसाराचें कार्य त्यांनीं अव्याहत चालूं ठेवलें आहे.

कृत्रिम उपग्रहनिर्मितीच्या या काळांत स्वामिजींचें हें आध्यात्मिक मूल्यांच्या जोपासनेचें, प्रसाराचें नि त्याचें व्यावहारिक मूल्य कालोचित पद्धतीनें स्पष्ट करणारें व अनेकांना त्याचा अनुभव आणून देणारें कार्य मोठेंच मानावें लागेल.

* * *

अनुक्रम

# शंका-समाधान

हें प्रकरण वाचकांना जिव्हाळ्याचें नि जवळचें वाटेल. यांत विविध लोकांच्या विविध शंकांना स्वामिजींनीं दिलेली उत्तरें समाविष्ट केलीं आहेत. स्वामिजींच्या उत्तराबरोबरच पृच्छकांचे प्रश्नहि दिलेले आहेत.

**प्रश्न** :— प्रगतीच्या मार्गावर स्खलन, प्रमाद कां असावेत ?

**उत्तर** :— याला कारण वासना. त्या जोपर्यंत चित्तशक्ति द्विधा करीत आहेत तोपर्यंत प्रगति नाहींच. वासनाबळाच्या प्रमाणांत अधोगति व्हावयाची.

परंतु हे प्रमाद, ही अधोगति, व्यक्तीच्या उत्क्रांतीच्या प्रक्रियेंत असणारच. एरवीं दया, सहानुभूति, पश्चाताप या हळुवार भावनांना अवसरच मिळणार नाहीं. अशा प्रमादामुळेंच व्यक्तीला आपले दोष चांगल्या तऱ्हेनें कळून येतात व ते सुधारण्याची संधि मिळते. यामुळें साधक अधिक अंतर्मुख होतो नि जीवनांतील खरें साध्य समजून घेऊन योग्य मार्गाचा अवलंब करतो. असे हे प्रमाद नि अशी ही स्खलनशीलता हे तूं एक प्रकारचे आशीर्वादच मान.

**प्रश्न** :— प्रमादरहित नि स्खलनरहित उन्नति असूं शकणार नाहीं काय ?

**उत्तर** :— बिलकूल नाहीं. जीवनाचा हेतु नि पूर्णता प्राप्त करून घेण्याच्या पद्धती स्वतःच जाणून घेण्याच्या दृष्टीनें त्यांची जरूरी आहे.

चांगलें कोणतें हें पाहिल्यावर 'तथाकथित' वाईट काय तेंहि कळलें पाहिजे. वाईट गोष्ट चांगल्याच्या गौरवाकरितांच आहे. लौकिक जीवनांतील व्यवहार जोपर्यंत जीवाला बाधक आहेत तोपर्यंत या दोन्ही-पासून त्याची सुटका नाहीं. सहजप्रवृत्तींचा लगाम हातीं घेऊन या दोहोंच्याहि पलिकडे जा. मग पुन्हां अधःपतनाचें भय उरणार नाहीं. सर्व तऱ्हेच्या वैयक्तिक कांक्षापूर्तीसाठीं बलवान् इच्छाशक्ति प्राप्त करून घे.

**प्रश्न** :– नैतिक उत्क्रांति आणि आध्यात्मिक क्रांति या दोहोंत फरक कोणता ?

**उत्तर** :– व्यक्तीच्या अंतर्यामांतील अशी प्रक्रिया कीं, जीमुळें त्याच्यांत आत्मप्राप्तीसाठीं अमूलाग्र परिवर्तन होतें, त्याला आध्यात्मिक स्वरूपाची क्रांति म्हणतां येईल. आत्मविचार, प्रापंचिक आपत्ति, दुःसाध्य रोगांची बाधा, गुरुकृपा इत्यादिमुळें असा बदल मनुष्यांत होतो. तो चिरस्थायी स्वरूपाचा असतो.

माणसाच्या अंतःकरणांतील अशा कांहीं विचारांचा उद्‌भव कीं, ज्यामुळें तो सत्याच्या मार्गावरील वाटचालीसाठीं उद्युक्त होतो त्याला नैतिक उत्क्रांति म्हणतां येईल. यम ( अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य अपरिग्रह ) व नियम ( शुचिता, तप, स्वाध्याय आणि ईश्वर-प्रणिधान ) यांचा समावेश नैतिक साधनेंत होतो. नैतिक उत्क्रांतीमध्यें स्खलनशीलता कांहीं अंशीं संभवनीय असते. परंतु आध्यात्मिक स्वरूपाच्या परिवर्तनांत या गोष्टी असत नाहीत. आध्यात्मिक जीवनाची आवड नैतिक उत्क्रांतीनें हळुहळू निर्माण होते. आध्यात्मिक परिवर्तन म्हणजे आध्यात्मिक जीवनाची ओढ एकाएकींच निर्माण होते. असें हें आध्यात्मिक परिवर्तन हें नैतिक उत्क्रांतीचेंहि फलित असूं शकतें. नैतिक उन्नति हा तर आध्यात्मिक परिवर्तनाचा पायाच आहे. नैतिक स्थिरता आल्याखेरीज जीवनदृष्टींतील स्थायी स्वरूपाचा बदल घडवून आणणारें हृदयपरिवर्तनहि शक्य नाहीं.

प्रत्येक महिन्याला नियमानें तुझी आध्यात्मिक डायरी मजकडे पाठीव. जी कांहीं थोडीबहुत साधना करतां येणें शक्य आहे ती कर. बौद्धिक अज्ञानाच्या चिखलांत गुंतू नकोस. संघर्षाला धैर्यानें तोंड दे. तुला माहित

असलेल्या आध्यात्मिक शिकवणीच्या आचरणानें तुझी प्रगति होईल व शंकानिरसनहि होईल.

अधिक जप कर. ध्यानाची बाब अत्यंत महत्त्वपूर्ण मान. विरक्ति वाढव. वैराग्याचा विचार देणारीं पुस्तकें नि संतचरित्रें पुनःपुनः वाच.

**प्रश्न :**– सत्याग्रहाविषयीं तुमच्या कोणत्या कल्पना आहेत ?

**उत्तर :**– अहिंसात्मक साधनांनीं सत्तेला विरोध करून न्याय्य गोष्टींची प्राप्ति करून घ्यावयाची हा सत्याग्रहाचा एक अर्थ सर्वांना माहितच आहे. आध्यात्मिक दृष्टीनें सत्याग्रहाला याहिपेक्षां अधिक अर्थ आहे. रोजच्या आहारांतील तिखट, मीठ, कांदा या गोष्टी साधनेच्या दृष्टीनें कांहीं आठवडे तुम्ही वर्ज्य केल्या तर तो सत्याग्रहच होईल. अशा स्वरूपाचा हा सत्याग्रह म्हणजे इच्छाशक्ति नि सामर्थ्य यांसाठीं लागणारी आत्मशुद्धि वा स्वयंशासन म्हणावें लागेल.

**प्रश्न :**– आजपर्यंत तुम्ही लिहिलेल्या पुस्तकांत तुमच्या दृष्टीनें सगळ्यांत चांगलें कोणतें ?

**उत्तर :**– चांगलें पुस्तक लिहावयाचें अशी कांहीं कल्पना माझ्या मनांत नाहींच. उचंबळून आलेल्या साधनोपयोगी विचारांचा ताबडतोब आविष्कार हें मी परमेश्वरी योजनेनें मजवर आलेलें कार्य समजतों. या विचारांपैकीं ज्यांना जे रुचतील ते घ्यावेत आणि आचरावेत. एखादा शब्द वा एखादी पुस्तिका ही देखील माणसाचें परिवर्तन, त्याच्या जीवन-दृष्टींतील बदल घडवून आणण्याच्या दृष्टीनें मोठ्या जाड्या ग्रंथापेक्षां कमी महत्त्वाची असत नाहीं.

**प्रश्न :**– चीड, संताप या भावना आवराव्या कशा ?

**उत्तर :**– सदा सावध रहा. विवेक वाढव. जप वाढव. मनाच्या वृत्ति नीहाळ. दिवसांतून एखादा तास मौन आचर. क्षमा कर. आणि दुसऱ्याचें अपराध विसर. अपमान सहन कर. दुःखापत सहन कर. विषयोपभोगावर शक्य तेवढें नियंत्रण ठेव. दुसऱ्याचे अपराध माफ करण्याची तयारी सदासर्वदा ठेव. सूडवृत्ति समूळ नष्ट कर. वाईट मिळा-ल्यास चांगलें दे. अपकाराची फेड उपकारानेंच कर. साऱ्यांत तुझ्या इष्ट

देवतेचें स्वरूप पाहावयास शीक. रागाची वृत्ति उफाळल्यावर त्याकडे साक्षी म्हणून पाहा. वृत्तिरूप होऊं नकोस. क्रोध हा तुझा शत्रू आहे. तो तुझें सर्वस्व नष्ट करील; हे विचार मनांत नीट बिंबव.

**प्रश्न** :– प्राणायाम आणि शीर्षासन यांचे परिणाम कित्येक वेळां चांगले होत नाहींत. एवढेंच नव्हे तर मनुष्य वेडा बनण्याची शक्यता त्यामुळें निर्माण होते, असें कांहीं लोक म्हणतात. कृपया शीर्षासन व प्राणायाम यांतील संभवनीय धोके कांहीं असल्यास सांगा.

**उत्तर**:– आसनें आणि प्राणायाम या गोष्टी करतांना स्वतःच्या ताकदीबाहेर असें कांहीं करूं नकोस. अगदीं दमायला होईपर्यंत यांतील कोणतीहि गोष्ट करूं नकोस. प्राणायाम आणि शीर्षासन करून कधीं कुणी वेडे होत नाहींत. प्रत्येक गोष्टीचे त्याचे म्हणून कांहीं नियम असतात. प्रारंभिक गोष्टीपासून सुरुवात कर नि सुधारणा दिसल्यास हळूहळू आसनें व प्राणायाम यांचा काळ वाढीव.

**प्रश्नः**– सात्त्विक संताप म्हणजे काय ?

**उत्तर**:– सात्त्विक संताप साधुपुरुषांमध्येंच पाहावयास मिळतो. लोक-व्यवहार पाळण्याच्या दृष्टीनेंच अशा गोष्टी त्यांच्याकडे उरलेल्या असतात. जीवनमुक्तांमध्यें सात्त्विक संताप पाहावयास मिळतो. या वृत्तीखेरीज जीवन जगणें त्याला कठिण होऊन बसेल. अशा माणसाजवळचा अहंकार अत्यंत सूक्ष्म स्वरूपाचा असतो. तो त्याला कुठल्याहि लौकिक कर्मांत बाद करूं शकत नाहीं.

**प्रश्नः**– मनांतील शंकांचें पूर्ण निरसन कसें करतां येईल ?

**उत्तर**;– साधनेंतील प्रगति जसजशी होत जाईल व चित्तशुद्धि होत राहील त्याप्रमाणें शंकाहि कमी होत जातील. गुरुकृपा, परमेश्वरी कृपा यांचेंहि साहाय्य होत राहील व जीवनाचें खरें स्वरूप मनांत ठसेल. अंतर-शुद्धि वाढविणें हेंच साधकाचें महत्त्वाचें कर्तव्य आहे. एखाद्या संशयानें मनाची छळणूक आरंभिल्यास गुरुमंत्र व रामनाम यांचा जप करावा. परमेश्वराचा अनुभव आल्यावर शंकाच उरत नाहीं. कारण मग परमेश्वराचा शोधक स्वतःच परमेश्वर होतो.

**प्रश्न** :– साधक गुरुकृपा केव्हां प्राप्त करूं शकतो ?

**उत्तर** :– साधक जवळ असो वा दूर असो, तो गुरूचें स्मरण करो वा न करो गुरूची शिष्यावर पूर्ण कृपा असतेच. ज्या प्रमाणांत शिष्याची गुरूवर श्रद्धा त्या प्रमाणांत त्याला गुरुकृपेचा अनुभव येतो. परमेश्वरी कृपेनेंच गुरूची प्राप्ति होत असते.

**प्रश्न** :– ध्यान आणि जीवन या दोन गोष्टी एकमेकांशीं संबद्ध आहेत हें कसें ?

**उत्तर** :– प्रत्येकांत दैवी अंश कमीजास्त प्रमाणांत आहे. त्याचें प्रमाण कमीजास्त असलें तरी त्याचा प्रकार सर्वत्र सारखाच आहे. स्वतःला नास्तिक म्हणविणाऱ्यांतहि हा अंश आहेच. सत्त्व रज हे गुण सर्वत्र आहेत. वाईट मनुष्य हा पूर्ण वाईट व चांगला मनुष्य हा पूर्ण चांगला असा कधीं प्रकार असत नाहीं. चांगल्यावाईट अशा दोन्ही तऱ्हेच्या गोष्टी माणसाच्या हातून होतात. त्याची त्रिगुणयुक्त प्रवृत्तिच त्याच्याकडून अशीं चांगलीं वाईट कृत्यें करून घेत असते. हातून चांगलें कृत्य झालें कीं, त्याचें लक्ष दिव्यतेकडे ओढलें जातें. खोल कुठें तरी आनंदाची अस्पष्ट अनुभूति येते. तो आनंद त्याला कशामुळें होतो हें जरी त्याला सांगतां येत नसलें तरी त्याला त्याचा अनुभव येतो एवढें खरें. ध्यान हें विशेषत्वानें सत्त्वगुणाचें पर्यवसान आहे. जीवन जसजसें उदात्त होत जातें तसतसा मनुष्य परमेश्वराचा विचार करतोच. या ठिकाणीं लक्षांत ठेवावयाची गोष्ट म्हणजे सात्त्विक कर्म हीच उपासना वा ध्यान होय. एकांतस्थानीं ईशचिंतन करीत राहणें म्हणजेच केवळ ध्यान नव्हे. चित्तशुद्धि प्राप्त करून देणारीं सर्व कर्में ध्यानस्वरूपच होत. सामान्य माणसाचें जीवन म्हणजे कमालीचें अज्ञानयुक्त ध्यानच होय. ध्यानाची उपासना बुद्धिपुरस्सर आणि सद्गुरूकडून घेतली असेल तर त्याच्याकडून अकर्ता व अभोक्ता या भावनेनें चांगलींच कर्में होणार. जीवनांत अधिकाधिक आनंद व उत्साह प्राप्त करून घेण्यासाठीं तो जीं कांहीं कर्में करणार तीं अशींच असणार. हा जो दुसरा बुद्धिपुरस्सर अवलंबिलेला ध्यानमार्ग आहे त्यानें माणसाची प्रगति साहजिकच झपाट्यानें होणार नि पहिल्या प्रकाराच्या

बाबतींतील प्रगति मंद म्हणावी लागेल. दोन्ही मार्ग खूप फरकाचे असले तरी एकाच साध्याकडे जातात. अशा तऱ्हेनें ध्यान नि जीवन एकरूप आहेत.

**प्रश्न** :– कृपया मला एवढें सांगा कीं, खालीलपैकी कोणत्या गोष्टींचें मी ध्यान करावें? खालीलपैकीं कांहीं गोष्टींचा पद्धतशीर गट तुम्हीं सांगाल का?

१ अवतारांचीं दृश्यें. २ ब्रह्माचीं स्वरूपलक्षणें. ३ गुरुपदेश घेतलेल्यांची मनोरचना. ४ इतरांना व्यावहारिक साह्य करण्याची मनीषा. ५ ईश्वरेच्छेंत स्वतःच्या इच्छेचें विलिनीकरण. ६ मनःशांतीचे आध्यात्मिक मार्ग. ७ मानसिक सर्वंकष उन्नति. ८ विश्वैकात्मता. ९ शिष्यत्व १० निर्दोष साधना. ११ गुरुपद. १२ आध्यात्मिक मार्गांतील संभाव्य दोष व धोके. १३ हेतूबाबतची शुद्धता. १४ आत्मपरीक्षण. १५ प्रतीकात्मक मूर्ति व दृश्यें. १६ वेदान्त सांगणाऱ्या छोट्या कथा. १७ शांति. १८ धर्मग्रंथ.

ही यादी कितीतरी मोठी करतां येईल. परंतु कुठून सुरुवात करावी हें मला कळत नाहीं.

**उत्तर**:– तुम्हाला अशा गोष्टीचें ध्यान करणें फायदेशीर ठरेल कीं, ज्यामुळें तुमची जाणीव विशाल होईल आणि तुम्हाला आंतरिक शांतीचा अनुभव येईल. ब्रह्माचीं स्वरूप लक्षणें, आध्यात्मिक विषय, प्रकाश, ‘ हें विश्वचि माझें घर ’ असा भाव, शांति इत्यादि. परंतु ध्यानवस्तु आपलें मनोगत पूर्ण होईपर्यंत एकच व निश्चित असावी. मग ती प्रतीकात्मक असली वा वैयक्तिक विचारस्वरूप असली तरी चालेल.

**प्रश्न**:– ध्यानांतील दोष मी कसें टाळूं शकेन?

**उत्तर**:– ध्यानाची साधना निर्दोष होऊन ध्यान पूर्णांशानें साधण्यासाठीं एकाग्रत्व उत्कट करणें व एकाग्रत्वविषयक वस्तूंचें क्षेत्र व्यापक करणें जरूर आहे. [ उदाहरणार्थ, आईचें विद्यार्जनार्थ परदेशी गेलेल्या आपल्या मुलाच्या फोटोवर लक्ष केंद्रित झाले असतें. त्याची आठवण तिला त्याचा फोटो पाहूनच येते असें नाहीं. तिच्या त्या पुत्रस्वरूप एकाग्रत्वविषयक वस्तूंचें क्षेत्र एवढें व्यापक झालेलें असतें कीं, जेवणांतील

त्याला आवडणारा एखादा पदार्थ पाहून, त्याचे कपडे, पुस्तकें एवढेंच नव्हे तर त्याची जेवण्याची वेळ, खेळण्याची वेळ इत्यादि गोष्टीवरूनहि पुनः पुनः तिचें मन आपल्या पुत्राभोंवतीं फिरत राहतें. कोणतीहि परिचित अपरिचित वस्तु तिच्या पुत्रविषयक एकाग्रतेच्या व्यापक क्षेत्रांत मोडते नि अशा तऱ्हेनें तिचें ध्यान सहजसिद्ध होतें.]

**प्रश्नः**– मानवजातीला कल्याणप्रद गोष्टी प्राप्त करून देण्याबाबतच्या विचारांचें मनन ही गोष्ट व्यक्तिमत्त्वाच्या सर्व सुप्त शक्तींना कार्यक्षम करून आंतरिक व बाह्य अशी सर्वंकष उन्नति घडवून आणण्यांत आध्यात्मिक वा योगांतील ध्यानाच्या बरोबरीची ठरणार नाहीं काय ?

**उत्तरः**– चित्तैकाग्रतेच्या इतर सर्व पद्धतीपेक्षां आध्यात्मिक वा योगांतील ध्यान ही गोष्ट व्यक्तिमत्त्वाच्या आंतरिक व बाह्य अशा सर्वंकष उन्नतीच्या दृष्टीनें विशेष उपयुक्त आहे.

**प्रश्नः**– 'स्थलकालातीत नीतितत्त्वें' ही गोष्ट शशश्रृंगासारखी अभावात्मक म्हणावी लागेल काय ? एके ठिकाणची नीति दुसऱ्या ठिकाणची अनीति ठरते. उदाः० आई-वडिलांचा पुत्राकडून वध ही गोष्ट फुजी बेटांत पुण्यकृत्याप्रमाणें मानली जाते.

**उत्तरः**– संस्कृतीच्या भिन्नतेच्या दृष्टीनें पाहिल्यास नीति या मोघम नांवाखालील रूढी स्थलकालातीत असूं शकणार नाहींत. परंतु नैतिक मूल्यांची पूर्वपीठिका स्थलकालातीत आहे. निसर्गाचें उद्दिष्ट निष्फळ करणारीं कोणतीहि गोष्ट नीतिबाह्यच म्हणावी लागेल नि अशा तऱ्हेच्या नीतिबाह्य गोष्टीबद्दल निसर्गाकडून शासन घडल्याशिवाय राहणार नाहीं.

**प्रश्नः**– तुमच्या भोंवतालचीं सर्व माणसें, किंवा कांहीं थोडीं म्हणा वाटल्यास, चांगलें नि अधिकारी नेतृत्व मिळूनसुद्धां मोठीं होत नाहींत. याचें कारण त्यांचें त्यांचें कर्म हेंच ना ? सद्गुरूची कृपासुद्धां त्यांच्या कर्मापुढें कांहीं करूं शकत नाहीं हेंच उत्तर तुम्ही देणार ना ?

**उत्तरः**– गरज पडते त्या वेळीं गुरु कोणतीहि बाह्यतः अशक्य नि असंभवनीय वाटणारी गोष्ट शिष्याकडून करवितो पण सर्वसाधारणपणें

त्यांच्या त्यांच्या कर्मांच्या भोगांत अडथळा, गुरुकडून तसेंच कांहीं कारण असल्याशिवाय आणला जात नाहीं.

## एक छोटासा संवाद

श्री. आयर्विन ट्रोजा (वेस्ट इंडिज) स्वामिजींच्या शिष्यापैकीं आहेत. खुद्द स्वामिजींनीं त्यांना प्रश्न टाकला.

'वेदान्त म्हणजे काय ?'

'सत्याचा सुसंगत विचार करणारें शास्त्र' श्री. ट्रोजा यांनीं उत्तर दिलें.

'सत्य म्हणजे काय ?' स्वामिजींचा पुढला प्रश्न.

श्री. ट्रोजा आपल्या मनांतील कल्पना नीटपणें व्यक्त करूं शकले नाहींत.

'भूत, वर्तमान नि भविष्य ह्या त्रिकालांत ज्याचें अपरिवर्तनीय नि अबाधित अस्तित्व तें सत्य. अनंत, अमर असा सर्वव्यापी आत्मा म्हणजे सत्य.' स्वामिजींनींच त्यांना हें सुचविलें.

'साधकाचे गुण कोणते ?' स्वामिजीनीं विचारलें.

'चांगला होणें, निस्वार्थी होणें' श्री. ट्रोजांनीं सांगितलें. पण स्वामिजींचें ह्या मोघम उत्तरानें कांहीं समाधान झालें नाहीं.

'विवेक, वैराग्य, मनाचा समतोलपणा, एकाग्रचित्तत्व, श्रद्धा नि इंद्रियनिरपेक्ष सुख प्राप्त करून घेण्यासाठीं धगधगती तळमळ; एवढ्या गोष्टी साधकानें प्राप्त करून घेतल्या पाहिजेत. यानंतर पुढें त्याला काय केलें पाहिजे ?' स्वामिजी जणुं ह्या अध्यापनांत रंगून गेले होते.

'त्यानें चिंतन केलें पाहिजे.' श्री. ट्रोजा यांनीं उत्तर दिलें.

'छे, छे, एकदम् तिकडे झेप नाहीं. त्यानें श्रवण केलें पाहिजे. त्याच्यावर विचार केला पाहिजे आणि मग त्या सत्स्वरूपाशीं एकरूप होण्याच्या दृष्टीनें त्याचें ध्यान केलें पाहिजे.' स्वामिजींनीं कल्पना दिली.

"अपरोक्षानुभूति आली. सत्स्वरूप अनुभवाला आलें. पुढें काय करावयाचें ?' स्वामिजींनीं पुन्हां विचारलें.

'मी त्याला सर्व-भावें शरण जाईन.' श्री. ट्रोजांनीं सांगितलें.

'तुम्ही स्वतःच सत्स्वरूप झाल्यावर शरण कोणाला जाणार ?' स्वामिजींनीं पुन्हां त्यांच्या विचाराला चालना दिली.

श्री. ट्रोजांना हा प्रश्न कठिण वाटला. त्यांना योग्य उत्तर सुचूं शकलें नाहीं.

' हा सत्स्वरूपाचा बोध तुम्ही दुसऱ्यांना द्याल. त्यांचें अज्ञान दूर कराल. होय ना ?' स्वामिजींनीं संवादाचा समारोप केला.

* * *

परिशिष्ट १

# कांहीं उपदेशपत्रें

(स्वामिजींचें कांहीं लिखाण पुढें पत्रस्वरूपांत दिलें आहे.)

## एकाग्रतेची पायवाट

**प्रिय उपासक,**

बाहेरच्या वा आंतल्या एकाद्या गोष्टीकडे मन सातत्यानें लागणें म्हणजेच एकाग्रता साधणें होय. मनाला स्थिर करणारी, घट्ट धरून ठेवणारी अशी एकादी गोष्ट असल्याशिवाय एकाग्रता साधणें शक्य होणार नाहीं. आवश्यक तेवढी आस्था नि अवधान या गोष्टी तर या दृष्टीनें फार महत्त्वाच्या आहेत नि म्हणूनच तूं त्या चांगल्या तऱ्हेनें समजून घ्याव्यास असें माझें सांगणें आहे.

मनाचें एकाद्या गोष्टींत गुंतून राहणें, त्या गोष्टींतील मनाचें विसांवणें म्हणजेच अवधान. याहिपेक्षां सोप्या नि स्पष्ट शब्दांत सांगावयाचें म्हणजे पसंत केलेल्या गोष्टीची जाणीव सतत राहणें नि ती जाणीव देखील उत्कट स्वरूपाची असणें म्हणजेच अवधान असें सांगता येईल. या अवधानांतूनच मनाच्या शक्ती स्फुरण पावतात. जेथें अवधान तेथें एकाग्रता असतेच. हें अवधान हळुहळूच वाढविलें पाहिजे. सतत सावधान राहण्याचें साधन सोपें नाहीं. मनाची ती एक विशिष्ट नि वेगळी क्रिया आहे अशांतला भाग नाहीं. अनेकांपैकीं एका शक्तीबाबत मनाच्या पूर्णच क्रियेचा प्रकार आहे तो.

अवधानांत नेहमींच इंद्रियगम्य जाणीव अंतर्भूत असते. हें इंद्रियांनीं अनुभवणें म्हणजे अवधानच. एकाद्या गोष्टीच्या अवधानामुळेंच तुला त्या गोष्टीचें यथार्थ ज्ञान होतें. ज्या गोष्टीकडे अवधान, त्या गोष्टींवर मनाची संपूर्ण शक्ति केंद्रित होते नि मग तुला त्या गोष्टीचें पूर्ण ज्ञान होणें सुलभ जातें. एकादी गोष्ट मनांत नीट ठसवून घ्यावयाची असल्यास, त्या गोष्टीकडे अवधान देण्यानेंच हें शक्य होईल. तूं जर दक्ष असशील, अवधानी असशील तर एका वेळीं एकाच कार्यांत तूं मग्न होशील. अशा तऱ्हेच्या माणसाची स्मरणशक्ति नेहमींच तीक्ष्ण असते. तो सदा जागरूक असतो. परिस्थितीचें यथार्थ दर्शन त्याला बिनचूक नि ताबडतोब होऊं शकतें.

असें हें अवधान दोन प्रकारचें असतें. एक बाहेरच्या गोष्टीचें नि दुसरें मनांतल्या गोष्टीचें. ऐच्छिक नि अनैच्छिक असेहि त्याचे आणखी दोन प्रकार आहेत. एकादी गोष्ट तूं जाणून घेण्याची इच्छा केलीस नि त्या दृष्टीनें तिकडे लक्ष दिलेंस तर तें ऐच्छिक अवधान म्हणावें लागेल. हें ऐच्छिक अवधान तूं अभ्यासानें वाढव. तसें करण्याचे फायदे खूप आहेत. अनैच्छिक अवधानाची गोष्ट वेगळी आहे. तसें अवधान सामान्य माणसांत सर्वत्र पाहाण्यास मिळतें. बाह्य वस्तूच्या सौंदर्यानें, वेगळेपणानें व वैचित्र्यानें त्यांचें मन तिकडे आपोआप खेचलें जातें. त्याच्या इच्छेचा प्रश्नच येत नाहीं येथें ! हेंच तें अनैच्छिक अवधान ! मोठ्या माणसापेक्षां लहान मुलांत अशा तऱ्हेचें अवधान पुष्कळ प्रमाणांत पहाण्यास मिळतें.

तूं ज्या वेळीं एकाद्या गोष्टींचें निरीक्षण करीत असतोस त्या वेळीं तुझें तिकडे अवधान असतें. वासना, इच्छा, हेतु, अपेक्षा, विश्वास त्या गोष्टी-बाबतचें ज्ञान, तुझ्या ईप्सित प्राप्तीच्या दृष्टीनें त्या गोष्टींचें स्थान नि तुझी गरज...इत्यादि गोष्टी एकाद्या गोष्टीचें अवधान ठेवण्यांत अंतर्भूत असतात. अशा अवधानांतील उत्कटता, त्याचा काल, त्याची कक्षा, त्याचा प्रकार, त्यांत होणारी चलबिचल नि त्यांत येणारे अडथळे तूं लक्षांत घेतलेस तर एकाग्रतेची किल्ली हातीं येण्यास तुला तसा फार वेळ मुळींच लागणार नाहीं.

ज्या गोष्टीकडे अवधान लागलें आहे ती गोष्ट जर मनाला आनंद देणारी असेल तर तें अवधान फार दृढ असतें. तसें नसेल तर मात्र त्या गोष्टींतून आनंद तुला निर्माण करावा लागेल. मग अवधान आपोआपच येईल. एकाद्या गोष्टीकडे फार काळ अवधान लागत नसेल, तें कमीजास्त होत असेल तर लगेच दुसऱ्या गोष्टीकडे तें लाव. हळुहळू नि अभ्यासानें रुक्ष गोष्टींचें अवधान देखील तूं बराच काळ टिकवून धरूं शकशील. मग तुझी इच्छाशक्तिहि बलवान् होऊं लागेल.

आपली निरीक्षणाची प्रक्रिया जर तूं बारकाईनें बघशील तर तुझ्या लक्षांत येईल कीं, आपलें अवधान भिन्न भिन्न वेळीं भिन्न भिन्न गोष्टीकडे असतें. वास्तविक परिस्थिति आहे तीच असतांना मनाला एकाहून अनेक गोष्टींचें भान राहणें नि होणें म्हणजेच अवधान विचलित होणें होय. अवधान हें सतत बदलत असतें. वस्तूंत बदल होतो; परंतु त्या वस्तूमात्राकडे अवधान देणाऱ्या व्यक्तिमात्रांत बदल होण्याचें बिलकूल कारण नाहीं. एकाद्या गोष्टीचें हवें तितकें काळ अवधान ठेवण्याची क्षमता व्यक्तिमात्रांत असतेच. परंतु मनाला तशी संवय लावलेली असत नाहीं. म्हणूनच तें थोडक्या वेळांत कंटाळतें नि दुसरीकडे जातें. ‘या गोष्टीव्यतिरिक्त दुसरीकडे लक्ष देणें माझ्यानें होणार नाहीं,’ असें तूं खूप म्हणशील, परंतु थोड्याच वेळांत तुझ्या लक्षांत येईल कीं, मोठ्या परिश्रमानें देखील मन त्या एकाच गोष्टींत गुंतून राहिलें नसून दुसऱ्याच एकाद्या गोष्टीचें भान त्याला होतें आहे. अशी असते अवधानांतील चलबिचल !

एकाद्या गोष्टीबाबतच्या आस्थेमुळें त्याबाबत अवधान ठेवतां येतें. एरवीं नावडत्या गोष्टीबाबत तें फार कठिण जातें. प्रो. जेम्स म्हणतात, ‘आपण एकाद्या गोष्टीचें अवधान ठेवतो तें त्या गोष्टींतच जिव्हाळ्याचें नि जवळचें कांहीं तरी असतें म्हणून.’ परंतु प्रो. पिल्सबरोंचें याच्या अगदीं उलट मत आहे. ते म्हणतात, ‘एकाद्या गोष्टींत जिव्हाळ्याचें नि जवळचें कांहीं सांपडतें. याचें कारण आपलें अवधान त्या गोष्टीकडे लागण्याची शक्यता असतें म्हणून. म्हणजे तुला असें म्हणावयास हरकत नाहीं कीं, सततच्या अभ्यासानें, अवधान देऊन वरचेवर नव्या उत्साहानें

प्रयत्न करून जेव्हां आपण एकादी रुक्ष गोष्ट समजून घेतो तेव्हां प्रथमतः रुक्ष वाटणारी ती गोष्ट नंतर आपल्या मोठ्या आनंदाची नि जिव्हाळ्याची चीज बनते.

कोणत्याहि गोष्टीचें तुझें अवधान जर दृढ असेल तर तुझ्या मनाच्या टप्प्यांत येणाऱ्या गोष्टींचें स्पष्ट स्वरूप आकलन होण्यास तुला फार काळ लागणार नाहीं. सावधानचित्त मनुष्यच इच्छाशक्तीचा विकास करूं शकतो. आस्था, अवधान नि तें उपयोगांत आणण्याची कला या तीनच गोष्टींनीं तूं अद्‌भुत कार्य करूं शकशील. बुद्धिमान् परंतु मंद अवधानी माणसांकडून जेवढें कार्य होतें त्याच्यापेक्षां कितीतरी अंशानें अधिक काम सामान्यच प्रज्ञेच्या परंतु तीक्ष्ण अवधानाच्या माणसांकडून होतें. अपयशाचें खरें कारण अनवधानच असतें. एका वेळीं एकाच गोष्टीकडे लक्ष पुरवावयाचें तूं ठरविलेंस तर साहजिकच तुला त्या गोष्टीचें ज्ञान मिळेल. परंतु असें क्वचितच घडतें. अनभ्यस्त नि सामान्य माणसाचें मन एका वेळीं अनेक गोष्टींचा हव्यास धरतें. त्याच्या मनाच्या कारखान्यांत एकाच वेळीं अनेक गोष्टी येत असतात नि त्याचा परिणाम एवढाच होतो कीं त्याला नीट विचार करतां येत नाहीं. जरूर त्या विचारांचें पृथक्करण नि एकत्रीकरण त्याला जमत नाहीं. 'मला काय सांगावें तें कळत नाहीं, मला माझा विचार कोणत्या शब्दांत स्पष्ट करावा तें कळेनासें झालें आहे,' असें म्हणण्याची पाळी येते मग त्याच्यावर ! थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे तो पूर्णपणें गोंधळून जातो. मनाला शिस्त लावलेल्या माणसाची गोष्ट मात्र वेगळी असते. एका गोष्टीचें पूर्णज्ञान झाल्यावरच तो दुसऱ्या गोष्टीकडे वळतो. एकाग्रतेचें हें गुपित तूं समजून घे नि हळूहळू अभ्यासानें एकाग्र-चित्तत्व साधण्याची कला विकसित कर अवधानाचा विवेकपूर्ण उपयोग हाच अवधानाचा अभ्यास. एकदां का तुला याची गोडी लागली कीं, एकाग्रतेचें अमाप सामर्थ्य प्राप्त करून घेण्यांस तुला कांहींच कठीण वाटणार नाहीं.

परमेश्वर तुझें ईप्सित पूर्ण करो !

तवैव स्वरूपम्,

**शिवानंद**

## जीवन-संगीत

**प्रिय उपासक,**

आजचें हें पत्र तुला थोडें ‘ आगळें ’ वाटेल. ब्रह्मांड निर्मितीपासून केलेली सुरुवात नि लिहिण्याच्या ओघांत आलेले, कंपनलहरी, गतिशीलता, मनोमन विचारक्षेपण ( telepathy ) इत्यादि शब्द पाहून रोजच्या जीवनाशीं संबंधित नसलेलें शास्त्रीय कांहींतरी वाचतों आहे असेंहि अर्धेमधें तुला कदाचित् वाटेल. पण माझी खात्री आहे कीं, स्वतःच्या सुख-निमिती-बाबतचा अगदीं जवळचा नि जिव्हाळ्याचा विचार वाचल्याचें वाचनान्तीं तुला वाटेल.

परमात्म्यानें संकल्प केला. त्या संकल्पशक्तींतून निर्माण झालेल्या कंपनांतून सृजन झालें. सृष्टीच्या अस्तित्वाचें मूळ हें असें आहे. प्रणवाचा निनाद अणुरेणूंत भरून राहिला नि मग त्या अदृष्टांतून तीन गुणांचें आंदोलन झालें. आकाशमात्रांत कंपन झालें नाहीं तोंच बाकीच्या चार तत्त्वांची निर्मिति झाली. मग पंचीकरणाच्या पद्धतीनें दृश्य विश्वाची उभारणी झाली.

असें हें कंपन सर्वत्र भरून राहिलें आहे. साध्या शब्दाचा जरी तूं उच्चार केलास, मग तो मनांत कर वा मोठ्यानें कर, त्यामुळें वातावरणांत लहानमोठ्या लहरी निर्माण होतात नि त्या विद्युद्वेगानें इतस्ततः विखुरल्या जातात. रेडिओध्वनिलहरी एका सेकंदांत अनेक वेळां पृथ्वीप्रदक्षिणा करत असल्याचें तूं ऐकलें असशील.

विश्वांतील वस्तुमात्रांत कंपन भरून राहिल्यानें तिचें स्वरूप गतिशील राहिलें आहे. हें कंपन सर्वत्र एकसारखें नाहीं. कोठें तें अगदीं मंद, इंद्रियांना न जाणवणारें असेल तर कोठें विलक्षण वेगाचें असेल. या कंपनगतीच्या निराळेपणामुळेंच विश्वांतील वस्तुजात विविधतेनें विनटलेली दिसते. जी गोष्ट वस्तुमात्राबाबत तीच व्यक्तिमात्राबाबत आहे. तुझ्या मनांतील प्रत्येक विचार, प्रत्येक शब्द नि प्रत्येक कृति वातावरणांत कंपन घडवून आणते नि त्याचा वस्तुमात्रावर व व्यक्तिमात्रावर परिणाम झाल्या-खेरीज राहात नाहीं. हा विचार वाईट असेल तर त्याचा वाईट परिणाम

होईल. हाच न्याय चांगल्या विचारांनाहि लागू आहे. म्हणूनच तुझ्या मनांतील विचार तुझे शब्द नि तुझी कृति चांगली हवी. मनोमन विचार-क्षेपण ( telepathy ) असें हें विचारनिर्मितीनें होणाऱ्या कंपना-मुळेंच शक्य झालें आहे.

कुणीहि अधिकारी योगी कितीहि अंतरावर अशा तऱ्हेचें मनोमन विचारक्षेपण करूं शकेल. निरनिराळ्या विचारांमुळें होणारें कंपन सारखेंच असत नाहीं. कंपनाच्या या कमजास्तपणामुळें विचारांचें वेगळेपण सिद्ध होतें, असें तुला ' उलट ' सांगितल्यास जरा चमत्कारिक वाटेल पण तें कांहीं खोटें नाहीं.

या कंपनांत कांहीं संवादी स्वरमाला हवी, तर तिथें शांति आहे. त्यांत कांहीं ताल हवा तर सुसूत्रता आहे. तुझ्या श्वासोच्छ्वासांत, हृदयाच्या चलनांत असाच ताल आहे, नियमितपणा आहे, म्हणूनच तुजजवळ सुदृढता आहे. तीच गोष्ट फुप्फुसाच्या लहानमोठें होण्याची आहे. यांतील एकाचा जरीं ताल कमजास्त झाला कीं, रोगबाधा झालीच म्हणून समज. हा ताल तुला ठेवतां आला पाहिजे. बेताल होण्याचे दुष्परिणाम तुला सविस्तर सांगितले पाहिजेत अशांतला भाग नाहीं. ' पिंडीं तें ब्रह्मांडीं.' तुझ्या फुफ्फुसाच्या प्रसरण-आकुंचनांत जसा ताल तसाच तो सागराच्या ओहोटींत, ग्रहांच्या गतींत, दिवसरात्रींच्या क्रमांत नि ऋतूंच्या पालटांत आहे.

प्रत्येक भूतमात्रांतील कंपनगति इतरांहून भिन्न असते खरी, परंतु या भिन्न भिन्न कंपनांचाहि एकमेकांशीं मेळ असतो. तबल्याचा ठेका वेगळा, वीणेची छेड वेगळी नि पेटीचे सूरहि वेगळे; परंतु या साऱ्यांतून एकच कर्णमधुर चीज निर्माण होते. तसाच आहे हा प्रकार. मात्र जिथें हा मेळ नाहीं तिथें शांतीचें सुंदर संगीत नाहीं. म्हणूनच बाह्य कंपनलहरींशीं स्वतःच्या मनांतील विचारांची कंपनलहरी संवादी कशी ठेवायची तें तूं समजून घेतलें पाहिजेस नि प्रयत्नानें साध्य केलें पाहिजेस. तरच तूं सुखी होशील, समाधानी राहशील. ' ठेविलें अनंतें तैसेंचि राहावें, चित्तीं असों द्यावें समाधान । ' ही अवस्था तुला सहज प्राप्त होईल. दुसऱ्याच्या

विचारांच्या कंपनलहरीशीं स्वतःच्या मनांतील विचारांची कंपनलहरी विसंवादी असूं नये. तसें झालें तरच तुम्हा दोघांत समजूत राहील, सहानुभूति राहील. एखाद्या व्यक्तीविषयीं तुला नितांत आदर आहे, याचा अर्थच तुझ्या नि त्याच्या विचारांच्या कंपनलहरींत मेळ आहे. असा मेळ जिथें आहे तिथें खरी मैत्री आहे. एरवीं द्वेष, दुराग्रह नि मत्सर निर्माण होतो नि तथाकथित स्नेहसंबंध दुःखदायक होतात.

अवतीभवतींच्या वाईट विचारांच्या कंपनलहरींपासून बचाव करण्याचें सामर्थ्य जर तूं स्वतःमध्यें निर्माण केलें नाहींस तर तुझी ऐहिक नि आध्यात्मिक अवनति होण्यास मुळीं वेळच लागणार नाहीं. विशेषतः वाईट विचार मनांत वागविणाऱ्या व त्या विचारांच्या कंपनलहरीमुळें वातावरण वाईट करण्यास कारणीभूत होणाऱ्या व्यक्तींच्या सहवासांत जर तूं असशील नि तुझ्यामध्यें आतां सांगितलेलें सामर्थ्य जर नसेल तर तुला फारच धोका आहे असें निश्चित समज. वातावरणांतील वाईट विचारांच्या कंपनलहरीपासून बचाव करण्याचें सामर्थ्य स्वतःमध्यें कसें आणायचें असें तूं विचारशील. तर 'प्राणायाम नि ध्यान यांच्या नियमित अभ्यासानें आत्मिक शक्तीचें आवरण तुझ्याभोंवतीं तयार होईल नि कुणाचीहि वाईट इच्छा वा वातावरणांतील वाईट विचार तुझें वाईट करूं शकणार नाहींत.' हें रहस्य लक्षांत ठेव.

परमात्म्याच्या कृपेनं तुला हें सामर्थ्य प्राप्त होवो !

तवैव स्वरूपम्,

– शिवानंद

## योगसाधनेचें स्वरूप

**प्रिय उपासक,**

तुझें 'योग' या शब्दाबाबतचें कुतूहल कळलें. अरे 'न मिळविलेली वस्तु मिळविण्याचा प्रयत्न' म्हणजे योग! न मिळविलेला आत्म-प्राप्तीचा आनंद मिळवणें! इतर कांहीं शब्दाप्रमाणें अर्थाच्या बाबतींत हाहि शब्द थोडा गुळमुळीत झाला आहे खरा; त्याला इलाज नाहीं.

हा प्रयत्न, हा योग फलद्रूप कसा होतो, हा त्यांतून ओघानें येणारा प्रश्न आहे. आतां थोडक्यांतच लिहितो. ह्या मजकुराचें नीट मनन मात्र कर.

नैतिक शुद्धता ही योगसाधनेंतील एक प्राथमिक अट आहे. येशू-ख्रिस्ताच्या दहा आज्ञा काय किंवा योगदर्शनांतील यम-नियम काय (अहिंसा सत्य, अस्तेय, अपरिग्रह, शौच, संतोष, तप, स्वाध्याय इत्यादि) अशा स्वरूपाच्या गोष्टींचें आचरण मनांतील अशुद्धता घालविण्याच्या दृष्टीनें अत्यावश्यक आहे. योगसाधनेच्या शिल्पाच्या या कोनशिलाच आहेत असें समज.

यांतील अहिंसेची बाब विशेषेंकरून लक्षांत घेण्यासारखी आहे. विचार, अभिव्यक्ति व कृति या तिन्हीबाबत तुझें धोरण असें असावें कीं, त्यामुळें कुणाचीहि भावना दुखावली जाऊं नये. केवळ कठोर बोलणं नव्हे तर कठोर दृष्टीनें पाहणें सुद्धां हिंसात्मकच आहे. सर्वांबाबत सदिच्छा नि स्नेह हवा.

दुसरी गोष्ट सत्य. विचार, अभिव्यक्ति नि कृति यांत संबद्धता हवी. सत्याचा आविष्कार शुद्ध प्रेरणेंतूनच होतो. अशी संबद्धता नि शुद्ध प्रेरणा असणें म्हणजे सत्याचरण. अशा आचरणशील अभ्यासूचा शब्द म्हणजे इतरांना एक प्रकारचा आशीर्वादच!

प्रामाणिकपणानें कष्ट करून जें कांहीं मिळेल त्यांत समाधान मानणें हें अस्तेयाच्या आचरणाचें लक्षण आहे. कर्मफल कुणाला तरी चुकलें आहे काय? तुझ्या प्रत्येक कृतीचें फल तुला मिळणारच. जशी क्रिया तशीच प्रतिक्रिया! पैशाची सांठवण हें देखील एक चौर्यकर्मच. अरे, पैसा कुणाचा? तिन्ही जगाच्या संपत्तीचा मालक एक भगवंतच आहे. तुम्ही फक्त तिचे काळजीवाहू आहांत. इतरांना जसें मिळेल नि जेवढें मिळेल तसेंच नि तेवढेंच त्यांच्याबरोबर पत्करायला तुझी तयारी हवी. जास्तीचें जें कांहीं असेल तें दानधर्माच्या मार्गाला लावण्याची तयारी हवी.

अंतरांतील शत्रूशीं सामना द्यावयाचा म्हटलें कीं, शक्ति हवी. सामर्थ्य हवें. हें सामर्थ्य ब्रह्मचर्यापासून मिळेल. स्वच्छ सदसद्विवेक बुद्धि, दुर्दम इच्छाशक्ति, कठोर सत्याची सुधीर समजूत, आश्चर्यकारक धारण-शक्ति नि विचारशक्ति यांची प्राप्ति, यांतूनच उद्भवते.

क्रमांक ७५५ ११५
दि. ३-

नेमकें जें कांहीं हवें आहे तें म्हणजे खोल आंतरिक जीवन! वारंवार उफाळणाऱ्या चित्तवृत्तींना शांत कर. मन थंड असूं दे. दैवी शक्तीचें नि दैवी मार्गदर्शनाचें भान असूं दे. तुझ्या मनांतील विचार, त्या अंतर्यामीच्या दृष्टींतून निसटणार नाहींत. पण तूं आपणहूनच अंतर्यामीपाशीं अंतर खुलें कर. दया, क्षमा, शांति, शुद्धता, सामर्थ्य नि ज्ञान या गोष्टींची त्याच्या-कडून कळकळीनें याचना कर. तुला त्या निश्चित मिळतील. भगवंतानें सांगितलेल्या अभ्यास व वैराग्य या दोन गोष्टींचें आचरण मग हळूहळू होऊं लागेल. विज्ञान भिक्षूनें तर दोन तऱ्हेचें वैराग्य सांगितलें आहे. जीवनांतील चांगल्या गोष्टी देखील फार काल राहत नसल्यानें त्यांची प्राप्ति अहंकाराच्या आधाराविना कठीण असल्यानें त्यांचा त्याग हें पहिलें, विवेकावर आधारलेलें वैराग्य. तर अखिल वस्तुमात्राचें खरें स्वरूप आपल्या बुद्धीला जसें कळतें तसेंच केवळ तें नसल्यानें, दुसरें वैराग्य हें बुद्धि नि तिच्या प्रकाशांत दिसणाऱ्या वस्तूंचें स्वरूप यांच्यांतील फरकाच्या ज्ञानावर आधारलेलें आहे.

अशा रूपाच्या वैराग्यानें बाह्याकडील ओढ काबूंत येईल. बाह्य विषया-बाबत केवळ वृत्तींतील औदासीन्य कामाचें नाहीं. त्याप्रमाणें अभ्यास हवा. भगवंताचें सतत स्मरण हा एक मोठा अभ्यासच आहे.

वासनेमुळें मनाची धांव नेहमीं बाहेर असते. वस्तूच्या खऱ्या स्वरूपाची विवेकानें ओळख करून घेऊन ही भ्रमरवृत्ति नष्ट होईल. बाहेरच्या अशाश्वतांतील आनंद घेण्याचा मनाचा ओघ विवेकानें, इच्छाशक्तीच्या साहाय्यानें नि अंतर्मनाला सूचना देऊन अंतरांतील शाश्वताकडे (अंतर्यामीकडे) लावतां येईल. या बाबतींत तुझ्यासारख्या संसारी साधकाला सतत सावधानचित्त राहणें जरूर आहे. मन बाह्य विषयांकडे गेलें कीं पुन्हां नवीन उमेदीनें त्याला त्या वस्तूच्या स्वरूपाची, त्यापासून मिळणाऱ्या आनंदाच्या दुःखरूप अन्तराची कल्पना दे नि त्याची बाह्या-कडील ओढ कायमची नाहींशी करण्याचा संकल्प दृढ करीत जा. याला म्हणायचा अभ्यास! हा अभ्यास कांहीं एकाद्-दुसऱ्या दिवसाचा नाहीं.

तो सतत चालू ठेवला पाहिजे. कोणत्याहि प्रसंगानें त्यांत ढिलेपणा आणून उपयोगाचें नाहीं. आरंभशूर साधकाच्या पदरीं असफलताच येणार. सुरुवातीचा भाग कंटाळवाणा असला म्हणून काय झालें? त्यांतून हळूहळू प्राप्त होत जाणाऱ्या आनंदाचा महिमा शब्दांत कधीं सांगता आला आहे काय?

वासना ही गोष्ट तर अशी आहे नि मनुष्य इतका तिच्या आहारीं जातो कीं, मागचा पुढचा विचार करण्याचेंहि अवधान त्याला राहत नाहीं. अशा ह्या सर्वनाशक वासनेचा जन्म अज्ञानांत आहे. वासनाविषयाचें खरें स्वरूप समजून न घेतां त्याचा चवीनें घेतलेला आस्वादच वासना-क्षयाच्या आड येत असतो. वासनाविषयाच्या उपभोगाबाबत अशी ही विकृत सुखदस्मृति जाणून बुजून निर्माण करून ठेवत जाशील तर तुझे हे विषय सुटतील तरी कसे?

त्यांच्या बाबतींतील हें सुखद स्मृतीचें, त्यांच्या आस्वादांतील चवीच्या चटकीचें सर्पण काढून टाक कीं, विषयाग्नि विझलाच म्हणून समज. पुरे नाहीं का झाली ही वासनांची छळणूक? मनाची गुलामगिरी पुरे झाली आतां? त्याला लगाम घालायची ही वेळ आली आहे. अशा वेळीं धीरानें घे, समजुतीनें घे. सुरुवातीला जड जाईल पण त्याचें फलित अमृतत्व देणारें आहे.

वर सांगितलेल्या साधनेनें स्वतःच्या दैवी स्वरूपाच्या चिंतनांत स्वस्थ राहा कीं, कोणत्याहि अडचणीला तोंड देण्याचें सामर्थ्य तुला सहजच प्राप्त होईल. परिस्थितीच्या विषमतेंतहि तुझी वृत्ति स्थिर राहील नि हा योग यशस्वी होईल.

प्रेम, ज्ञान, सामर्थ्य, क्षमा, शांति यांची प्राप्ति तुला त्या अंतर्यामीं-कडून होवो!

अनुक्रम ८५६८८
विभाग का. वा.
क्रमांक ७९५१
नों. दि. ३-५-८१
IRBK-0109203